सोलापूर तरुण भारत

# आसमंत



# दिशादर्शक विजय

गौरव

**कौस्तुभ चाटे**

**दीप्ती शर्माच्या गोलंदाजीवर दक्षिण आफ्रिकेची फलंदाज डी. लर्कचा झेल भारतीय कर्णधार हरमनप्रीतच्या हातात विसावला आणि भारतीय चाहत्यांनी एकच जल्लोष केला. भारतीय संघाने २०२५च्या क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत अप्रतिम कामगिरी करत मिळवलेले हे विजेतेपद आपल्या महिला क्रिकेटला एक नवी संजीवनी देणारे ठरेल, यात काहीही शंका नाही. १९८३ च्या विजयानंतर आपल्याकडचे क्रिकेट बदलले, तसेच महिला क्रिकेटदेखील आता वेगळे आणि मोठे वळण घेईल, अशी आशा आहे. हा विजय भारतीय महिला क्रिकेटला एक नवी दिशा देईल, हे नक्की!**

म्हारी छोरियां छोरों से कम हैं के’.आमिर खानच्या ’दंगल’ चित्रपटातील हा बहुचर्चित संवाद खरा ठरला तो गेल्या रविवारी २ नोव्हेंबरला, रविवारी रात्री. महिला एकदिवसीय क्रिकेट विश्वचषकात भारतीय महिला संघाने दक्षिण आफ्रिकेच्या महिला क्रिकेट संघाचा अंतिम सामन्यात पराभव करत १३ व्या एकदिवसीय क्रिकेट विश्वचषकावर पहिल्यांदा नाव कोरले. या मोठ्या आणि आशादायी विजयाचा जागर क्रिकेट चाहत्यांनी रात्रभर साजरा केला.

ढोल ताशांच्या गजरात अनेक जणांनी विजयी जल्लोष केला. याशिवाय स्त्री-पुरुष समानतेमध्ये भारत तितकासा मागे नसला तरी देशाला समान पातळीवर आणून प्रगती करण्याच्या प्रक्रियेत ही एक महत्त्वाची घटना घडली.

महिला क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत भारतीय संघाने दर्जेदार खेळी करत, सर्वच क्रिकेट रसिकांची मने जिंकली. आज हरमन, स्मृती, दीप्ती, जेमिमा, शफाली, रिचा ही नावे घरोघरी पूजली जाणार आहेत. कारण, हा विजय केवळ एका संघाचा नसून, करोडो भारतीयांचा आहे. हरमन आणि तिच्या संघाचे कितीही कौतुक केले, तरी ते अपुरेच असेल.

या स्पर्धेची सुरुवात होण्याच्या आधी आपली कर्णधार हरमनप्रीतने सांगितलेच होते की, ‘भारतीय संघासाठी ही स्पर्धा महत्त्वाची असेल आणि आम्ही या विजेतेपदाचे मुख्य दावेदार असू.’ पण, महिला क्रिकेटमध्ये जिथे ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंडसारखे संघ असतात, तिथे इतर संघांना फारसा वाव नसतो. या दोन्ही संघांनी महिला क्रिकेटचा दर्जा वेगळ्या स्तरावर नेला आहे. या दोन्ही संघांनी विश्वचषक स्पर्धा अनेकदा जिंकली. पण, महत्त्वाची गोष्ट अशी की, हे दोन्ही संघ उपांत्य फेरीमध्ये पराभूत झाल्यामुळे, यावर्षी महिला विश्वचषक स्पर्धेला नवीन विजेता मिळणार, ही गोष्ट स्पष्ट झाली.

स्पर्धेची प्राथमिक फेरी उत्तम झाली. ऑस्ट्रेलियन संघाने साखळी गटातले आपले सर्व सामने जिंकून महिला क्रिकेटमधील आपले वर्चस्व अजूनच अधोरेखित केले. इंग्लिश संघदेखील चांगला खेळत होता. हे दोन्ही संघ उपांत्य फेरीत प्रवेश करणार, हे निश्चित होते. दुसरीकडे दक्षिण आफ्रिकेच्या संघासाठी ही स्पर्धा म्हणजे ‘रोलर कोस्टर राईड’ होती. इंग्लंड विरुद्ध पहिल्याच सामन्यात ते केवळ ६९ धावांमध्ये बाद झाले. पण, त्यांनी इतर सर्व संघांना हरवण्यासाठी प्रयत्नांची शर्थ केली. ऑस्ट्रेलियाविरुद्धदेखील ते कमी धावसंख्येत बाद झाले, पण भारत आणि न्यूझीलंडसारख्या संघांना सहज हरवत त्यांनीदेखील उपांत्य फेरीत प्रवेश केला. आता प्रतीक्षा होती, ते उपांत्य फेरीत खेळणाऱ्या चौथ्या संघाची.

भारतीय संघासाठीदेखील काही वेगळी परिस्थिती नव्हती. आपल्या संघाने इतर आशियाई संघांना पराभूत करीत सुरुवात तर चांगली केली, पण इंग्लंड आणि दक्षिण आफ्रिकेविरुद्ध मात्र हार पत्करली. हे दोन्ही पराभव जिव्हारी लावणारे होते. इंग्लंड विरुद्ध चार धावांनी, तर आफ्रिकेविरुद्ध अगदी अटीतटीच्या लढतीत आपण पराभूत झालो. ऑस्ट्रेलियाविरुद्धदेखील मोठी धावसंख्या उभारल्यानंतर भारतीय संघ पराभूत झाला. यानंतर भारतीय संघावर टीकादेखील झाली. यानंतर उपांत्य फेरीत प्रवेशासाठी आपल्याला न्यूझीलंड संघाला पराभूत करणे आवश्यक होते.

नवी मुंबईत झालेल्या सामन्यात आपण न्यूझीलंडलादेखील छोबीपछाड दिला आणि उपांत्य फेरीचे तिकीट निश्चित केले. उपांत्य फेरीत आपला सामना बलाढ्य ऑस्ट्रेलियाविरुद्ध होता. ऑस्ट्रेलियाविरुद्ध खेळणे कायमच आव्हानात्मक असते आणि इथे तर विश्वचषकाचा उपांत्य सामना होता. ही लढाई चुरशीची होणार, यात शंका नव्हती!

महिला क्रिकेट विश्वचषकाला १९७३ साली सुरुवात झाली. १९८८ सालपर्यंतच्या महिला एकदिवसीय विश्वचषकात ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंड संघांची ’दीदीगिरी’ होती. विजेते आणि उपविजेते म्हणून या दोन संघांच्याच पोरींचा दरारा होता. बाकी कोणाला एन्ट्री मिळेल याची शक्यता कमीच. परंतु, त्यानंतर १९९३, १९९७ आणि २००९ साली न्यूझीलंड क्रिकेट संघाने उपविजेतेपदापर्यंत मजल मारली. तर २००० साली न्यूझीलंड क्रिकेट संघाने विश्वचषक जिंकून ही दीदीगिरी मोडीत काढण्याचा प्रयत्न केला.

२००५ आणि २०१७ साली भारतीय महिला क्रिकेट संघ अंतिम फेरीपर्यंत पोहोचला. तर २०१३ साली वेस्ट इंडिज संघाने आणि आता २०२५ साली दक्षिण आफ्रिका उपविजेती ठरली. हा सर्व डाटा समोर मांडण्याचा प्रपंच याचसाठी की इंग्लंड आणि ऑस्ट्रेलियाचे वर्चस्व मोडीत काढत इतर महिला क्रिकेट संघ देखील गेल्या काही वर्षात उभे राहिले.

ऑस्ट्रेलिया संघाचा वचक इतका की एकूण १३ स्पर्धांमध्ये एकट्या ऑस्ट्रेलिया संघाने ७ वेळा, इंग्लंडने ४ वेळा तर भारत आणि न्यूझीलंडला एकदा विश्वचषक जिंकण्यात आतापर्यंत यश आले आहे.

२०२५ सालचे हे विश्वचषक विजेतेपद मिळवताना भारतीय संघाने अनेक अडथळे पार केले. आधी आफ्रिका, ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंड संघांकडून सलग तीन पराभव झाल्यानंतर भारतीय संघ कमबॅक करेल, अशी आशा कमीच होती. परंतु, भारतीय महिला संघाने फिनिक्स भरारी घेऊन सेमी फायनलमध्ये बलाढ्य ऑस्ट्रेलिया संघाचा ५ विकेट्स राखून पराभव करून पुरुष क्रिकेटमध्ये मने गुंतलेल्या क्रिकेट रसिकांना महिला क्रिकेटकडे लक्ष देण्यास भाग पाडलं. तसेच अंतिम फेरीत संपूर्ण विश्वचषक स्पर्धेत फॉर्मात असलेल्या आफ्रिका संघाला पराभूत करून पहिल्यांदा विश्वचषकाला गवसणी घातली अन् तिरंगा अभिमानाने फडकला.

---



# नक्षलवादी येताहेत मुख्य प्रवाहात

लक्ष्यवेध

**अजय तिवारी**

**‘वर्षानुवर्षे जंगलात फिरणारे अनेक नक्षलवादी आता मुख्य प्रवाहात परत येऊ इच्छितात आणि शांततापूर्ण जीवन जगू इच्छितात...’’ आत्मसमर्पण करणाऱ्या माओवाद्याचे हे विधान महत्त्वपूर्ण आहे, जे नवीन पिढीच्या हिताचे सूचक आहे. देशात ३१ मार्चअखेर नक्षलवाद संपवण्याच्या सरकारच्या धोरणाला पूरक पावले पडत आहेत. गेल्या काही दिवसांमध्ये तर प्रचंडप्रमाणात नक्षलवादी मुख्य प्रवाहात आले. त्या निमित्ताने घेतलेला वेध...**

’’आता क्रांतीपेक्षाही मोबाईल फोन, बाईक आणि गर्लफ्रेंड जास्त महत्त्वाच्या आहेत...’’ नक्षलवादी चळवळीला सोडचिठ्ठी देऊन मुख्य प्रवाहात येऊ इच्छिणाऱ्या नक्षलवाद्यांचे हे प्रातिनिधिक मत आहे. त्यावरून नक्षलवाद्यांची बदललेली मानसिकता लक्षात येते. दुसरीकडे छत्तीसगडमधील बस्तर येथे सुरक्षा दलांनी ‘ऑपरेशन ब्लॅक फॉरेस्ट’ अंतर्गत २७ माओवाद्यांना घेराव घालून ठार केले. त्यापैकी माओवादी संघटना सीपीआय (माओवादी) चा सरचिटणीस आणि नक्षलवादी चळवळीचा कणा असलेला नम्बाला केशवराव उर्फ बसवराजू हा एक होता.

बसवराजू हा एक अभियंता होता. माओवादी विचारसरणीने प्रेरित होऊन तो नक्षलवादी बनला. सरकारने त्याच्यावर एक कोटी रुपयांचे बक्षीस ठेवले होते आणि त्यांच्यावर १५० सैनिकांची हत्या केल्याचा आरोप होता. त्याने सीपीआय (माओवादी) ची सशस्त्र शाखा ‘पीपल्स लिबरेशन गुरिल्ला आर्मी’ (पीएलजीए) ला बळकटी देण्यासाठी काम केले. २००० मध्ये अनेक लहान नक्षलवादी गटांचे विलीनीकरण झाल्यानंतर ‘पीएलजीए’ची स्थापना झाली. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी बसवराजूच्या खात्म्याचे वर्णन ‘नक्षलवाद संपवण्याच्या लढाईतील ऐतिहासिक कामगिरी’ असे केले. या कारवाईमध्ये ५४ माओवाद्यांना अटक करण्यात आली. याआधी सुरक्षा दलांनी दुर्गम कुरेगुट्टा टेकड्यांमध्ये ३१ माओवाद्यांना लपण्याच्या ठिकाणांना वेढा घालून ठार मारले होते. त्यांच्याकडून मोठ्या प्रमाणात शस्त्रेही जप्त करण्यात आली होती. पोलिसांनी असाही दावा केला आहे की, या वर्षाच्या पहिल्या चार महिन्यांत ७०० हून अधिक माओवाद्यांनी आत्मसमर्पण केले. सुरक्षा दलांच्या मते आता माओवाद छत्तीसगड, महाराष्ट्र, तेलंगणा आणि झारखंडपुरता मर्यादित राहिला आहे.

सरकारच्या मते देशभरातील माओवादग्रस्त जिल्ह्यांची संख्या एप्रिल २०१८ मध्ये १२६ वरून ९० वर तर जुलै २०२१ मध्ये ७० वर आली. एप्रिल २०२४ च्या आकडेवारीनुसार, माओवादग्रस्त जिल्ह्यांची संख्या फक्त ३८ वर आली आहे. माओवाद खरोखर शेवटच्या टप्प्यात आहे का? याचे सकारात्मक उत्तर देणे खूप घाईचे होईल. काही जण सुरक्षा दलांच्या कारवाईच्या प्रामाणिकपणावर प्रश्नचिन्ह उपस्थित करीत आहेत. त्यांना नुकसान सहन करावे लागले आहे. माओवादाला आळा घालण्याचे राजकीय श्रेय घेण्याची स्पर्धाही सुरू झाली आहे; पण आता माओवादी थकले आहेत का? हे निश्चितपणे सांगता येत नाही. कुरेगुट्टा टेकडीवर वेढा घातल्यानंतर, माओवाद्यांनी छत्तीसगड सरकारशी शांतता चर्चेचा प्रस्ताव ठेवला. तो सरकारने नाकारला.

सरकारच्या मते नक्षलवाद्यांनी एक तर शस्त्रे सोडून द्यावीत किंवा मरणास तयार राहावे. नक्षलवाद्यांच्या शरणागतीकडे त्यांच्या विघटित होणाऱ्या संघटनेची पुनर्स्थापना करण्यासाठी आवश्यक विराम म्हणूनही पाहिले गेले. याचा अर्थ ते पूर्णपणे तुटले आहेत, असे नाही. त्यांना अजूनही कुठून तरी ऊर्जा मिळते. तज्ज्ञांचे म्हणणे आहे की, सरकारने बंदी घातलेल्या माओवादी संघटनेची एक सुव्यवस्थित रचना, एक निश्चित व्यवस्था आहे; ज्यामध्ये एका बसवराजूच्या जाण्याने दुसऱ्या बसवराजूसाठी मार्ग मोकळा होतो. दुसऱ्या शब्दांमध्ये सांगायचे तर एका बसवराजूचा मृत्यू झाला तर दुसरा त्याची जागा घेईल, म्हणून माओवादाचा नायनाट करायचा असेल तर शेतकरी, आदिवासी आणि शोषित गटांच्या समस्या सोडविणे आवश्यक असेल. मध्य प्रदेशचा विचार केला तर, माओवाद हा छत्तीसगड आणि महाराष्ट्राच्या सीमेवर असलेल्या काही जिल्ह्यांपुरता मर्यादित आहे, परंतु तिथेही सरकारचे धोरण शून्य सहनशीलतेचे आहे.



विकासाचा प्रकाश जसजसा वाढत आहे तसतसा नक्षलवाद्यांचा प्रभाव कमी होत आहे. गेल्या आठवड्यात छत्तीसगडमध्ये २०८ नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केले.

(पान ४ वर)

---



**राज्यात नगरपरिषदा आणि नगरपंचायतींच्या निवडणुकांचे बिगुल वाजले असून, सदोष मतदारयादीवरुन सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झाडल्या जात आहेत. अशातच विशिष्ट समुदायांच्या मतांसाठी होणारे तुष्टीकरण, दुबार मतदारांची नोंदणी आणि धार्मिक ध्रुवीकरण हीच आता मविआसाठी आगामी निवडणुकीची रणनीती दिसते. भाजपच्या आशिष शेलार आणि अमित साटम यांनी विरोधकांच्या याच दुबार मतदानातून ‘व्होट जिहाद’च्या रणनीतीचा केलेला पर्दाफाश म्हणूनच महत्त्वाचा ठरावा.**

# दुबार मतदानातून ‘व्होट जिहाद’

वेध

**प्रतिनिधी**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जाहीर झाल्यानंतर भाजप नेते आशिष शेलार आणि मुंबई भाजप अध्यक्ष अमित साटम यांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेमुळे महाराष्ट्रातील निवडणूक प्रक्रियेतील एक अत्यंत गंभीर प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला. तो म्हणजे दुबार मतदारांची नोंदणी. या पत्रकार परिषदेत आशिष शेलार यांनी मुंबईसह काही मतदारसंघांतील मुस्लीम मतदारांच्या दुबार नोंदी नावासह दाखवल्या. अनेक मतदारसंघांत ज्या ठिकाणी मविआचे उमेदवार विजयी ठरले, त्या ठिकाणी अशा दुबार नोंदी विशेषत्वाने दिसत असल्याचे स्पष्ट करण्यात आले. हा मुद्दा केवळ राजकीय लाभासाठी उचलला गेला, असा आरोप आता विरोधक करत असले, तरी दुबार मतदानाच्या माध्यमातून जो ‘व्होट जिहाद’ करण्यात येत आहे, तो अमान्य करताच येत नाही. राज ठाकरे यांनी कल्याण ग्रामीण, डोंबिवली, मुरबाड-भिवंडीचा उल्लेख केला. त्यांना हिंदी-मराठी-दलित माणूसच दुबार मतदार म्हणून दिसला, यावर नेमकेपणाने बोट ठेवण्यात आले आहे. ठाकरे बंधूंनी या मतदारांना बडवण्याची भाषा केली. भूमिपुत्रांना फटकावण्याची भाषा ठाकरे आणि कंपनी करत असून, ही गंभीर बाब आहेत. भोईर, पाटील या हिंदू व दलित मतदार आणि मुस्लीम दुबार मतदार यांच्याबद्दलची ठाकरे आणि कंपनीची भूमिका वेगळी का? मुस्लीम मतदार हा मविआचा कडवा समर्थक, हे तुम्ही मांडू पाहात आहात का? हा ‘व्होट जिहाद’ आहे, असा घणाघाती आरोप आशिष शेलार यांनी केला आहे. दुबार मतदार हा मुद्दा गंभीर असेल, तर त्याची चौकशी ही सरसकटच व्हायला हवी. तथापि, मविआकडून या प्रश्नावर बोटचेपी भूमिका घेतली जाते. कारण, मुस्लीम आणि ख्रिश्चन मतदार ही त्यांची पारंपरिक ‘व्होट बँक’. म्हणूनच, या वर्गातील दुबार नोंदीकडे सोयीस्कररित्या डोळेझाक केली जाते. अर्थातच, तुष्टीकरणाच्या राजकारणाची परंपरा महाराष्ट्राला नवी नाही. महाराष्ट्रात गेल्या दोन दशकांत काही विशिष्ट मतदारवर्गाला चुचकारण्यासाठी, त्यांच्यावर कारवाई न करण्यासाठी मतदारयादीतील गोंधळावर मौन राखले गेले. भाजप नेते किरीट सोमय्या यांनी २०२४च्या लोकसभा निवडणुकीनंतर ‘व्होट जिहाद’ या संकल्पनेवर पुराव्यांनिशी प्रकाश टाकला होता. त्यांच्या मते, काही धार्मिक संस्थांमार्फत महाराष्ट्रातील काही भागात विशेषतः मालेगाव, नाशिक, मुंबई आणि अहमदाबादपर्यंत फण्डिंगद्वारे विशिष्ट मतदारांना मतदान करण्यासाठी तयार केले जात होते. सोमय्यांनी त्यावेळी १२५ कोटी रुपयांच्या फंण्डिंगचा उल्लेखदेखील केला होता. ‘ईडी’ आणि ‘एटीएस’ यांनी त्यादृष्टीने तपासही सुरू केला होता. मालेगावातील काही एनजीओ आणि तथाकथित शैक्षणिक ट्रस्टमार्फत हा पैसा वापरल्याचे काही पुरावेही मिळाले होते. या प्रकरणाने महाराष्ट्रातील ‘डेमोग्राफिक मॅन्युपलेशन’चा गंभीर प्रश्न निर्माण झाला होता. राहुल गांधी यांनी गेल्या काही काळात मतचोरीचे आरोप केले होते.

(पान ४ वर)

# ज्वालामुखी, वज्रेश्वरी आणि फ्रेंच राज्यक्रांती

विशेष
डॉ. हर्षल भडकमकर

**हिमाचल प्रदेशातले ज्वालामुखी देवीचे मंदिर वज्रेश्वरी म्हणून ओळखले जाते. शिवाय मुंबईजवळ वज्रेश्वरी देवीचे एक वेगळे मंदिर आहेच. ज्वालामुखी देवीच्या गाभाऱ्यात मूर्ती नसून अखंड फुटफुटणारी एक अग्निज्वाला आहे. वज्रेश्वरी देवीच्या गाभाऱ्यात मूर्ती आहेत. ज्वालामुखी देवी आणि वज्रेश्वरी देवीच्या परिसरात गंधकयुक्त पाण्याची अनेक कुंडे आहेत. म्हणजेच हजारो वर्षांपूर्वीच्या जिवंत ज्वालमुखींच्या उद्रेकांचे हे अवशेष आहेत. फ्रेंच राज्यक्रांतीचा ज्वालामुखीशी संबंध आहे. तो कसा? जाणून घेऊया...**



भगवान शंकर हा स्मशानवासी अवधूत. म्हणून राजा दक्षाने त्याला आपल्या यज्ञासाठी आमंत्रण केले नाही. आपल्या नवऱ्याचा हा अपमान सतीला म्हणजे पार्वतीला सहन झाला नाही. तिने प्राणत्याग केला. शिवाला जेव्हा हे कळले तेव्हा त्याने आपल्या गणांसह येऊन दक्षयज्ञाचा साफ विध्वंस केला. हे स्थान म्हणजे आजच्या हिमाचल प्रदेशातील बियास नदीच्या खोऱ्यातील, कांगडा (कांग्रा) जिल्ह्यातील ज्वालामुखी हे होय.

इथे गाभाऱ्यात सुमारे तीन फूट खोल असे एक कुंड आहे. त्यातली अग्निज्वाला सतत फुटफुटत असते. ती ज्वाला हेच माता पार्वतीचे रूप मानले जाते. म्हणून त्या स्थानाला ज्वालामुखी माता मंदिर असेच म्हणतात. वैज्ञानिकांच्या मते पृथ्वीवर २ कोटी ६० लक्ष वर्षांपूर्वी प्लेईस्टोसिन नावाचे हिमयुग होते. त्या काळात या परिसरात ज्वालामुखीचे उद्रेक, भूकंप इत्यादी फार मोठ्या भूवैज्ञानिक हालचाली होऊन गेल्या असाव्यात. त्यांचा अवशेष म्हणजे ही अखंड तेवणारी ज्वाला होय. अनेकांच्या मते ती एकच अग्निज्वाला नसून त्या एका मोठ्या ज्वालेच्या ९ जिव्हहा किंवा जिभा आहेत.

वैज्ञानिकांच्या मते त्या ठिकाणी भूगर्भात नैसर्गिक वायूचा मोठा साठा आहे. मुंबईजवळ पालघर जिल्ह्यातील भिवंडी तालुक्यात वज्रेश्वरी हे जगदंबेचे मोठे जागृत स्थान आहे. तानसा नदीच्या तीरावर वसिष्ठ ऋषींनी मोठा यज्ञ मांडला होता. देवराज इंद्राला त्यांचा मत्सर वाटून त्याने यज्ञाचा विध्वंस करण्यासाठी आपले अमोघ वज्र सोडले. तेव्हा ऋषींनी जगदंबेचा धावा केला. जगदंबेने तिथे प्रकट होऊन वज्र गिळून टाकले आणि ऋषींसह यज्ञाचे रक्षण केले. म्हणून ती वज्रेश्वरी किंवा वज्राबाई. वज्रेश्वरीच्या आसपास कुठेही ज्वालामुखी होते, असा पुरावा अद्याप तरी सापडलेला नाही. परंतु गंधकयुक्त गरम पाण्याचे झरे, ज्वाला उन्हाळे असे म्हटले जाते, ते भरपूर आहेत.

अर्थात ज्या सह्याद्री पर्वताच्या पश्चिमेला वज्रेश्वरी किंवा एकंदर कोकणपट्टी आहे, तो सह्याद्री पर्वत सुमारे १५ कोटी वर्षांपूर्वी ज्वालामुखीतूनच निर्माण झाला आहे, असे वैज्ञानिकांचे मत आहे. आता आपण फ्रेंच राज्यक्रांतीकडे वळू. सन १७८९ यावर्षी फ्रान्समधल्या सर्वसामान्य माणसाने जुलमी राजेशाहीविरुद्ध उठाव करून राजे- राण्या-सरदार यांची वर्षानुवर्षांची हुकूमशाही मोडून काढली. अनेक विचारवंतांनी या क्रांतीमध्ये सहभागी होत, 'स्वातंत्र्य, समता आणि बंधुता' हा एक नवाच मंत्र एक प्रकारे संपूर्ण जगातल्या सामान्य जनतेला दिला. ते विचारवंत क्रांतिकारक ही सामान्य जनतेची राजवट टिकवू शकले नाहीत, हा भाग अलहिदा. पण आपण मनात आणले तर राजसत्ता उलथून पाडू शकतो, हा आत्मविश्वास आधुनिक युरोपीय सामान्य माणसाला फ्रेंच राज्यक्रांतीने दिला, हे तिचे महत्त्व.

या राज्यक्रांतीच्या वेळी सोळावा लुई हा फ्रान्सचा राजा होता. मारी आंत्वानेत किंवा इंग्रजी उच्चारानुसार मेरी अँटोनिट ही त्याची राणी होती. राजा-राणी आणि त्यांचे सरदार हे अखंड सुखोपभोग आणि विलासात मग्न असत. सर्वसामान्य जनतेपासून, लोकांच्या हीनदीन अवस्थेपासून ते इतके तुटून गेले होते की, गरिबी म्हणजे काय, एखाद्याला रोजचे जीवन जगण्यासाठी अत्यावश्यक असणारा जो पाव किंवा ब्रेड तोसुद्धा मिळू शकत नाही, म्हणजे काय, याचे त्यांना आकलनच होत नव्हते. त्यामुळे काही गरीब माणसांचा एक जत्था मेरी अँटोनिटकडे जाऊन तिला म्हणाला, 'राणी सरकार आम्हाला साधा पावसुद्धा मिळत नाही.' तेव्हा ती म्हणाली, 'तुम्हाला पाव मिळत नसेल, तर केक खा.' अशा अनेक घटना घडून अखेर सामान्य फ्रेंच माणूस भडकून उठला आणि फ्रेंच राजघराण्यासह असंख्य सरदार- जहागीरदार- जमीनदार यांची आहुती पडली.

फ्रेंच राज्यक्रांतीच्या या ज्वालामुखीमध्ये राजकीय, सामाजिक जुलूम, अन्याय यांच्याचबरोबर एक खराखुरा नैसर्गिक ज्वालामुखी कारणीभूत ठरला होता. युरोप खंडाच्या उत्तर टोकाला; अटलांटिक महासागर आणि आर्क्टिक महासागर यांच्या सीमेवर, उत्तर धुव्र प्रदेशाच्या अगदी जवळ आईसलँड नावाचा देश आहे; किंबहुना सुमारे १ लाख ३ हजार चौरस किमी क्षेत्रफळाचे ते एक अवाढव्य बेटच आहे.

बर्फाने झाकलेला भूप्रदेश आणि ओसाड खडकाळ पठारे यामुळे आईसलँडची ७५ टक्के भूमी निर्मनुष्य आहे. इथे कोणतीही नाव घेण्यासारखी पिके घेता येत नाहीत. त्यामुळे मासेमारी हाच इथला मुख्य व्यवसाय आहे. आता पुढची गंमत पहा. आईसलँडच्या भूपृष्ठावर अनेक ठिकाणी किमान १ किमी एवढ्या जाडीचे बर्फाचे थर आहेत. पण तरीही या देशातले किमान ३४ ज्वालामुखी हे जागृत आहेत; किंबहुना संपूर्ण आईसलँड बेट हे ज्वालामुखीतूनच निर्माण झालेले आहे.

सन १७८३ साली आईसलँड वरचा लाकी या नावाच्या ज्वालामुखीचा इतका जबरदस्त उद्रेक झाला की, त्याच्या धुळीने आणि सल्फर डाय ऑक्साईड युक्त राखेने संपूर्ण उत्तर गोलार्धाची हवा बदलून गेली. तापमानात लक्षणीय घट झाली. परिणामी संपूर्ण युरोप खंड दुष्काळाच्या तडाख्यात सापडले. फ्रान्सची भूमी चांगली सुपीक आहे, इंग्लंडसारखी नापीक, बरड नव्हे, पण फ्रान्समध्येही शेतीचे अतोनात नुकसान झाले. ज्या गव्हाच्या पिठाचा पार बनणार, तो गहूच जर पिकला नाही, तर पाव बनवणार कशाचा? जो थोडाफार गहू आयात केला गेला असेल, त्याचा बनलेला पाव अर्थातच राजे- राण्यांना पहिल्यांदा दिला गेला. मग गरिबांनी काय खावे? असो.

या ज्वालामुखी आणि राज्यक्रांतीबद्दलच्या माहितीचा वर्तमान संदर्भ डॉ. मिचेली पार्क या आईसलँडच्या महिला हवामान शास्त्रज्ञाच्या ताज्या संशोधनाशी आहे. डॉ. मिचेली यांना असे आढळले की, आईसलँडमध्ये एकंदर ३४ जवालामुखी जागृत असले, तरी १९७० नंतर म्हणजे गेल्या ५५ वर्षांत कुणाचाही उद्रेक झालेला नाही. पण गेल्या १० वर्षांत वैश्विक तापमान वाढीमुळे आईसलँडच्या भूपृष्ठावरचे बर्फ झपाट्याने वितळते आहे. म्हणजेच भूपृष्ठावरचा बर्फाच्या दाब सतत घटतो आहे. त्यामुळे ज्वालामुखींमधला मॅग्मा नामक पातळ खडक किंवा शिलारस हा वेगाने ज्वालामुखीच्या तोंडाकडे येतो आहे.

भूगर्भात मॅग्माची निर्मितीही वेगाने होत आहे. म्हणजे आईसलँडच्या जमिनीवरचा बर्फाचा दाब कमी होणे याचा दुसरा अर्थ ज्वालामुखीच्या उद्रेकाला आमंत्रण देणे, असा असू शकतो.

या निष्कर्षाचा प्रतिवाद केला जाऊ शकतो. सन १७८३ साली जेव्हा लाकी ज्वालामुखीने संपूर्ण युरोप खंडावर दुष्काळाचे संकट आणले, तेव्हा औद्योगिक क्रांती झालेली नव्हती. त्यामुळे वैश्विक तापमान वाढ ग्लोबल वॉर्मिंग झालेले नव्हते. ग्लेशियर वितळून भूमीवरचा बर्फाचा दाब कमी झालेला नव्हता. तरीही मॅग्मा उर्फ शिलारसाची भूगर्भातली निर्मिती वाढून त्याचा भीषण उद्रेक झालाच ना? मग त्याची कारण काय होती?

वैज्ञानिकांमध्ये अशी संशोधने, त्यावरील वाद आणि प्रतिवाद होतच राहतील. प्रगत देश एकीकडे ग्लोबल वॉर्मिंगवर आंतरराष्ट्रीय परिषदा घेताना, दुसरीकडे तापमान वाढीला मुख्यतः जबाबदार असलेली आपली चंगळवादी जीवनशैली चालूच ठेवतील.

रेफ्रिजरेटरमधला क्लोरोफ्लुरोकार्बन हा वायू खूप प्रदूषण करतो. मग तुम्हीआम्ही घरातला फ्रीज काढून टाकणार आहोत. का? छे:! शक्य झाले तर प्रत्येक खोलीत एक फ्रीज ठेवू. (लेखक प्रसिद्ध स्तंभलेखक आहेत.)

---

# महालक्ष्मीचा प्रसाद

सुखात्म
डॉ. अविनाश मोहरील



महालक्ष्मी पूजनाच्याच दिवशी माझ्या मुलीला पुण्याला जायचे होते. सकाळी घरी पूजन करून आणि त्यानंतर प्रसाद घेऊन ती सायंकाळी बसने जाणार होती. तिला सोडण्यासाठी मी खाजगी बसच्या स्टॉपवर गेलो. गाडीला जरा उशीर होता. मी आपले माझ्या सवयीनुसार आजूबाजूला सुरू असलेल्या गोष्टींचे निरीक्षण करीत उभा होतो.

महालक्ष्मीचा सण यावेळी आठवडा संपताना आला असल्याने गाव सोडून परगावी राहणारी अनेक मंडळी उद्यापासून सुरू होणाऱ्या आठवड्याचा पहिला दिवस पकडण्याकरिता परत निघाली होती. खाजगी बसचालकांसाठी आजचा दिवस म्हणजे सुकाळ होता.

आजच्या दिवशी त्यांनी भाडे वाढवून सांगितले तरी लोक ते द्यायला तयार असतात व म्हणून त्यांनी सर्वांनी नेहमीपेक्षा काही जादा गाड्या सोडल्या होत्या. एकंदरीत खाजगी बस प्रवास व्यवसायाशी निगडित सारेच लोक आजच्या दिवशी फारच व्यस्त होते. परंतु या व्यस्ततेमुळे त्यांना कधी कधी काही महत्त्वाच्या गोष्टींना मुकावे लागते. असाच एक माणूस व त्याचा परिवार मला दिसला, ज्यांनी आजच्या दिवशी काहीतरी मिळविण्याकरिता काहीतरी गमावले होते.

खरे तर त्यांनी जे गमावले ते सर्वसामान्यपणे गमावू नये अशा प्रकारचे होते. परंतु काहीतरी मिळविण्यासाठी काहीतरी गमवावे लागणे हा आपल्या जगातील जगण्याचा नियमच आहे. त्या माणसाच्या त्या कृतीबाबत मला योग्य ती प्रतिक्रिया देता आली नाही; जे माझ्या डोळ्यासमोर घडले त्याने मी विचारात मात्र पडलो. महाराष्ट्रात आणि त्यातल्या त्यात विदर्भात महालक्ष्मी पूजन हा एक फार मोठा सण मानला जातो व तो विशेषतः महाप्रसादाकरिता प्रसिद्ध आहे. ज्यांच्या घरी महालक्ष्मी बसतात त्यांच्या घरचा हा सण केवळ त्यांचा नसून अनेकांचा असतो. जुन्या काळापासून सर्वांच्या सहकार्याने साजरा केला जाणाराच हा सण आहे. आपण आता त्यात काही बदल स्वीकारले, परंतु महालक्ष्म्याच्या महाप्रसादाचे महत्त्व मात्र कमी झालेले नाही. जी मंडळी एखाद्या घरी प्रसादाकरिता जातात त्यांनी त्या घरी गेलेच पाहिजे, असा प्रघात आहे. त्यामुळे वर्षानुवर्षे प्रसादाचा लाभ प्राप्त करण्याचा आनंद व यजमानाला त्या प्रसादाची व्यवस्था करण्याचा आनंद कायम मिळत राहतो.

अनेक लोक आपल्या या पारिवारिक सणाकरिता खास सुट्या काढून येतात. काहीही झाले तरी महालक्ष्मीचे पूजन व प्रसाद चुकवायचा नाही अशीच पद्धत विदर्भात प्रसिद्ध आहे. कधी कधी हा महालक्ष्मीचा प्रसाद वेगळ्या स्वरूपात मानून कार्य करणारी मंडळी भेटली की, मग एका बाजूने त्यांच्या व्यावहारिकतेचे आश्चर्य वाटते व दुसऱ्या बाजूने त्यांनी दिलेला तर्क पटून जातो. काय योग्य नि काय अयोग्य हे ठरविणे कठीण जाते. असाच काहीसा तो प्रसंग मी अनुभवला जेव्हा त्या ड्रायव्हरने अगदी माझ्या गाडीच्या मागेच त्याची भली मोठी बस आणून उभी केली.

नागपूरहून पुण्याला जाणारी एका प्रसिद्ध ट्रॅव्हल्स कंपनीची ती बस अगदी माझ्या गाडीच्या मागे उभी राहिली. आम्ही सर्व माझ्या पोरीच्या बसची वाट बघत होतो. रस्ता वाहता होता. ती गाडी थांबली तेव्हा ड्रायव्हरच्या बाजूने एक बाई आपल्या मुलाला व मुलीला घेऊन उभी होती व ड्रायव्हरशी तिचा संवाद सुरू होता. त्यामुळे मुलांकडे तिचे लक्ष नव्हते. मी त्या बाईला आवाज देऊन मुलांना सांभाळायला सांगितले. कारण फारच रहदारी होती. मी तसे म्हटल्यामुळे तो ड्रायव्हर खाली उतरला व गाडीच्या समोर येऊन त्या बाईशी आणि मुलांशी बोलू लागला. मुलांना कडेवर घेऊन त्याने त्यांचा लाड केला. काहीतरी छत्रीसारखे खेळणेदेखील त्याने दोन्ही मुलांकरिता आणले होते.

एकंदरीत त्याच्या वागण्यावरून व बोलण्यावरून तो त्या बाईचा पती आहे, हे माझ्या लक्षात आले. ती डोळे पुसत पुसत त्याच्याशी बोलत होती. ते सारे माझ्या इतक्या जवळ उभे होते की, मला सारे काही ऐकू येत होते. तिची तक्रार सुरू होती. एवढा मोठा सण झाला आज घरी, सगळे जण आले होते आपल्या मोठ्या घरी; फक्त तुम्ही नव्हते.

सगळे लोक तुमची आठवण काढत होते. काय सांगायचे मी? आजच्याही दिवशी सुट्टी घेत नाही म्हणजे खूप झाले. आज तर सगळ्या जोडप्यांना सोबत बसवले होते जेवायला, मी मात्र बसली एकटी. अशाने कसे व्हायचे? तुम्ही माझ्या मनाचा काही विचारच करत नाही. महालक्ष्मीचा प्रसाद मला असा डब्यात आणावा लागतो आणि रस्त्यावर द्यावा लागतो. भेटही किती वेळ तर पाच मिनिटे वगैरे वगैरे.

पतीच्या अनुपस्थितीमुळे साधारणपणे रागावलेली पत्नी जशी तक्रार करेल तसेच ते होते. जरा वेळ आपल्या पोरांचा लाड करता करता त्या ड्रायव्हरने तिचे ऐकून घेतले व नंतर त्याने तिला उत्तर दिले. ते उत्तर ऐकूनच मी जरा विचारात पडलो. त्याच्या पत्नीने केलेली तक्रार अत्यंत रास्त होती व अशा महत्त्वाच्या सणाला घरच्या माणसाने हजर न राहणे ही बाब तशीही जरा खटकणारी होती. त्या ड्रायव्हरचे उत्तर ऐकल्यावर मात्र आपल्याला वाटतात तशाच साऱ्या गोष्टी असतात असे नाही हे मला कळले. प्रत्येकच गोष्टीला एक वेगळा दृष्टिकोन असतो, याचा मला प्रत्यय आला.

थोडा वेळ आपल्या पत्नीची तक्रार ऐकल्यानंतर तो तिला म्हणाला, तुला काहीच समजत नाही. आज सर्वात जास्त ट्रॅफिक असते म्हणून आम्हाला सुटी मिळत नाही. आमच्या मालकाने सांगितले की, आज जर सुटी घेतली तर नुकसान होईल, पण कामावर आलो तर फायदाच आहे.

आजच्या ट्रीपचे मला चार हजार रुपये जास्तीचे मिळणार आहेत. पगाराशिवाय. कळते का? चार हजार म्हणजे आपल्या पोराची शाळेची अर्धी फी होऊन जाते. अशा सणासुदीच्या दिवशी जास्त ट्रॅफिक असते आणि काही ड्रायव्हर येतच नाही कामावर. मग मी आलो तर असा फायदा होतो. माझ्या नेहमीच्या पगारात आपले भागते काय? मग असे पैसे वर्षातून चार-पाच वेळा मिळाले तर पोरांची फी होऊन जाते. महालक्ष्मीच्या प्रसादाला मी हजर नाही तर नाही. हा प्रसादच आहे आपल्यासाठी जो महालक्ष्मीमुळेच मिळतोय.

चल आता वेळ झाला. दे डबा, जेवायला थांबलो की मी खाऊन घेईन. चलतो... लगेचगाडीत बसून आपल्या पत्नीला व पोरांना टाटा करून तो ड्रायव्हर पुण्याच्या दिशेने रवाना झाला. महालक्ष्मीचा प्रसाद सोबत घेऊन किंवा महालक्ष्मीमुळे प्रसाद मिळवायला.

तो पुण्याच्या दिशेने रवाना झाला खरा; पण माझ्या मनात मात्र विचारांचा काहूर माजला. घरच्या महालक्ष्मीच्या पूजनाकरिता व प्रसादाकरिता काहीही झाले तरी हजर राहणे ही भावनिक स्थिती योग्य की त्याच महालक्ष्मीच्या सणाच्या दिवशी बस चालविल्यामुळे जास्त पैसे मिळतात म्हणून कामावर जाणे ही व्यावहारिक स्थिती योग्य? महालक्ष्मीचा प्रसाद कोणता? परमेश्वराचे अस्तित्व आणि ती संकल्पना आपण कोणत्या स्वरूपात स्वीकारतो, यावर हे सारे अवलंबून आहे. याकरिता आपल्या व्यक्तिगत विचारांची जडणघडण कशा प्रकारे झालीय यावर बरेच काही अवलंबून आहे. हा परमेश्वराच्या प्रसादाचा विचार प्रत्येक व्यक्तीचा स्वतंत्र व वेगवेगळा असतो. एकाच परिवारात या संदर्भात वेगवेगळी मते असतात. यात खरे तर योग्य किंवा अयोग्य ठरवता येऊ शकत नाही. निदान या संदर्भात तरी प्रत्येकाचे स्वतंत्र मत राहूच शकते.

महालक्ष्मीच्या पूजन व प्रसादाकरिता प्रत्यक्ष हजर राहायलाच हवे किंवा या निमित्ताने चार पैसे जास्त मिळतात तर त्या पैशांनाच प्रसाद समजून घरी अनुपस्थित राहणे ही दोन वेगळी व स्वतंत्र मते आहेत. त्या प्रत्येक मताचा सन्मान व्हावा व प्रत्येकाला आपल्या मताप्रमाणे वागण्याचे स्वातंत्र्य मिळावे, हेच सर्वथा योग्य ठरेल. असे झाल्यासच महालक्ष्मीचा प्रसाद दोन्हीही मते धारण करणाऱ्यांना मनोभावे स्वीकारता येईल.

---

# विवाह - १

संस्कारांच्या देशा
रमा गोळवलकर



कार्तिक शुद्ध एकादशीपासून पौर्णिमेपर्यंत तुळशी विवाहाचा कुलाचार होतो आणि त्यानंतर पुढचे साधारण सात-आठ महिने विवाहाचे मुहूर्त असतात. ही परंपरा भारतीय उपमहाखंडात गेल्या अनेक शतकांपासून अनुसरली जाते आहे. विवाह हा विषय गेल्या अनेक सहस्रकांपासून समाजासाठी अत्यंत महत्त्वाचा मानण्यात आलेला आहे. त्यावर जगभरातील अनेक महनीयांनी आपापले विचार मांडले आहेत आणि आजही मांडत आहेत. कारण विवाह म्हणजे एक स्त्री आणि एक पुरुष यांच्यात घडणाऱ्या शारीरिक संबंधांना आणि त्यातून उत्पन्न होणाऱ्या प्रजेला वैध (लेजिटिमेट) मानून त्यांच्या सर्व प्रकारच्या अधिकारांना सामाजिक मान्यता देणारी व्यवस्था आहे. या प्रकारची व्यवस्था सर्वच प्राचीन संस्कृतींत असल्याचं दिसतं.

विवाह या विषयावर सर्वच प्राचीन संस्कृतींनी आपापली मतं, विचार आणि आचार यांची जंत्री प्रस्तुत केलेली आहेत. रिलीजन्स (ज्यू आणि ख्रिस्ती) मध्ये लग्न म्हणजे देवाच्या आज्ञेनं निर्माण झालेला दैवी बंध असं मानतात. दोघांनी मिळून एकमेकांची काळजी घ्यावी आणि मुलं जन्माला घालावी. त्यांचं संगोपन करावं यासारखे सामान्य नियम असले, तरीही बायबलवर आधारित शिकवणीत साधारणपणे बायको ही नवऱ्याची संपत्ती आहे, हे तत्त्व अंतर्निहित आहे. त्यामुळे मुलीच्या वडिलांकडून किंवा पालकांकडून मुलीचा मालकी हक्क मिळवणं अपेक्षित आहे. त्यासाठी त्यांना विशिष्ट रक्कम देण्याचं कबूल केल्यानंतरच लग्न होतं. परंपरागत ख्रिस्ती रिलीजनमध्ये पती-पत्नीत असलेला दैवी बंध कधीच तुटत नाही त्यामुळे त्यांच्या संबंधविच्छेद होत नाहीत. पण एकाच पुरुषानं अनेक स्त्रियांशी लग्न करणं ही सर्वसामान्य बाब होती.

मज़हबमध्ये स्त्री आणि पुरुष एकमेकांशी संबंध ठेवण्याचा अनुबंध म्हणजे कॉन्ट्रॅक्ट करतात. त्याला 'निकाह' म्हणतात. पुरुषाचं घर सांभाळणं, त्याच्या विविध गरजा भागवणं आणि त्याच्यापासून संतती जन्माला घालणं या सारख्या कामांच्या मोबदल्यात पती पत्नीचं भरण पोषण करण्याचं शिवाय एक विशिष्ट रक्कम मेहर म्हणजे भरपाई देण्याचं मान्य करतो. निकाहच्या दिवशीच किंवा संबंधविच्छेद होईल त्यावेळी ही मेहरची रक्कम द्यावी लागते. याही विचारधारेत निकाहमध्ये असलेली स्त्री म्हणजे ज़ौजा आणि निकाह केलेला पुरुष म्हणजे शौहर किंवा खाविंद म्हणजे मालक. ज़ौजा नेहमीच शौहरच्या अधिसत्तेखाली राहणारी असते. तिला त्याच्या इच्छेला नकार देता येत नाही.

शोहर तिला कधीही तलाक आणि मेहर देऊन निकाहातून मोकळा करू शकतो. तिला मात्र त्याला तलाक देण्याचा अधिकार नाही. तिला मिळतो तो 'खुला' ज्यात संबंधविच्छेद करण्याची भरपाई म्हणून मेहरचा अधिकार सोडून द्यावा लागतो. या तीनही मतप्रवाह पुनर्जन्म मानत नसल्यामुळे पती-पत्नीचा संबंध फक्त या एकाच जन्मापुरता असतो. या सगळ्या पृष्ठभूमीसह भारतीय चिंतकांनी 'विवाह' या संकल्पनेविषयी काय विचार मांडले आहेत ते जाणून घेणं अधिक रोचक ठरेल. सर्वात महत्त्वाचा बिंदू म्हणजे सनातन धर्मात विवाह हा एक संस्कार आहे. संस्कार म्हणजे प्रक्रिया. मानवी जीवन अधिक परिष्कृत, अधिक समृद्ध, अधिक अर्थपूर्ण करण्यासाठी जे जे काही आवश्यक आहे ते ते सारं अंगीकारणं म्हणजे संस्कारित होणं.

मग प्रत्येक मानवाला त्याच्या सभोवती वावरणारे इतर मानव सुसंगत अर्थात ज्यांची संगत चांगली आहे असे असायला हवेत. त्यातून परस्पर साहचर्य, मैत्री आणि सहकार्य या सारख्या अमूर्त तरीही अत्यावश्यक भावनिक गरजा पूर्ण होतात. एका सुदृढ समाजाची रचना होते म्हणून कुटुंब व्यवस्था आवश्यक आहे.

एक युवक आणि एक युवती एकत्र येऊन एका कुटुंबाची स्थापना करतात. त्यानंतर ही दोघं एकमेकांच्या स्वभावाला, बुद्धीला, वृत्तीला (उपजीविका), वर्तणुकीला, स्वास्थ्य आणि आरोग्याला, प्रजननाला, दु:खापत्ती इत्यादींशी संघर्ष करत करण्याच्या कर्तव्यपूर्तीला, सुखोपभोगाला पूरक आणि प्रेरक अशी भूमिका पार पाडत असतात. त्यांच्या या सहजीवनाला समाजाची मान्यता मिळण्यासाठी विवाह हा संस्कार योजण्यात आलेला आहे. या संस्कारात करण्याचे विधी, आजकालच्या भाषेत इव्हेंट, जरी एक ते पाच दिवस चालणारे असले, तरी विवाह मात्र सात जन्माचं बंधन आहे, असं सनातन धर्म मानतो. किंबहुना विवाहानंतर पत्नी ही पतीची अर्धांगिनी म्हणवते. 'अर्धांगिनी' या शब्दाची मेख अशी की, पत्नी आपल्या संपूर्ण स्थूल-सूक्ष्म, अंतर्बाह्य व्यक्तिमत्त्वासह पतीच्या अस्तित्वात सामावते.

त्याला आपलंसं करत, त्याच्या सगळ्या न्यूनता, दोष, उणिवा भरून काढते. त्याच्या व्यक्तिमत्त्वाला संतुलित आणि पूर्ण करते. थोडक्यात तिच्याशिवाय तो अपूर्णच आहे, तिच्यामुळेच त्याला परिपूर्णता लाभते. हा सगळा विचार या एका शब्दात संपादलेला आहे. जी युवती विवाह करणार असते ती वधू. वृध् म्हणजे विस्तारणे, वाढणे या मूळ धातूपासून तयार झालेला हा शब्द विवाह झाल्यानंतरची अवस्था सूचित करणारा आहे. ती वंशवृद्धी करण्यास, संसाधनसामग्री-संपत्तीचा यथायोग्य वापर करून कुटुंब आणि समाज अभिवृद्ध, समृद्ध करण्यास उत्सुक अशी ती वधू! तिच्या या प्रवासात तिचा जोडीदार कोण असेल हे ती निवडते म्हणून तो 'वर'. मूळ धातू आहे 'वृ' म्हणजे निवडणे, पसंती देणे. उपलब्ध असलेल्या सर्व पुरुषांमधून वधू एकाची निवड करते म्हणून त्याला 'वर' म्हणतात. याचा नेमका अर्थ असा की, विशुद्ध सनातनी विचारांत आपला पती कोण असेल, याच्या निवडीचा अधिकार अविवाहित तरुणीचा आहे.

प्राचीन भारतीय परंपरेत तो प्रकर्षानं दिसूनही येतो. वानगीदाखल, दक्ष प्रजापती आणि त्याची पत्नी प्रसूतीच्या मनाविरुद्ध त्यांच्या मुलीनं सतीनं शंकराची निवड केली. दुसऱ्या जन्मात पार्वतीनं तर शंकरच पती म्हणून लाभावा यासाठी अघोर पंचाग्नी साधना केली. सावित्रीनं सत्यवानाची निवड केली तर रुक्मिणीनं श्रीकृष्णाची.

तर मग हे वधू आणि वर एकत्र येऊन जो पहिला संस्कार संपन्न करतात त्याविषयी अधिक जाणून घेऊ या पुढच्या लेखात. तो वर लग्नसराईचे दिवस मनसोक्त उपभोगू या!

उगवतीचे रंग
विश्वास देशपांडे
भ्र. ९४०३७४९९३२

# सुखी जीवनासाठी नवी एबीसीडी...



शाळेत असताना आपला आणि इंग्रजी मुळाक्षरांचा परिचय होतो. आपण शिकतो for apple, B for Ball... पण मोठं झाल्यावर आयुष्य आपल्याला नवे धडे शिकवतं- आरोग्य टिकवण्यासाठी आणि मनःशांती राखण्यासाठी 'नवी एबीसीडीई' शिकणं आवश्यक होतं. आजच्या धकाधकीच्या काळात हीच एबीसीडीई नव्या अर्थानं समजून घेऊ या... ही एबीसीडीई मी सांगत नसून प्रसिद्ध डॉ. ह. वि. सरदेसाई यांनी ती त्यांच्या एका लेखातून एकदा सांगितली होती. त्यातच माझ्या परीने थोडीशी भर घालून आपल्यासमोर ठेवण्याचा हा प्रयत्न आहे.

## A -nwiery टाळा

चिंता आणि चिता यात फक्त एका अनुस्वाराचा फरक असतो. अति चिंता चितेकडे घेऊन जाते. हे वाक्य फक्त केवळ लिहिण्यासाठी किंवा बोलण्यासाठी सुंदर आहे म्हणून नाही, तर ते जीवनातील वास्तवाचे निदर्शक आहे. सततची चिंता माणसाला पोखरत जाते. आपल्या लक्षात येत नाही पण ती हळूहळू व्यक्तीचं मानसिक आणि शारीरिक स्वास्थ्य झिजवत नेते. जीवनातील उत्तम कामगिरीसाठी थोडी चिंता, थोडा ताण आवश्यकच असतो. एखादी परीक्षा, कामाची डेडलाइन, नात्यातील ताण या गोष्टींनी थोडा काळ बेचैनी येणं स्वाभाविक आहे. पण त्याचं ओझं हृदयावर सतत बाळगणं, यामुळे रक्तदाब, झोपेच्या तक्रारी, चिडचिड, थकवा सुरू होतो.

एक उदाहरण म्हणून आपण एका तरुण आयटी प्रोफेशनलची कल्पना करू या... तो उत्तम कमावतो, पण 'परफॉर्मन्स रेटिंग'च्या ताणात, प्रमोशनच्या धास्तीने रात्री झोप येत नाही. मग तब्येतीच्या तक्रारीवर डोकं काढायला सुरुवात करतात. हळूहळू ॲसिडिटी, डोकेदुखी, कोलेस्टेरॉल वाढू लागतं... चिंता हे एक दिसणारं नाही, पण झिरपत जाणारं विष आहे. म्हणूनच मन मोकळं ठेवा, दिवसातून काही वेळ स्वतःसाठी ठेवा आणि 'काय शक्य आहे' यावर लक्ष केंद्रित करा.

## B - Bortle पासून दूर रहा

आजकाल दारूला प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे. पूर्वी एकत्र येण्यासाठी चहा किंवा जेवण या गोष्टी पुरेशा होत्या. पण आज मात्र उच्चभ्रू समाजात, कार्पोरेट जगतात मदिरापान हा पार्टीचा अविभाज्य भाग झाला आहे. दारूचे ग्लास अनेकदा संवाद कमी करतात, आणि भिंती उंचावतात. 'फक्त स्ट्रेस मिटवायला' म्हणून सुरू झालेली सवय अनेकदा व्यसनात बदलते. कुटुंबातील संवाद तुटतात, अपघात होतात, आरोग्य हळूहळू ढासळतं. सुरुवातीला हौस किंवा चेंज म्हणून घेतलेला 'एकच प्याला' आयुष्याची बरबादी करायला पुरेसा ठरतो.

## C - Cigarerte नाहीच

सिगारेट ओढणं म्हणजे हळूहळू आत्महत्येची तयारी करणं. सिगारेट सुरू करणार्यांना अनेक कारणं असतात. दोस्तांचा दबाव, ट्राय करायचं म्हणून किंवा स्ट्रेस मॅनेजमेंटसाठी. पण यातून निर्माण होणारं व्यसन हे शरीराच्या प्रत्येक पेशीवर आघात करतं. फुफ्फुसं, हृदय, घशा, तोंड प्रत्येक ठिकाणी त्याचे दुष्परिणाम दिसू लागतात. आज अनेक युवक ट्रेंडी वाटण्यासाठी किंवा लेश्र दिसण्यासाठी सिगारेटकडे वळतात. मुले आणि माणसांबरोबरच मुली आणि स्त्रिया देखील धूम्रपान करताना आढळून येतात. सिगारेट ओढणार्याला तर त्याचे दुष्परिणाम भोगावे लागतातच पण त्याच्या आजूबाजूला लोकांना देखील त्याचा त्रास होतो. ते पॅसिव्ह स्मोकर बनतात. सिगारेट म्हणजे कर्करोगासारख्या भयानक रोगांना आमंत्रणच!

## D - Diet म्हणजे आपलं खाणं सांभाळा

आजच्या 'फास्ट फूड'च्या युगात आरोग्य 'स्लो डाऊन' होतंय. डाएट म्हणजे उपवास नव्हे, तर सजगता. पिझ्झा, बर्गर, सॉफ्ट ड्रिंक्स रोजचं झालं की, पचनसंस्था, रक्तातील साखर, कोलेस्टेरॉल यावर परिणाम होतो. ताटात रंगीत चिप्स असतात, दिसायला आकर्षक पण पोषणमूल्य हरवलेल्या. आपल्या रोजच्या जेवणात विविध रंगांच्या ताज्या भाज्या, फळं असावीत. ती आरोग्यदायी असतात. आपल्या पूर्वजांची ही साधी सोपी शिकवण आपण विसरलो आणि जंक फूड, फास्ट फूड आपल्याला आवडायला लागलं. ते एखादे वेळी चवबदल म्हणून ठीक आहे. पण त्याच्या अतिसेवनाने दुष्परिणाम आता शालेय विद्यार्थ्यांवरही जाणवू लागले आहे. त्यामुळे लहान वयातच लठ्ठपणा, मधुमेहासारख्या आजारांना सामोरे जावे लागत आहे. तज्ज्ञांनी वारंवार इशारे देऊनही याकडे दुर्लक्ष केले जाते.

## E - Ewerbire अनिवार्य

शरीर ही निसर्गानं किंवा विधात्यानं आपल्याला दिलेली एक अनमोल देणगी आहे.उत्तम आरोग्य कोणत्याही दवाखान्यात वा मेडिकल स्टोअर्सवर विकत मिळत नाही. शरीर हे एखाद्या यंत्रासारखं आहे. एखादं यंत्र वापरलं नाही तर गंजतं. आपल्या शरीराचंही तसंच आहे. रोजची ३० मिनिटांची चाल, साधी योगासने आणि प्राणायाम, एखादा आवडता खेळ. यामुळे फक्त वजनच नाही, तर मनही हलकं राहतं. एखादी गृहिणी जर सकाळी घरात कामं करतानाही लयीत आनंदाने काम करत असेल, तर तोही एक व्यायामच! आजकाल टीव्हीसमोर तासनतास बसून राहणं, मोबाईलमध्ये वेळ घालवणं यासारख्या गोष्टींमुळे व्यायामाकडे दुर्लक्ष होते. चालण्यासाठी साधी नैसर्गिक गोष्ट देखील आपण विसरून गेलो आहोत. आपल्याला ती व्यायाम म्हणून सांगावी लागते. आजच्या ऑफिस कल्चरमध्ये आठ तास खुर्चीत बसणं सामान्य झालंय. मग पाठदुखी, मानदुखी आणि डोळ्यांवर परिणाम हे होणं साहजिकच. व्यायाम म्हणजे फक्त 'सिक्स पॅक'साठी नाही, तो तुमच्या उत्तम आरोग्यासाठी, आनंदी जीवनासाठी आवश्यक आहे. 'Healthÿ mind in healthÿ body.'

ही 'नवी एबीसीडीई' म्हणजे आरोग्याची मुळाक्षरे आहेत. अर्थात यात मी काही नवीन सांगितले आहे असे नाही. या सगळ्या गोष्टी आपल्या सगळ्यांना माहिती आहेतच पण तरीही काही चांगल्या गोष्टी पुन्हा पुन्हा सांगाव्या लागतात. मित्रांनो, या छोट्याशा पद्धतीने आयुष्याकडे पाहिलं, तर आपल्याला आपलं आयुष्य आनंदाने जगता येईल.

याशिवाय आणखी दोन गोष्टी. एखादी मनाविरुद्ध गोष्ट घडली तर निराश होऊ नका. 'सो व्हॉट?' असा प्रश्न स्वतःलाच विचारा. एखादी नको असलेली गोष्ट घडली म्हणून काय झालं? 'होतंय असं, चालतंय ..' म्हणून नव्यानं सुरुवात करता येते. दुसरी गोष्ट म्हणजे सतत कार्यरत राहणे. जी माणसं सतत कार्यरत असतात, त्यांचं आरोग्य शेवटपर्यंत चांगलं राहतं. अशा अनेक कार्यरत राहणाऱ्या अनेक व्यक्ती आपल्याला आपल्या अवतीभवती डोळे उघडून पाहिलं तर सहज नजरेस पडतील. तेव्हा आनंददायी आणि आरोग्यदायी जीवनासाठी शुभेच्छा!

---

कोणे एके काळी
स्वाती काळे (कोलारकर)

# देह देवाचे मंदिर



माणसाला व्यक्त व्हायला फार आवडते. प्राचीन काळापासूनच माणसाने लाकडातून, विटांमधून आणि पाषाणातूनदेखील स्वतःचे मन व्यक्त केले. ईश्वराबद्दलची त्याची एक विशिष्ट संकल्पना होती. संकल्पनेतून धारणा निर्माण होत गेली. ती धारणा म्हणजे त्याला आलेली अद्भुत अनुभूती होती. ईश्वर जेथे राहतो त्या वास्तूतील प्रत्येक दगड किंवा वीट एका विलक्षण विचाराने त्याने बांधलेले होते. स्थापत्यकारांनी मंदिराला पुरुषस्वरूप मानले. देव देहात वास करतो असे म्हणतात. ही गोष्ट प्रमाण मानून स्थापत्यकाराने मंदिराची रचना केली. मंदिराच्या पायापासून ते शिखरापर्यंतचा भाग मानवी देहाचा आदर्श समोर ठेवून स्थपतींनी बांधला.

देहाकारानुसारच घडलेल्या मंदिराच्या वास्तूतील प्रत्येक घटकावर मंदिर वास्तुशास्त्रावर आधारित ग्रंथांमध्ये बारकाईने विचार करण्यात आला. मंदिर ज्यासाठी बांधायचे तो देव कसा आहे, याचे वर्णन करण्यासाठी अनेक तत्त्वचिंतक, ऋषिमुनी शब्दांशी झगडत होते. त्याला मूर्त स्वरूप देण्यासाठी अनेक स्थापत्यकारांच्या हातावर छिन्नी-हातोड्याचे व्रण उमटले होते. अगदी शून्यापासून सुरू झालेला मंदिराचा हा शोध अनेक शतके चालला. त्यासाठी कोणत्या वास्तूचे अनुकरण करण्यासारखे नव्हते. कारण आपल्या ऋषींनी, तत्त्वचिंतकांनी स्थपतींसमोर आव्हान ठेवले होते. बाह्यांगाचे अंतरंगाशी एकरूप होणे त्यांना मंदिराच्या बांधकामातून दाखवून द्यायचे होते. प्राचीन काळात मंदिर बांधणीसाठी दगडाच्या तीन पाट्या उभ्या ठेवून त्यावर एक आडव्या फरशीचे झाकण टाकायचे. दगडांच्या तंड्या नैसर्गिक अवस्थेत उभ्या आणि त्यावर एक सपाट दगड.

आदिमानवाने या सपाट दगडाखाली त्याच्या श्रद्धेची प्रतीके किंवा आपल्या लाडक्या पूर्वजांची आठवण असा संसार थाटला. इसवी सन पूर्व काळात मंदिरे बांधीव झालीत. रामटेक आणि नगरधन येथील वाकाटककालीन मंदिरांच्या अवशेषांवरून लक्षात येतं की, मंदिर शैली किती सुंदर पद्धतीने त्या काळात उमलली होती. गुप्तकाळात इ.स. चौथ्या शतकात सपाट छताची मंदिरे अस्तित्वात आली. आडव्या फरशीच्या झाकणाचे रूपांतर आता सपाट छतात झाले होते. या ऐतिहासिक कालखंडात आता विटांचा वापर सुरू झाला. इसवी सन चौथ्या शतकातले चौकोनी आकारातले विटांचे बांधकाम असलेले एक प्राचीन मंदिर साची स्तुपाच्या परिसरात दिसते. अजूनही तो देवळासमोरचा छोटा व्हरांडा पाहायला मिळतो. आतमध्ये गर्भगृह दिसते. मोठ्या आकाराचे घडीव दगड एकावर एक ठेवलेले आणि मध्ये चुन्यासारखा कोणताही पदार्थ न वापरता बनविलेली ही सुप्तावस्थेतील मंदिरे पाहिली की वाटतं माणसाने स्वतःबरोबर आपल्या देवांनाही कोडकौतुकाने घडविलं आहे.

मंदिर स्थापत्य विकसित होत गेले आणि मंदिराची बांधणी अधिक प्रगत होत गेली. अगोदर गोल आकार असलेले गर्भगृह नंतर चौकोनी बनले. बादामी, ऐहोळे आणि पट्टदाकल येथे मंदिर उभारणीला पाचव्या शतकात जोम आला. प्राचीन काळची पूजास्थाने छोटी वाटावीत अशाप्रकारे मंदिर उभारणी होऊ लागली. प्राचीन काळाची देवकोष्ठे म्हणजे मंदिराचे बाळरूपच. पण या बाळरूपांनी भविष्यातल्या मोठ्या प्रासादांची नांदी दिली. त्यामुळे या आद्य बाळलेण्यांना असामान्य असे महत्त्व आहे. सहाव्या शतकाच्या अखेरीस आणि त्याच्या पुढील काळात मानवी शरीरानुसार परिपूर्ण मंदिर निर्माण करण्याचे दिव्य स्वप्न साकार करण्यात स्थपतींना यश आले. इसवी सन १० वे आणि ११ वे शतक म्हणजे बांधीव मंदिरांचे सुवर्णपर्व म्हणावे लागेल. राष्ट्रकूट, चालुक्य, होयसळ, कलचुरी, यादव यांनी महाराष्ट्रात बांधीव मंदिरांच्या निर्मितीचा कळस गाठला. दिव्य पुरुषोत्तमाच्या रूपात देवतेला पाहता येईल अशी अद्भुत वास्तू म्हणजे मंदिर असे मयमतात म्हटले आहे. अग्निपुराण,

शिल्परत्न इत्यादी ग्रंथांमध्ये मंदिराच्या वेगवेगळ्या भागांचे वर्णन मानवी अवयवांच्या नावानुसारच केलेले आहे. कलश म्हणजे केस, आमलक म्हणजे मस्तक, कंठ म्हणजे गळा, शुकनास म्हणजे नासिका, वेदी म्हणजे स्कंध, भद्र म्हणजे दंड, मंदिराचे प्रवेशद्वार म्हणजे मुख, मंदिराची दारे म्हणजे ओष्ठद्वय, जंघा म्हणजे मांड्या आणि देवतेची प्रतिमा म्हणजे साक्षात प्राणच. या सर्व अवयवांचे मिळून जे मंदिर बनते त्याला सम रांगण सूत्रधारानुसार प्रासाद म्हणतात आणि ईशानशिव गुरुदेव पद्धतीनुसार या मंदिराच्या ढाच्याला विमान असे म्हणतात. अर्थात द्राविड शैलीत मंदिराला विमान म्हणतात आणि नागरशैलीत त्याला प्रासाद म्हणतात. मंदिराचे पुरुष प्रकृतीनुसार असे साजिरे रूप साकार व्हायला नववे शतक उजाडावे लागले.

गर्भगृहावरील उंच शिखराला मूलमंजरी म्हणतात. मूलमंजरीमध्ये ग्रीवा, स्कंध, शुकनास, आमलक, कलश असे भाग असतात. प्राचीन काळी ऋषिमुनींच्या गहन चिंतनात पुरुष स्वरूपात भावलेला हाच तो परमेश्वर. त्यांच्या चिंतनात देवांचे घर मानवी देहात सापडले होते. म्हणतात ना, 'देह देवाचे मंदिर..' मंदिरात जाण्याचा मार्ग म्हणजे मोक्षप्राप्तीचा मार्ग असे समजले जाते.

मंदिराच्या सर्व बाजूंच्या दर्शनी भागावर दैनंदिन आयुष्यातील प्रसंग शिल्पांकित केले असतात. कधी त्यावर अप्सरांचीदेखील अप्रतिम शिल्पे असतात. स्वयंपाक करणारी गृहिणी, सरपण गोळा करून आणणारा माणूस, हत्तींच्या झुंजी, गुरूभोवती पडलेला शिष्यांचा गराडा, मदिरापानामुळे धुंदावलेले स्त्री-पुरुष, आरशात लाजून बघणारी स्त्री, नर्तकी, लढवय्या वीर, गायक, वादक, अक्षक्रीडा, कामक्रीडेत मश्गुल झालेले प्रणयी जोडपे असे दैनंदिन जीवनातील प्रसंग मंदिराच्या बाह्य भागात कोरलेले असतात.

ज्या भक्ताला संसार विसरून भक्ती रसात रममाण व्हायचे असते त्याने ही सर्व दैनंदिन सुखे मागे सोडायची असतात. त्याला ही जगती चढून वर 'त्याच्या' जगात जावे लागते. बाहेरचा देखावा सोडल्यावर आतला प्रवास सुरू होतो. आतल्या प्रवासात गंधर्व, विद्याधर, किन्नर, स्वर्गीय अप्सरा आजूबाजूला मंडपाच्या भागात आपली साथ देतात. स्वर्गीय सुखाची अनुभूती मंडपापासून सुरू होते. संसारातील सगेसोयरे मागे राहतात आणि गंधर्व किन्नरांच्या साथीने आपण देवलोकात प्रवेश करतो. मंडपाचा हा भाग आपल्या मनाची उन्नत अवस्था दर्शवितो.

मंडपापासून देवाच्या दर्शनाची आस लागते. पण लगेच दर्शन देईल तो देव कसला! मंडपापासून भक्ताला गर्भगृहात पोहोचायचे असेल तर अंतराळ मार्गाने जावे लागते. आता भक्त ना धड संसारात रममाण असतो ना देवलोकात. मृत्युलोक तर त्याने कधीच सोडला असतो, पण देवलोकात तो पोचला नसतो. देवाच्या जवळ मात्र तो पोचलेला असतो.

अंतराळातून खडतर साधनेच्या खडावा घालून काही अंतर चालले तर गर्भगृह येते. गाभाऱ्याच्या प्रवेशाला दाराची चौकट बसवलेली असते. चौकटीच्या वरच्या पट्टीकेवर मध्यात गाभाऱ्यातील देवतेची छोटी प्रतिकृती असते. त्याला ललाटबिंब म्हणतात. हे ललाटबिंब भक्ताची येथे येण्याची योग्यता तपासून बघत असते. चौकटीच्या वरच्या डाव्या उजव्या अंगाला बरेचदा नदी देवता दाखवितात. नदी स्वर्गातून खाली येते म्हणतात. नदी देवता भक्ताला त्याच्या मानव जन्माच्या कर्मदोषातून मुक्त करतात. चौकटीच्या तळाशी द्वारपाल असतात आणि उंबरठ्याच्या मध्यभागी कीर्तिमुख असते. हे सर्व द्वारपाल आणि कीर्तिमुख माणसाच्या पापांना गिळंकृत करून काळाच्या पलीकडे नेतात.

द्वारपालाचे काम फार महत्त्वाचे असते. कारण अंत:करण शुद्ध असलेल्या भक्तालाच त्याला आत प्रवेश द्यायचा असतो. ही गोष्ट सर्वांनाच माहिती आहे की, गणपतीने द्वारपालाचे काम करीत असताना महादेवालासुद्धा अडवले होते. तेव्हा संतप्त झालेल्या देवांनी गणपतीला देहांताची शिक्षा फर्मावली होती. यावरून असे दिसते की, द्वारपालाचे काम केवढे जोखमीचे असते. एकदा रावणाला तो अहंकारी असल्यामुळे प्रतिहारींनी कैलासात प्रवेश नाकारला गेला होता. जेव्हा त्याला त्याची चूक कळली तेव्हा त्याने शिवस्तुती गायली आणि शिवाने त्याला वर दिला होता.

आता भक्त गाभाऱ्याच्या दारी उभा असतो. ते मुक्तीचे द्वार असते. आणि या मुक्तीद्वाराच्या आत गर्भगृह असते. जीवनाचा आरंभ येथून होतो. येथेच बीज अंकुरते. सृजनाचा उत्सव येथून सुरू होतो. गर्भातले तेजोमय तम येथे दडलेले असते. काळ्यामिट्ट अंधारात आदिगर्भात भक्ताचा अहंकार गळून पडतो. त्याची देवाकडे दृष्टी जाते. त्याचेच नाक-डोळे ल्येवून देव त्यालाच न्याहाळत असतो.

जिवाशिवाची भेट होते. देव अतीव प्रेमाने भक्ताला न्हाऊ घालीत असतो आणि भक्त परमानंदात चिंब भिजलेला असतो.

'रूप पाहता लोचनी ।
सुख जाले वो साजणी ।
तो हा विठ्ठल बरवा ।
तो हा माधव बरवा ।।'

अशी ती परमानंदाची अवस्था असते. चिदानंद अनुभूतीचा क्षण आत झंकारत असतो आणि कोणा अनामिक शिल्पकारासमोर नतमस्तक होत आपण मंदिराला प्रदक्षिणा घालतो.

---



## पाहता पाहता संघ...

पाहता पाहता संघ शंभर वर्षांचा झाला
खेळ साधेच खेळत राष्ट्राचा आधार झाला
खेळून काय होणार उपहास खूप झाला
पण केशवही होता समर्थ गुरूचा चेला
जमवून काही मित्र शिवाजीस तो स्मरला
दिल्ली मेरी है म्हणत अभिमाने तो वदला
भारतीय समाजाचा अभ्यास पुरता केला
संघटित राष्ट्रभक्तीचा विचार छान रुजला
विजयादशमी दिनी प्रणाम पहिला दिला
भगव्याची लावून ज्योत हुंकार नवा तो दिला
राष्ट्रभक्ती प्रथम असा मंत्र नवा छान दिला
संघटित समर्थ हिंदू आधार जगाचा झाला
पाहता पाहता संघ शंभर वर्षांचा झाला
पाहता पाहता संघ शंभर वर्षांचा झाला....

बाबा देशपांडे

---

## संघ शताब्दी...



प्रतिकूलतेतून उभा राहिला हाक ऐकली राष्ट्राची
आत्मविस्मृत समाजाला गरज भासली संघाची ।।१।।
परमपूज्य केशवजी आले साधण्या जगत् कल्याणा
वसुधैव कुटुंबकम् मंत्र दिला कोटी कोटी राष्ट्रभक्तांना ।।२।।
साथ मिळाली गुरुजींची अन् उभा राहिला जनसमुदाय
एकच मंत्र मुखी तयांच्या इदं न मम इदं राष्ट्राय ।।३।।
जातपात ना पंथ कधी पुसला कोणी ना कोणा
एकोप्याने करिती सेवा शिकवण हीच सकलांना ।।४।।
माणुसकी ही जात जयांची धर्म जयांचा राष्ट्रीयता
अनेक संकटे पार करीत संघ चाले न डगमगता ।।५।।
स्वातंत्र्यास्तव संघ झगडला टिकविण्यास दिले बळ त्याने
एक एक घडवुनी स्वयंसेवक म्हणे राहा रे एकोप्याने ।।६।।
राष्ट्रनिर्माणास्तव दिधले सूत्र नवे पंचपरिवर्तन
गुरु मानिले ध्वज भगव्याला करी तयाला सदा वंदन ।।७।।
वंदा अथवा निंदा कोणी अविचल चाले संघ पुढे
टीका कधी ना करी कुणावर संघ चालला शताब्दीकडे ।।८।।
अथक परिश्रमे शतवर्षाची अक्षुन्न राहिली परंपरा
हिंदुराष्ट्राचे स्वप्न चिरंतन दिव्य समर्पित अवधारा ।।९।।
विश्वगुरुपदी व्हावी आरुढ भारतमाता मानाने
किमया ही येईल घडून संघाच्या अस्तित्वाने ।।१०।।
संघ शक्ती युगे युगे अशी करूया सिंहगर्जना
शतवर्षाच्या संघाला या अनेकानेक शुभकामना ।।११।।
एकादश पुष्पांची माला अर्पिते अपर्णा संघ चरणी
हे विश्व सारे होऊ दे संघमय हीच प्रार्थना प्रभू चरणी

अपर्णा सोवळ

---

## प्रयाण गीत

एकजुटीने पुढे पुढे, चालू सहकार्याने ।
पादाक्रांत करू नव्या युग वाटा हिरारीने ।।धृ।।
आभाळी झेप उंच मना-मनाचा जोम नवा ।
शोधूया गगनी चारा, होऊनी पाखरं थवा ।।
जीवन आकाश उजळू प्रकाश तारकांनी ।
पादाक्रांत करू नव्या युग वाटा हिरारीने ।।१।।
अथांग खोल दऱ्या, नवती जोम तरुणाई ।
वल्ह्यांशी लयबद्ध होऊनी, शोधू गहराई ।।
कैक रहस्ये, रत्नसाठा उलगडे नव्याने ।
पादाक्रांत करू नव्या युग वाटा हिरारीने ।।२।।
नव्या कल्पना, साद नवीन, आशा कर्म क्षेत्री ।
सुकर्मांची कास ध्यानी, उन्नती समाज क्षेत्री ।।
एक संघ, सुविचार, स्वराष्ट्र प्रेम नेमाने ।
पादाक्रांत करू नव्या युग वाटा हिरारीने ।।३।।

रेखा भिवगडे

---

## सकाळ

दिशा उजळल्या दाही आली प्राचीवर लाली
सोनपावली सकाळ पुन्हा अंगणात आली!
कंठ मोकळी पाखरे सूर छेडती सुस्वर
गंध भिजली झुळूक तिला फुलांचे माहेर!
गाव वाटा, रान वाटा न्हाल्या उन्हात मलमली
कशी देखणी धांदल नळ, विहिरी उडाली.
गाई निरोप भेटीला गोठा वासरांच्या डोळी
गोहनाची लगबग कुठे रेखीव रांगोळी!
दिस नवा, क्षण जुने चाले सृजनाचा खेळ
किर्र काळोख्या रात्रींची रोज उगवे सकाळ!

रवींद्र जवाद

---

## सुखी जीवनात

सुखी जीवनात! कोण आहे सांगा!
सर्व लावी रांगा! सुख घेण्या...१
सर्वांना वाटतं! कमी मला दिलं!
इतकं मी केलं! सर्वांसाठी...२
कोण नेतं वर! विसरले सार!
दृष्ट कारभार! सर्वीकडे...३
सुक्ष्म असा जीव! देह मानवाचा!
नुसताच ढाचा! शरीराचा...४
चित्त समाधान! ठेवा हीच जाण!
हो प्रकाशमान! उजेडात...५
निर्मळ जीवात! सुख शांत रात!
सरस्वती साथ! आयुष्यात...६

प्रदीप पाटील

# ऋतू बेईमान झाले त्याची गोष्ट...!

ऋतूरंग.....

किरण डोंगरदिवे
भ्र. ७५८८५६५५७६



जीवनचक्र फिरवण्यासाठी उगवणाऱ्या सूर्याला आणि रात्रीच्या अंधारात भारतीय संस्कृतीने ज्याला मामा या नात्याची उपाधी दिली, त्या चंद्राच्या विविध कला, सागरांची, नद्यांची सरोवरांची, वाहणाऱ्या ओहोळांची, झऱ्यांची या सर्व जलाशयात क्रीडा करणाऱ्या जलचरांची, जलाशयाव्दारे तहान तृप्त करणाऱ्या प्रत्येक सजीवांची, प्रत्येक हिरव्या गर्द झाडाची, वाळलेल्या पानाची, मातीमोल होणाऱ्या पाचोळ्याची, रुसलेल्या दगडाची, पिसलेल्या मातीची अशी सर्व चराचराची एकत्रित अशी जी बांधणी असते, त्या बांधणीचे काळानुसार जे पडसाद आपल्या मनावर उमटतात, आणि आपल्याला भावविभोर करतात त्या सर्व आणि सर्व अश्या सृष्टीच्या कणाकणांचा मुलाधार म्हणजे ऋतू असतो हे जर आपल्याला समजले तर सृष्टी आपल्याला किती अनोखे लावण्य आणि संजीवन देते. मग आपण सृष्टीचे किती देणे लागतो? हे आपले आपल्याला कळते.

मुख्य तीन ऋतू त्यात सहा ऋतूंचे सहा सोहळे, त्यात बारा महिन्यांचे बारा चेहरे हे सर्व ऋतूंच्या अमृतमय अस्तित्वातून फुलून आलेले अंकुर आहेत. ऋतूंच्या कणाक्षणातून सृष्टीला सृजनाची दैवी शक्ती प्राप्त झालेली आहे. सृजनाचा विचार करता ऋतूमती झाल्यावरच स्त्रीच्या वाट्याला सृजनसुखाचा सोहळा येतो. ऋतूंचे पडसाद मनात उमटल्यावर लेखक, कवी आणि चित्रकार ह्यांच्या मनामध्ये सृजनकळा येऊन नवीन साहित्याची आणि चित्रांची सृजनवाट मुक्त होऊन आकारास येते. काळ ऋतू सापेक्ष आपला चेहरा बदलत असतो. जसे ऋतू असतील तशा जाणिवा काळ आपल्या अस्तित्वाच्या कवेत घेऊन फिरत असतो. कधी वसंतातील मनोहर रम्य फुलांचे सोहळे आपल्या मनात रणरणत्या उन्हातही प्रसन्नता पेरत असतात. ओसाड मळारानावर कुणाच्याही दोन थेंब पाण्याच्या आणि चार कणांच्या खतांचाही उपकार न घेता रणरणत्या उन्हात स्वतःच्या अस्तित्वावर प्रसन्नतेच्या लाल, केशरी फुलांची झुल पांघरून घेणाऱ्या पळस, काटेसावरी आणि गुलमोहरासारख्या झाडांकडून प्रतिकूल परिस्थितीत फुलून येण्याची प्रेरणा आपण घेतच असतो. कधी पाऊस वेल्हाळ श्रावण आपल्याला रिमझिम धून ऐकवत कालिंदीच्या किनाऱ्यावर राधा कृष्णाच्या गुजगोष्टी ऐकवतो, तर कधी तापलेला वैराण ग्रीष्म आपल्या मनातील दाहकता किती क्षुल्लक असते हे सांगून आपल्याला वेडावत असतो. कधी शरद आपल्या काळ्याकभिन्न पखालीवर हसणाऱ्या चांदण्यांची वेलबुट्टी काढतो. तर कधी शिशिर वेळ आल्यावर आपण ज्यांना जीवनाचा अर्क पुरविला ती पाने सुद्धा आपल्याला गाळावी लागतात ह्यांची जाणीव करून देत असतो. या ऋतूंच्या विविध आविष्काराची अनेक रूपे महाकवी कालिदासापासून तर वातानुकूलित कक्षात बसून अंगावर पाण्याचा थेंबही न झेलता झिम्माड भिजल्याच्या नोंदी कवितेत पेरणाऱ्या शुष्क मनाच्या कवीपर्यंत अनेकांनी आपल्या शब्दातून तर कधी कुंचल्यातून सजीव केला आहे. अर्थात जो पावसात भिजला त्याच्या कवितेला आपोआपच भिजलेल्या मातीचा सुगंध येत असतो. ज्याने चैत्रातली उन्हे अंगावर झेलली त्याच्या अंगावर पळसाच्या डहाळ्या आपोआप फुलून आलेल्या असतात. आणि ज्याने शरदाच्या चांदण्यात फिरण्याचा आनंद घेतला त्याच्या शब्दांना आपोआपच चांदण्या लगडून बहर येतो. आपण निसर्गाच्या आधीन आहोत याची जाणीव करून देणारे महापूर किंवा रक्त गोठवणारी कडाक्याची थंडी आपल्याला सातत्याने आपण निसर्गाच्या नोंदी घेत असतो या जाणिवेतून बाहेर काढत निसर्ग आपल्याला त्याच्या अस्तित्वाची नोंद घ्यायला बाध्य करत असतो याची सतत जाणीव करून देत असतो.

**ऋतू म्हणजे काळाचा बदलत जाणारा चेहरा, संपूर्ण सृष्टीला आपल्या वेगवेगळ्या रूपानुसार आपल्या साच्यात, आपल्या रंगात आणि गंधात भिजवून प्रत्येक वेळी नाविन्याच्या परिसस्पर्शाने तिला खुलवणारा, बहरून आणणारा, अस्वस्थ करणारा, प्रसंगी तगमग वाढवणारा निसर्गदत्त असा काळाचा जो चेहरा असतो तो चेहरा म्हणजे ऋतू होय. ऋतू म्हणजेच फिरता काल. ऋतू आपल्या अलवार पावलांनी सृष्टीच्या, जीवनाच्या विविध पैलूंना स्पर्श करत, आपल्या अस्तित्वाच्या खानाखुणा घेऊनच येतो. ऋतू जितके अल्लड आणि अलवार असतात तितकेच होते क्रूर आणि जीवघेणेही असू शकतात. म्हणूनच काळाच्या या आविष्काराला समजून घेणे कधी कुणाला जमले नाही. अनेक कवींनी आणि चित्रकारांनी कधी शब्दात तर कधी रंगात या ऋतूंचा गंध दर्शविण्याचा प्रयत्न केला मात्र सर्वोच्च कलाकृतीच्या पल्याड निसर्गाचा एक पैलू, एक गंध, एक रंग आपल्या हातात लागला नाही याची त्यांना शेवटपर्यंत चुटकुट लागून राहिली ती राहिलीच.**

मानव किंवा सृष्टीतील कोणताही सजीव हा निसर्गाचे स्वरूप आहे आणि या निसर्गाला ऋतूंच्या मर्जीनुसार चालावे लागते. आपण ऋतूंच्या मर्जीनुसार वर्तन करत असतो, नव्हे आपल्याला ते करावेच लागते ही जाणीव आता विज्ञान युगामध्ये आपण झुगारून देण्याचा प्रयत्न करत आहोत. खळाळून वाहणाऱ्या पर्वतकन्येला आपण तिच्या प्रियकराकडे जाण्यापासून अडवून धरण्यासाठी धरणाच्या भिंती बांधल्या आहेत, त्याचे परिणाम असे झाले की तुडुंब भरलेल्या आणि नद्यांच्या प्रवाहाला लगाम लागले. उन्हाळ्यात नदीच्या काठावर पोहण्यासाठी जमा होणारी गर्दी आपोआप ओसरली कारण उन्हाळ्यापर्यंत दुथडी भरून वाहणारी नदी आता दिवाळसणाच्या नंतर आपल्या पाण्याची दिवाळखोरी जाहीर करून आटून गेलेली दिसते. अर्थात धरणामुळे विकास होत नाही असे मी म्हणणार नाही मात्र एका भागात तुडुंब सुखाचा सागर आणि त्या पुढील भागात आचके देत झुळझुळ वाहणारी नदी निदान मला तरी अस्वस्थ करते. प्रत्येक गावाच्या लगत असणारी एखादी छोटीशी टेकडी जी डोंगराच्या भव्यतेची उपाधी लावून हसायची, आज ती टेकडी कोणत्या बिल्डिंग खाली श्वास घेत आहे ते ठरवूनही सांगता येणार नाही. रात्रीच्या अंधारात गावाच्या नजीकच्या झाडीतून ऐकू येणारी कोल्हेकुई अरण्यांच्या अस्तित्वाने माणसाला सजग ठेवायची. आणि या अरण्यात नसलेली भुतावळ मनात फेर धरून नाचायला लागली की, माणसाला एकमेकांच्या सोबतीची गरज वाटायची.

अरुणोदयाच्यापूर्वी किंवा झाकट पडल्यावर अंधारलेल्या पांदीत जातानाही ज्या लहान भावाला एकेकाळी मोठ्या भावाची संगत आश्वासक वाटायची आज ते दोन भाऊ प्रसंगी एका बिल्डिंगमध्ये असलेल्या फ्लॅटमध्ये राहून चार महिन्यापासून एकमेकांशी बोलले नसावेत असे चित्र आपण आपल्या आसपास पाहतो. ऋतू काळानुरूप बदलले की, ऋतू नुसार काळ बदलला? की फक्त माणसाच्या वर्तनात बदल झाला आणि ऋतू होते तसेच आहेत. या बाबींचा कधी सूक्ष्मपणे विचार केला तर, तर माणसाच्या वर्तनाने ऋतूंनाही बदलण्यास बाध्य केले आहे की काय? असे वाटायला लागते. ऋतूंच्या हृदयात डोकावून पाहिले तर आजही चैत्रामध्ये मुक्तेश्वरांनी म्हटल्याप्रमाणे 'पुष्प धूळमाजी लोळे वसंत' या ओळीप्रमाणे रणरणत्या उन्हात अंगा खांद्यावर फुलांचे ओझे घेऊन प्रसन्नतेने हसणारे अनेक वृक्ष आजही माळरानावर उभे आहेत. चैत्रातल्या पालवीचे लाल, गुलाबी, ओलसर गंध आजही वडापिंपळावरून आपल्याला खुणावत असतात. चैत्रातली अल्हाददायकता कायम ठेवून वैशाखही अद्भुत सौंदर्य उधळत फुलाफुलातून बहरलेला वसंत अंगावर मिरवत असतो. मग वसंत काल होता तसा आजही आहे तर मग ऋतू बदलण्याचे संदर्भ सांगण्याचा प्रश्न का उपस्थित होतो? कारण ऋतू कायम असला तरी त्याच्या नोंदी घेणारा माणूस बदलला आहे. वातानुकूलित कक्षाच्या दालनात हव्या त्या पद्धतीने ऋतूंची जोडतोड करून आपल्या हाडांना ठिसूळ करणारा थंडावा स्वतःच्या शरीरात पेरत माणूस वसंता कडे पाठ फिरवून उभा आहे. झाडावरच्या ताज्या लिंबाच्या रसातील थेंबाची अमूर्त चव शीतपेयाच्या फेसाळत्या बुडबुड्यातून निवत गेली आहे.

निसर्ग तोच आहे, ऋतूही तेच आहेत बदलले ते आपले जीवन, आपण गंगा बाटली बंद करून सोबत बाळगण्याची संस्कृती जन्मास घालू लागलो आणि पाणपोईवर क्षणभर थांबून घसा ओला केला तर कमीपणा वाटावा अशा जाणिवा माणसाच्या मनात फेर धरून नाचू लागल्यात. गवताचा भारा गाई पुढे टाकून तिच्या दुधात अमृत शोधणारे लोक पुढे निघून गेले आणि त्या लोकांचे प्रतिनिधित्व करणारे आपण गाईचा कासरा सोडून विदेशी कुत्र्यांचा पट्टा हातात धरून चालू लागल्यावर गाय रस्त्यावर मोकाट फिरू लागली आहे हे विसरून जाऊ लागलो. चुलीवरच्या भाकरी सोबत रटवटलेले बेसन रुचकर लागत होते हे विसरून हंड्यातले चिकन-मटण हेच पंचपक्वान्न असल्यागत आपल्या आवडी बदलल्या आहेत. संध्येचे रंग पश्चिमेवर उधळून जेव्हा सूर्य पृथ्वीच्या कुशीत निजायला जातो आणि बगळ्याची एखादी माळ आजही गाव खेड्याच्या क्षितिजावर आपले पंख उडवत निघून जाते त्यावेळी बगळ्या बगळ्या दूध दे, अशी खुळचट हाक एकेकाळी कानाला किती गोड वाटायची त्याची जाणीव कानात हेडफोन लावून वजन कमी करण्यासाठी फिरणार्या पिढीला कशी होईल? पावसाच्या सरीचा सरसर आवाज बेडकाच्या गळ्यात अलगद उतरून त्याच्या आवाजाला संजीवनी देतो असे समजणार्या पाऊस वेल्हाळ लोकांचा सर्वत्र दुष्काळ पडल्यावर ऋतू बदलल्याचे संदर्भ शोधावे असे वाटत राहिले तर त्यात नवल ते काय? ह्या ऋतूच्या असल्या नसलेल्या आणि बदललेल्या रुपांच्या नोंदी घेण्याचे महत्वाचे कारण म्हणजे, आजही माणसाच्या मनाला हा निसर्ग स्वतःकडे ओढत असतो. हे ऋतू आकाशात जमा होऊन माणसाला उघड्या माळरानावर खुणावत असतात.

प्रचंड व्यापातून जेव्हा एखाद्या निवांत क्षणी माणूस स्वतःच्याच डोळ्यातल्या सरोवरात डुबकी मारतो. तेव्हा आढळणारा कोरडेपणा पाहून आंर्तबाह्य हादरून जातो. ऋतूंच्या पडछायेत न राहता आपल्या आयुष्याच्या धकाधकीत आपण किती ऋतूवेल्हाळ दिवस गमावून बसलो याची त्याला जाणीव होते. मग शहराची परिसीमा ओलांडून तो पुन्हा एकदा स्वतःच्या गावाकडच्या कौलारू घराकडे स्वतःचा जुना चेहरा शोधण्यासाठी जातो. मात्र, कधीकधी पैशाच्या मोबदल्यात जे गमावले त्यात जवळचे माणसं सुद्धा गमावून बसलो असलो. तर त्या कौलारू घरात पहिल्याच दिवशी असह्य उकाडा जाणवायला लागतो. हा उकाडा ऋतू निर्मित नसून माणसाच्या श्वासात निर्माण झालेल्या तिरस्कारातून जन्मलेला आहे.

(पान ६ वर)

पान १ वरून

# नक्षलवादी येताहेत मुख्य प्रवाहात

यापूर्वी सुमारे २०० नक्षलवादी आत्मसमर्पण करून मुख्य प्रवाहात सामील झाले.महाराष्ट्रात ६१ नक्षलवाद्यांनी मुख्यमंत्र्यांसमोर आत्मसमर्पण केले. इतक्या मोठ्या प्रमाणातील आत्मसमर्पणानंतर छत्तीसगडमधील, विशेषतः बस्तर प्रदेशातील नक्षलवाद्यांबद्दलचे आक्रमक इनपुट आता थांबले आहे. भारताचे गृहमंत्री अमित शाह यांनी १६ ऑक्टोबर रोजी 'एक्स'वर पोस्टमध्ये म्हटले होते की, एकेकाळी दहशतीचे केंद्र असलेल्या छत्तीसगडमधील अबुझमाड आणि उत्तर बस्तर आज पूर्णपणे नक्षलवादी हिंसाचारमुक्त घोषित करण्यात आले आहे.आता दक्षिण बस्तरमध्ये काहीच नक्षलवादी शिल्लक आहेत, ज्यांना आमचे सुरक्षा दल लवकरच संपवेल. उत्तर बस्तर प्रदेशात अबुझमाड क्षेत्र येते.

जानेवारी २०२४ मध्ये छत्तीसगडमध्ये भाजपक सरकार स्थापन झाल्यापासून २१०० नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केले आहे. १७८५ जणांना अटक करण्यात आली आहे. अबुझमाडचा नक्षलमुक्त दर्जा हे केवळ सुरक्षा यश नाही, तर आदिवासी भूगोलासाठी एक नवीन पहाट आहे. वाढत्या प्रशासकीय हस्तक्षेपामुळे आणि विकास प्रकल्प पोहोचण्याच्या आशेमुळे येथे आदिवासींचे शोषण पुन्हा सुरू होण्याची भीती असल्याने सरकारने अत्यंत संवेदनशीलतेने काम करण्याची गरज आहे.

छत्तीसगडच्या बस्तर प्रदेशातील सुमारे चार हजार चौरस किलोमीटरवर पसरलेले अबुझमाड शेकडो वर्षांपासून एक कोडे राहिले आहे, जे पृथ्वीवर नोंदविले गेले आहे; परंतु कागदपत्रांमध्ये हरवले आहे. बहुतेक भागांमध्ये जमिनीचे निश्चित मोजमाप नाही. कुरणांचा कोणताही मागमूस नाही आणि रस्त्यांचे निश्चित सरेखन नाही. जुन्या कागदपत्रांवरून दिसून येते की, अकबराच्या काळात येथे महसूल नोंदी गोळा करण्याचा प्रयत्न केला गेला होता; परंतु जंगलांची खोली प्रत्येक मोजमापाच्या पायरीला गिळंकृत करत होती आणि अबुझमाड जसे होते तसे राहिले. १९७० च्या दशकात नक्षलवाद्यांनी या भागात प्रवेश केला होता. नक्षलवादी संघटनेची एक तुकडी, पीपल्स वॉर ग्रुप या भागात आली आणि लोकांना एकत्र करण्यास सुरुवात केली. नक्षलवादी कागदपत्रांमध्ये म्हटले आहे की, एक किलो मिठाच्या बदल्यात आदिवासींकडून एक किलो काजू किंवा मनुका उकळण्याचे प्रकार घडत होते. या प्रदेशात सरकारी अधिकाऱ्याच्या नियुक्तीची तुलना काळ्या पाण्याच्या शिक्षेशी केली जात होती. १९८० च्या सुरुवातीला आदिवासींच्या सामाजिक- सांस्कृतिक गोपनीयतेचा हवाला देऊन बाहेरील लोकांना अबुझमाडमध्ये प्रवेश करण्यास बंदी घालण्यात आली होती.

पुढील काळात या भागात नक्षलवादाचा विस्तार होत राहिला. अबुझमाडचे भौगोलिक स्थान नक्षलवाद्यांच्या लष्करी प्रशिक्षणासाठी आदर्शवत होते. म्हणूनच हा परिसर दंडकारण्यमधील नक्षलवाद्यांचा गड बनला. आंध्र प्रदेश आणि महाराष्ट्रात नक्षलवाद्यांवर दबाव वाढला तेव्हा अबुझमाड हे नक्षलवादी केंद्रीय समितीपासून 'पीपल्स लिबरेशन गुरिल्ला आर्मी'पर्यंत सर्वांसाठी आश्रयस्थान बनले.

छत्तीसगड हे वेगळे राज्य झाल्यानंतर नऊ वर्षांनी या भागातील प्रवेशावरील बंदी उठवण्यात आली; परंतु तोपर्यंत नक्षलवाद जंगलाच्या मुळांसारखा पसरला होता. यथावकाश जनता सरकारने जमिनीचे पट्टे वाटले आणि लोक न्यायालयेही भरवली. बदललेल्या परिस्थितीत सरकारने प्रदेशाचा योग्य विकास आणि आत्मसमर्पण केलेल्या माओवाद्यांचे योग्य पुनर्वसन याकडे विशेष लक्ष दिले. ज्या सामाजिक असमानतेवर आधारित माओवाद्यांनी गावकऱ्यांमध्ये प्रभाव मिळवला, त्या दूर करण्यासाठी सरकारने प्रयत्न केले पाहिजेत. 'नियाद नेलनार' (तुमचे चांगले गाव) सारख्या विकास योजना केवळ सुरक्षा छावण्यांच्या पाच किलोमीटरच्या परिघात मर्यादित नसून माओवाद्यांनी आत्मसमर्पण केलेल्या संपूर्ण क्षेत्रात वाढवल्या पाहिजेत. आरोग्यसेवेसाठी शैक्षणिक आश्रम आणि रुग्णालये किंवा दवाखाने बांधण्याच्या योजना लवकर अंमलात आणल्या पाहिजेत. कारण वन उत्पादने आदिवासींसाठी उपजीविकेचे एक महत्त्वाचे साधन आहेत. त्यांच्या योग्य किमती आणि प्रक्रियेसाठी योजना राबविण्यावरही विचार केला पाहिजे. रस्तेदेखील बांधले पाहिजेत आणि मोबाईल टॉवर बसवले पाहिजेत. अशा विकास प्रकल्पांची अंमलबजावणी करताना पर्यावरणाचे कमीत कमी नुकसान होईल, याची खात्री करणे आवश्यक आहे. सरकारने आत्मसमर्पण केलेल्या माओवाद्यांना पुनर्वसन धोरणाचे फायदे त्वरित मिळावेत याचीही खात्री केली पाहिजे. त्यांना त्यांना आवश्यक प्रशिक्षण आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. अर्थात त्यानंतरही सुरक्षा दलांनी माओवाद्यांनी आत्मसमर्पण केलेल्या भागात पाळत ठेवली पाहिजे.

# दुबार मतदानातून 'व्होट जिहाद'

मात्र, हे सर्व आरोप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ठामपणे खोडून काढले आहेत. निवडणूक आयोगाने वेळोवेळी स्पष्ट केले आहे की, मतदारयादीत सुधारणा करण्यासाठी आणि दुबार नोंदी काढून टाकण्यासाठी प्रणाली कार्यरत आहे. असे असतानाही, तेच तेच आरोप विरोधक पुन्हा पुन्हा करत, लोकशाही व्यवस्थेवरच दोषारोप करत आहेत. हे राजकीय असंतोषाचे प्रतिबिंब नाही, तर मतदारांच्या विश्वासाला धक्का देणारी पद्धत आहे. निवडणुका जवळ आल्या की 'ईव्हीएम' हॅक, मतचोरी, मतदारयादीतील गोंधळ असे आरोप नित्यनेमाने केले जात आहेत. दुबार मतदारांबाबत शंका असेल, तर मविआचे नेते न्यायालयात दाद मागू शकतात. मात्र, तसे न करता केवळ राजकीय आरोपांपुरते मर्यादित राहणे म्हणजे लोकशाही प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत, स्वतः नामानिराळे राहण्याचाच हा प्रयत्न होय.

आशिष शेलार यांनी पत्रकार परिषदेत केलेले एक निरीक्षण लक्षवेधी आहे. मतदारयादीतील गोंधळ दूर करण्यासाठी 'एसआयआर'सारखी मोहीम राबवण्यात येते, तेव्हा त्यालाच विरोध का होतो? हा विरोध नेमका कोणत्या भीतीतून करण्यात येतो, हा प्रश्न यामुळे उपस्थित होतो. राज्यात मुस्लीम आणि ख्रिश्चन समाजातील तब्बल १६ लाख, ८४ हजार, २५६ दुबार मतदार आढळले आहेत. केवळ ३१ विधानसभा मतदारसंघांचे विलेषण केल्यावर २ लाख, २५ हजार, ७९१ दुबार मतदार आढळले आहेत. कर्जत-जामखेडमध्ये रोहित पवार १ हजार, २४३ मतांनी विजयी झाले. पण तिथे ५ हजार, ५३२ दुबार मतदार हे मुस्लीम आहेत. साकोलीत नाना पटोले २०८ मतांनी जिंकले. तिथेही ४७७ दुबार मुस्लीम मतदार आढळले आहेत. वांद्रे (पूर्व) मध्ये वरुण सरदेसाई ११ हजार, ३६५ मतांनी विजयी झाले. तिथे १३ हजार, ३१३ मुस्लीम-ख्रिश्चन दुबार मतदार नावे आहेत. जितेंद्र आव्हाडांच्या मुंब्र्यात ३० हजार, ६०१, अमित देशमुखांच्या लातूरमध्ये २० हजार, ६१३, अस्लम शेख यांच्या मालाड पश्चिममध्ये १७ हजार, ७ इतके मुस्लीम दुबार मतदार आहेत. ही यादी फार मोठी आहे. पारंपरिक 'व्होट बँक' सांभाळण्यासाठी मुस्लिमांचे तुष्टीकरण करणाऱ्या मविआकडूनच वारंवार म्हटले जाते की, भाजप धार्मिक ध्रुवीकरण करत आहे. तथापि, काही ठिकाणी मुस्लिमांच्या दुबार नोंदी आढळतात, तेव्हा त्यावर मविआ मौन का बाळगते, हा आमचा प्रश्न आहे.


कथा

डॉ. सुमेधा हर्षे

सकाळचे सात वाजले होते. रेल्वे फलाटावर सफाई कामगारांचा खराटा जोरात फिरत होता. तेवढ्यात कोपऱ्यात झोपलेली म्हातारी सफाई कामगाराच्या नजरेस पडली. तो सफाई कामगार जोरात त्या म्हातारीला ओरडून म्हणाला, ''ऐ म्हातारे!, उठ इथून. ही काय झोपायची जागा आहे?

नाव काय तुझं?'' म्हातारी डोळे पुसत पुसत उत्तरली. ''शेवंता... शेवंताबाई..!'' मागील आठ दिवसांपासून अवकाळी वादळ, वारा, पावसाने कहर केला होता. याच सोसाट्याच्या वाऱ्याने शेवंताचं झोपडं पार मोडकळीस आलं होतं. अनेक वर्षांपासून बेघर असलेल्या शेवंताने एक झोपडं उभं केलं होतं. तेही आज वादळाने पार उद्ध्वस्त करून टाकलं. म्हणून शेवंता मागील चार-पाच दिवसांपासून वादळी पावसाचा तडाखा सहन करीत इकडे तिकडे दिवस काढत होती. कधी शाळेचा, कधी मंदिराचा तर कधी रेल्वे फलाटाचा आधार घेत होती.

शेवंताच्या कुंकवाचा धनी जाऊन १२ वर्षे झाली होती. शेवंताच्या स्मृती जशाच्या तशा आजही जागृत होत्या. जसे सर्वकाही काल-परवाच घडल्यासारखंच वाटत होते. शेवंताच्या लग्नानंतरची ५० वर्षे महादांसोबत आनंदात गेली. संसाराची वेल बहरत असताना दीपकचा जन्म झाला. अठराविश्व दारिद्र्यात पछाडलेल्या, हातमजुरीवर प्रपंच चालविणाऱ्या महादा- शेवंताला एका अपत्यावर समाधान मानावे मानले. 'जिथे राबती हात, तिथे उभा श्रीहरी' याचा प्रत्यय शेवंता आणि महादा या उभयताकडे बघून येत असे. कधी कुणाच्या मळ्यात, कुणाच्या शेतात पडेल ती कामे दोघेही आनंदात करायचे. दोघे निरक्षर पण जीवनात शिक्षणाचे महत्त्व जाणून होते. म्हणून आपला एकुलता एक लेक दीपकला शाळेत घालून शिकवून मोठं केलं. काबाडकष्ट करून दीपकची शैक्षणिक गरज भागवली. प्रसंगी अंगावर दोन कापडं कमी घ्यायची. भाकरीचीही काटकसर केली. परंतु दीपकला शिक्षणापासून वंचित ठेवले नाही. महादा आणि शेवंताने मोठ्या कष्टाने दीपकला शाळा शिकून मोठं केलं होतं.




दीपक शहरातल्या एका खाजगी कंपनीत काम करीत असे. मोबदल्यात त्याला पाचआकडी पगार मिळत होता. शेवंता आणि महादाच्या डोळ्यात समाधान दिसत होतं. जे कधी त्यांनी उभ्या प्रपंचात अनुभवलं नाही. दीपकच्या रूपाने घर गृहस्थीला आर्थिक हातभार मिळत होता. एकुलता एक लेक कमवता झाल्याने मानसिक सुख शेवंता व महादाला लाभलं होतं. दीपक कमवता झाल्याचे पाहून शेवंता-महादाच्या मनात दीपकच्या लग्नाचा विचार कृतीत परावर्तित होत गेला. आपल्या घराला हवी तशी, परिस्थितीला अनुरूप अशी सुंदर, सुशील शिकलेली सून घरात आणली होती. शेवंता व महादाच्या डोळ्यातलं स्वप्न प्रत्यक्षात साकार झालं होतं. आता काबाडकष्टाने महादाचे शरीर थकत चालले होते. थकलेल्या शरीराने कष्टाची कामे अवघड होत होती. अशातही शेवंताच्या मोलमजुरीमुळे तसा कुटुंबाला आधार कायमचं होता.

दीपक नित्यनेमाने सकाळी शहराकडे कामानिमित्त निघून जात असे. दीपक आपले नवपरिणीत जीवन आनंदाने जगत होता. मात्र, एके दिवशी दीपकचे बायकोशी कडाक्याचे भांडण झाले. महादा व शेवंताने सुनेची समजूत काढण्याचा प्रयत्न केला, परंतु तो निष्फळ ठरत होता. त्याचे कारणही तसेच होते. दीपक पूर्णपणे दारूच्या आहारी गेला होता. दारूच्या व्यसनापायी दीपकची बायको त्रासून गेली होती. दीपकचे दारू पिऊन घरी येणे नित्याचे झाले होते. एवढेच नव्हे, तर दीपक आपल्या बायकोला मारहाण करून मानसिक त्रासही देत असे. अति मद्यप्राशनाने त्याचे नैतिक आचरण घसरल्याचे बघून कंपनीच्या व्यवस्थापनाने त्याला तत्काळ निलंबित केले होते. दीपकची बायको माहेरी गेली; ती कधी परतलीच नाही. नव्यानेच उभा झालेला संसार अगदी काही महिन्यात कोलमडून पडला होता. आता दीपकचे दारू पिण्याचे प्रमाण अधिकच वाढले होते. एकुलता एक मुलगा व्यसनांच्या आहारी गेल्याने शेवंता-महादाचे मन विव्हळत होते. दीपक दोन दोन दिवस घराकडे फिरकतसुद्धा नव्हता. मित्रांच्या कुसंगतीत तो फार गुरफटून गेला होता. अनेक वाईट छंदामुळे कर्जबाजारीही झाला होता. ज्यांचे देणे बाकी आहे, असे त्याच्या घराकडे चकरा मारीत असे. शेवंता-महादाच्या माघारी राहते घर सावकारांकडे गहाण ठेवले हे फार उशिरा त्यांना कळाले होते.

महादाच्या समोर अनेक संकटे आज आ वासून उभी होती. दीपकच्या आचरणाने महादा नेहमी चिंताग्रस्त असायचा आणि याच वाढत्या चिंतेत महादाने प्राण सोडले. महादाच्या जाण्याने शेवंता पूर्ण एकाकी पडली. शेवंताला भूतकाळातील आठवणी स्वस्थ बसू देत नव्हत्या. दीपक अनेक दिवसांपासून बेपत्ता होता. कधी कधी गावातील लोकांच्या तोंडातून ऐकायला मिळायचे की, तुमचा दीपक आज इथे दिसला, तिथे दिसला. महादा-शेवंताच्या माघारी गहाण ठेवलेले घर सावकारांनी गिळंकृत केले होते. शेवंता बेघर होती. मुलगा व्यसनात बुडाल्याने शेवंता-महादाचे स्वप्न पूर्ण धुळीस मिळाले होते. शेवंता आज थकलेल्या शरीरासह कधी कुणाची धुणी-भांडी करीत असे. हातमजुरीच्या कामावर तिचा हातखंडा होता. मिळेल ते काम आनंदाने करीत होती. तिने कधीच कामात कसूर केला नाही. प्रतिकूल परिस्थितीतही शेवंताने कधीच नातेवाईकांकडे अथवा लोकांपुढे मदतीची हाक मारली नाही. आपल्यावर आलेली प्रतिकूल परिस्थिती ही मानवनिर्मित आहे, असे तिचे ठाम मत होते. म्हणून तिने कधीच तिने दैवाला दोष दिला नव्हता. आलेल्या परिस्थितीला तोंड देण्याची क्षमता स्त्री असूनही तिच्यात कायम होती. कष्टाने उभारलेले घर सावकाराच्या पाशातून मुक्त करणे आणि दीपक घरी परत येईल, ही मनीषा बाळगून निवारा म्हणून समर्थांच्या मंदिरालगत असलेल्या मोठ्या झाडाखाली झोपडं उभं करून शेवंता गुजराण करीत होती. निर्भीड, कणखर, करारी, मानसिकरीत्या प्रबळ होती शेवंता. परंतु वयोपरत्वे शरीर साथ देत नाही, याची जाणीव तिला होती. एके दिवशी ती आजारी पडली. ज्यांच्याकडे ती कामे करायची त्यापैकीच एका सावंत फौजदारांनी नजीकच्या रुग्णालयात तिला दाखल केले होते.

सलग चार दिवस शेवंतावर उपचार सुरू होते. दरम्यान, दीपकचा बालमित्र शहरातून गावी परतला. त्याचे गाव दीपकच्या गावावरून सात किलोमीटर पुढे आहे. त्याला प्रसंग कळाला होता. आपल्या बालमित्राची झालेली दुर्दशा अनेकांद्वारे मिळत होती. त्यानेच दीपकला शोधून काढले होते. अनेक दिवसांपासून बेपत्ता असलेला दीपक परतला. रुग्णालयात भरती असलेल्या आईची भेट मित्राने करून दिली. उपचारांना संथ प्रतिसाद देणारी शेवंता दीपकला बघून हर्षित झाली. आपला मुलगा परत आल्याचे मोठं समाधान शेवंताच्या चेहऱ्यावर झळकत होतं.

दुसरीकडे शेवंताची अवस्था बघून दीपक रडायला लागला. रडत रडत शेवंताची क्षमा मागत होता. दीपकला आपल्या अक्षम्य कृतीचा पश्चात्ताप झाला होता. औषधांना संथ प्रतिसाद देणारी शेवंता आपला मुलगा परतल्याच्या समाधानाने पूर्णपणे बरी झाली. दीपकने शेवंताला वचन दिले होते की, यापुढे मी पूर्णपणे व्यसनाचा त्याग करेल.

(पान ६ वर)



# ऋणी करावे मग जगजीवनाला, प्रीती धरावी पदसेवनाला

संत

**प्रकाश एदलाबादकर**

उज्जैनला तसा बरेचदा गेलेलो आहे. आप्तांची घरे असल्याने मुक्कामाचा प्रश्नच नसतो. मात्र प्रत्येक वेळी माझा एक कार्यक्रम निश्चित ठरलेला असतो. भल्यापहाटे उठून, आन्हिके आटोपून महाकाळेश्वराचे दर्शन घ्यायचे. दर्शन आटोपले की, क्षिप्रेच्या किनाऱ्यावर जाऊन एखाद्या घाटाच्या पायरीवर शांतपणे बसायचे. सूर्योदय व्हायच्या आधी हे साधले पाहिजे, हा कटाक्ष असतो. पहाटेची वेळ. किनाऱ्यावरील वृक्षांवर रात्रभर विसावलेले पक्षी घरट्यातून बाहेर पडलेले असतात. त्या पक्ष्यांची किलबिल, घाटाच्या आसपास असलेल्या लहान-मोठ्या मंदिरांमधून होणारे मंत्रोच्चार, घंटांचे आवाज, धूसर वातावरण, क्षिप्रेच्या पात्रावर पसरलेली धुक्याची चादर आणि उगवत्या सूर्याची चाहूल लागल्याने किंचित लालावलेले आकाश या सर्वांचे गारुड मनावर झालेले असते. एका अनिर्वचनीय आनंदाचा अनुभव येतो. तेवढ्यात घाटावरील एखाद्या लहानशा चहा टपरीवरून गाण्यांच्या लकेरी ऐकायला येतात. आता बरेच उजाडलेले असते. टपरीवर लागलेल्या गाण्याच्या ओळी कानावर पडतात...

**'किसलिये जीते हैं हम, किसके लिये जीते हैं ।**
**बारहा ऐसे सवालात पे रोना आया...'**
**चहा घेण्याच्या उद्देशाने टपरीकडे पावले वळली आणि**
**पुढच्या ओळी सहजपणे तोंडातून बाहेर पडल्या...**
**'कभी खुद पे कभी हालात पे रोना आया ।**
**बात निकाली तो हरेक बात पे रोना आया...'**

खरंच, आपण का जगतो आहोत? कुणासाठी म्हणून जगतो आहोत? कशासाठी आयुष्यभर ही धावपळ? कशासाठी हे भयग्रस्त जगणे? ऊर फुटेस्तोवर धावायचे. थकवा आला की, किंचित विश्रांती आणि पुन्हा धावपळ! मृत्यूच्या क्षणीच ही धावपळ थांबते. आपल्या मरणाचा क्षण जसजसा समीप येत असतो तसतसे आपले उभे आयुष्य डोळ्यासमोर उभे राहते, राहत असले पाहिजे. आपली ओंजळ किती भरली आहे आणि किती रिकामी आहे याचा ताळमेळ तर जमवत नसेल आपले मन? माणसाला नक्की कोण घडवते? त्याला बालपणी मिळालेले संस्कार की वाढत्या वयात त्याला आलेले अनुभव की त्याच्या भोवतालची परिस्थिती की त्याचे अदृष्ट प्राक्तन? माझ्या मनात प्रश्नांचे भुंगे घूं घूं करायला लागले.

मनात अनेक उर्मी असतात, अनेक संकल्प असतात; ते पूर्ण करण्याची प्रबळ इच्छाशक्ती असते, परंतु भवतालचा समाज आणि परिस्थिती फार कमी प्रसंगी अनुकूल असते. स्वार्थी समाजात वावरताना आपल्या पूर्व संस्कारांची कसोटी लागते. आपले नशीब हे आपल्या हातात आहे, हे वाक्य खोटे ठरविणाऱ्या अनेक प्रसंगांना सामोरे जावे लागते. आपल्या हातात आपले नशीब असण्यापेक्षा आपल्या हाती फक्त कष्ट आणि परिश्रम, साधे सांगायचे म्हणजे फक्त हाडफोड मेहनतच असते. नशीब ठरवणारा कुणी वेगळाच असतो. आपण कुणाच्या तरी हातातील बाहुले फक्त असतो. कठपुतळी असतो. सूत्रधार कुणी वेगळाच असतो. आपल्याला तो दिसेलच असेही नसते. अशाने मन विटून जाते. समर्थ म्हणतात...

**'बहू वीट आला भवाचा न सावे । अटव्यात देऊनिया हाक जावे ।**
**मनाते दमावे श्रीरामी रमावे । दिगांती फिरावे जनन स्मरावे ।**
**निघोनि जावे कठीण वनाला । अखंड गावे मग पावनाला ।**
**ऋणी करावे मग जगजीवनाला । प्रीती धरावी पदसेवनाला ।'**

क्षिप्रेच्या काठी बसल्या जागेवरच आपल्या भोवती दहाही दिशांना कुणीतरी आरसे धरलेले आहेत आणि आपण आपले प्रतिबिंब त्यात बघतोय, असे वाटायला लागले. प्रत्येक आरशातील प्रतिबिंब वेगळे. प्रत्येक प्रतिबिंबाची पृष्ठभूमी स्वतंत्र. माझा चेहरा तरी प्रत्येक प्रतिबिंबात सारखा होता का? छे! प्रत्येकाचे रूप वेगळे. माझ्याच गतकाळाचा एकेक तुकडा जिवंत होऊन मला दर्शन देत होता. हा स्वतःचाच स्वतःच घेतलेला शोध सुरू होता. माझेच मला भय वाटायला लागले. आता निघायला असा कितीसा अवकाश आहे. तरीही गाठी सुटत नाहीयेत. पाश तुटत नाहीयेत. विचार करता करता आपणच हतबल होतो. एक विचित्र असा एकलेपणा जाणवायला लागतो. गत आयुष्यातील एकेका घटनेचे जसजसे स्मरण होते, आपल्या आजवरच्या आयुष्यातील वाटा-वळणांची आठवण येते तसतसे आपण अधिकाधिक त्यात गुंतत जातो.

**'जीव पाहतो वर वर जाया चैतन्यासाठी ।**
**परी न सुटती जड देहाच्या ज्या पडल्या गाठी ।।'**

प्रपंचही हवाहवासा वाटतो आणि 'तो'ही हवाहवासा वाटतो, पण या दोहोंपैकी नक्की कोण हवे आहे? 'किसलिये जीते हैं हम, किसके लिये जीते हैं?' अशा प्रकारचे द्वंद्व अनेकदा आयुष्यात येते. मन भयग्रस्त होते. अशावेळी या भयाचा निरास आवश्यक असतो. खरे तर संपूर्ण ब्रह्मांडच भयाने व्यापलेले आहे. राजा भर्तृहरी यांचा एक अप्रतिम श्लोक आहे...

**'भोगे रोगभयं कुले च्युतिभयं वित्ते नृपालादभयं ।**
**माने दैन्यभयं बले रिपुभयं रूपे तरुण्या भयं ।।**
**शास्त्रे वादभयं गुणे खलभयं काये कृतांतादभयं ।**
**सर्व वस्तु भयान्वितं भुवि नृणां विष्णोः पदं निर्भयम ।।'**

कशाला कशाचे भय असते? भोगाला रोगांचे, उच्चकुळाला लोकापवादाचे, संपत्तीला शासकांचे, सन्मानाला दैन्याचे, बळाला शत्रूचे, रूपाला तारुण्याचे, शास्त्राला वादाचे, गुणीमाणसाला दुष्टांचे आणि शरीराला मृत्यूचे! असे सर्व जग भयान्वित आहे. केवळ एक श्रीविष्णूंचे नावच मनाला निर्भय करू शकते. एक बाब लक्षात येईल की, सर्वसामान्य माणसाला निर्भयपणे जगता येत नाही. कारण आपण सर्वजण आसक्तीने बांधले गेलो आहोत. ही आसक्ती जोपर्यंत नष्ट होत नाही; किंबहुना कमी होत नाही, तोपर्यंत ही भीती आणि त्यातून निर्माण होणारी प्रश्नांची मालिका संपणार नाही.


आपले हित नेमके कशात आहे, हे समजत नाही आणि जेव्हा समजते तेव्हा वेळ निघून गेलेली असते. भय असण्याची कारणमीमांसा करणारे अनेक आ२हेत. आपल्या मनात सतत कसले ना कसले भय असतेच. आसक्तीपोटी असलेले भय दोन गोष्टींना जन्म देते. एक म्हणजे क्रौर्य आणि दुसरे म्हणजे पळपुटेपणा. माणसे भयापोटी सत्य सोडून देतात आणि नको तिथे गुरफटून जातात. संतांनी यावर सक्रिय चिंतन केले, या चिंतनातूनच नामस्मरणासारखा प्रभावी उपाय सांगितला. समाजातील सर्वसामान्य आणि तळागाळातील वंचित भाग कित्येक शतके भयभीत अवस्थेत होता. संत सज्जनांच्या वचनांनी त्यांच्या मनात धैर्याची बीजे पेरली. याचे उत्तम उदाहरण म्हणजे संत जनाबाई. तिचे सर्व आयुष्य संत नामदेवांकडे गेले. जनीसारख्या कितीतरी महिला त्या काळात भयभीत अवस्थेत जगत होत्या. या सर्वांना ज्ञानेश्वरीने जवळ केले. जनाईच्या लक्षात आले की, नामस्मरणाच्या योगे मनात पांडुरंग साकारतो. (पान ६ वर)

# मल्लपुराणम्

प्रबंधांची बीजे

**श्रीरंग हिर्लेकर**

'नायमात्मा बलहिनेन लभ्यः' आपल्याकडे नेहमीच बलोपासनेला महत्त्व दिलेले आहे. बळ नसेल तर आत्मज्ञानही होत नाही. शतकाहुनी अधिक वर्षे व्यायाम प्रसाराचे कार्य करण्याऱ्या विश्वविख्यात हव्याप्र मंडळाच्या संग्रहात 'मल्लपुराणम्' नावाचे एक मोडी लिपीतील संस्कृत हस्तलिखित आहे. अनेक प्राचीन साहित्याप्रमाणे रचनाकाराचे नाव अज्ञात आहे. ७५ वर्षांपूर्वी देवनागरी प्रत तयार करण्यात आली, पण मराठी भाषांतराचे काम अनेक कारणांनी रेंगाळले. मंडळाच्या सांगण्यावरून दोन वर्षांपूर्वी मी त्याचे मराठी भाषांतर केले.



म म्हणजे आनंद आणि ल म्हणजे क्रीडा, हालचाल, लालित्य. सहज हालचालींनी आनंद निर्माण करण्यासाठी बळही हवे आणि चापल्यही आहे. ते ज्याच्याजवळ असेल तो मल्ल. पूर्वी राजेलोक आपल्या आश्रयाला अशा काही लोकांना ठेवून समाजरक्षणाचे काम करवून घेत. पुढे हा व्यवसाय करणाऱ्यांची मल्ल नावाची एक जातच तयार झाली.

'पुरा नवं भवति इति पुराणम्' म्हणजे जे पूर्वी होतेच आणि नंतरही नित्य आविष्काराने नवीन भासते ते पुराण. गुजरातमधील मेहेसाणा जिल्ह्यात मोढेरा नावाचे गाव असून पुराणातील उल्लेखानुसार ते धर्मारण्यात होते. तेथील मल्ल व्यावसायिक ब्राह्मण कुटुंबांची देवमल्लापासूनची परंपरा, उपासना, गोत्रप्रवरादी, इतिहास व मल्लविद्येची सांगोपांग माहिती सांगणारे हे एक ज्ञातिपुराण आहे. प्रस्तुत ग्रंथात याव्यतिरिक्त २० व्या शतकातील बडोदा संस्थानातील व्यंकाजेठी व कनकोजेठी केलवाडीकर यांनी लिहिलेल्या वज्रमुष्टी कुस्ती प्रकारच्या देवमल्लज्येष्ठींच्या एका लघुचरित्राचा पण मी समावेश केला.

इतिहास मुका असला, तरी एकूण भाषाशैली, सुभाषिते, योग, आयुर्वेद, आहारशास्त्र, मालीशतंत्र, ज्योतिष, आचारविचार, ग्रंथनिर्मितीचा काळ या सर्वांचे अवलोकन करताना 'मानसोल्हास' या ग्रंथाचा आणि मल्लपुराणाचा कर्ता एकच म्हणजे १२ व्या शतकातील चालुक्य राजा सोमेश्वर तृतीय या निष्कर्षाला मी पोचलो. मल्लपुराणही कृष्ण-सोमेश्वर संवाद याच स्वरूपाचे आहे. मथुरेला किशोरवयीन कृष्ण-बलरामांनी महाभयंकर कुवलयापीड हत्तीला, कंसदरबारातील अनेक अक्राळविक्राळ मल्लांसहित चाणूरमुष्टिकादी दैत्यांचा वज्रमुष्टी कुस्ती प्रकाराने वध केला. यावरूनच विष्णुनामसहस्रात कृष्णाचे नाव चाणूरांध्रनिषूदन असे पडले. शांकरभाष्याप्रमाणे चाणूरांध्र म्हणजे आंध्र म्हणजे तत्कालीन रानटी प्रदेशातील चाणूर नावाचा मल्ल.

बलरामाने मुष्टिकाचा वध केला. कालांतराने मयूरवाल नगरीत गर्ग गोत्रोत्पन्न कृष्णभक्त सोमेश्वर नावाच्या मल्लाला व त्याच्या मित्रांना कृष्णाने मल्लविद्या शिकवली. अक्राळविक्राळ आणि बलाढ्य मल्लांवर ज्या तंत्राने विजय मिळवला ते डावपेच पण या ग्रंथात विस्तृतपणे विषद केले आहेत. कृष्ण म्हणतो-

**'श्रुणु विप्र यथा पूर्वं मल्लवेषो मया धृतः ।**
**सह बलेन घातार्थं कंसचाणूरविद्विषाम् ।।**
**विस्तरात् कथयामित्वां यथा पूर्वं कृतं मया ।**
**त्वं सम्मतोऽसि पात्रं मे मल्लविद्याविधारणे ।।**

हस्तलिखितात असंख्य त्रुटी, दोष व पाठभेद आहेत. विविध ठिकाणांहून मी हस्तलिखितांच्या तीन प्रति आणून अभ्यासिल्या. पाठभेद, श्लोक व अध्यायसंख्येतील फरक, विसंगत रचना कशातही एकसूत्रता नाही. मल्लपुराणात अनेक पारिभाषिक आणि लोकभाषेतील शब्द आहेत. कित्येक आज अप्रचलितही झाले आहेत. सर्वांचा अन्वय लावणे हे फार कष्टाचे काम होते. क्रीडा, धनुर्वेद, आयुर्वेद, योगशास्त्र या सर्वांशी संबंधित हे शब्द तर आहेतच; पण मुद्रण कलेच्या अभावाने दुसऱ्याच्या प्रतिवरून लिहून काढताना लेखनिकाच्या अज्ञानामुळे भाषादोष, अपभ्रंश, व्याकरणातील चुका जागोजागी आढळतात. कालोदरात गडप झालेली काही पाने यामुळे असंबद्धताही आहे. कधी अध्यायाचे नाव आणि त्यातील विषयही जुळत नाहीत.

**अधिक संशोधनाची आवश्यकता**

हस्तलिखित प्रति काढणाऱ्या लेखकांच्या दोषांमुळे मल्लपुराणाच्या विविध प्रतीत मधेच विषय सोडून भरकटणे आढळते. प्रादेशिक भाषेतील शब्द तर असंख्य आहेत. उदा. १) **गोणी :** मल्लाने अंगावर गुरू किंवा लघु गोणी म्हणजे जड किंवा हलके पोते तोलावे असे प्रथम दर्शनी वाटते; पण तसे नसून घनी म्हणजे चुन्याच्या घाणीत फिरणारा गोल दगड हा अर्थ बरोबर आहे. आजही असे दगड आखाड्यात दिसतात. २) **फरकणे :** याचा अर्थ चपळ हालचाल, छोटनक म्हणजे लहान गदा अर्थात मुद्गर. तर्कानेच अशा शब्दांचा अर्थ लावावा लागतो.

**पारिभाषिक लुप्त शब्द :** शब्दांना शब्दार्थ, भावार्थ, लक्षणार्थ, व्यंगार्थ, रुढार्थ असे विविध प्रकारे अर्थ प्राप्त होतात. प्रादेशिक चालीरीतीनुसार शब्दांना निराळेच अर्थ चिकटून ते शब्द भाषेत लौकिकार्थ म्हणून अलगद समाविष्ट होतात. अनेकदा अपभ्रंशित रूपेच प्रचलित होतात. ज्येष्ठी मल्लाविषयी कृष्ण म्हणतो :

**'तत्रादौ तावदुच्यन्ते निःशेषा ज्येष्ठिनां गुणाः।**
**संस्कृत-प्राकृताभ्यां च तता लौकिकभाषया ।।३.१२।।'**
**'अपभ्रशांच्च वक्ष्यामि ये यत्रोक्तास्तथैव तान्'**

ज्येष्ठ मल्लांना भाषाज्ञान आणि शब्दांचे भान असावे.

संस्कृत, प्राकृत, लौकिक भाषा व तिच्या अपभ्रंशित रूपाचेही ज्ञान असावे. लेखकावर गुजरातचा संस्कार जाणवतो. साहजिकच अनेक गुजराती शब्द संस्कृतचे वस्त्र पांघरूण आलेले दिसतात.

उदा. कर्कर, लात, ताल, ताकण, फरकना, मुहडक, छोटनक, छडकी, ढोकर, लाग, वलन, गोणि, गोपकुल, करडकी, नदीबंद, हिंगु. काही शब्द तर संदर्भ बदलताच निराळाच अर्थ धारण करतात. स्थान हा शब्दही असाच आहे. स्थान म्हणजे मल्लाची उभे राहण्याची पद्धत किंवा पवित्रा आणि स्थान म्हणजे मर्मस्थान. 'शब्दश्रमः प्रमदाश्रम' हा शब्द. श्रम म्हणजे व्यायाम. प्रमदाश्रम म्हणजे मादक तरुणींसमवेत केलेली क्रीडा. मल्ल आणि ब्रह्मचर्य हे नाते असताना प्रमदेचे काय काम? प्रमदा नसून तेथे प्रगदाश्रम म्हणजे मोठी गदा फिरवणे असे वाटले. पण विचारान्ती प्रमदा हाच शब्द बरोबर आहे. कारण मल्लाचा मद जिरवणारा व्यायाम तो प्रमदाश्रम. आहार अध्यायात 'माक्षिक' असा शब्द आहे. माक्षिक नावाचे आयुर्वेदिक औषधही आहे आणि माक्षिक म्हणजे माशीपासून मिळतो तो मध. लेखकाला मध हाच अर्थ अपेक्षित आहे. 'मंथुनी नवनीता तैसे घे अनंता' असे करत विवेकबुद्धीने जुळवाजुळव करणे हे पहिले अवघड काम आणि मग त्याचे मराठी भाषांतर करणे हे दुसरे. (पान ६ वर)

# भारताच्या हत्तीची व्याघ्रझेप

समाजभान

**सौरभ श्रीवास्तव**

**कोणत्याही राष्ट्राला विकसनशील ते विकसित राष्ट्राचा लांबचा पल्ला गाठायचा असेल, तर संशोधन आणि विकास क्षेत्रात आर्थिक गुंतवणुकीला चालना देणे, हे अपरिहार्य. भारतानेही मोदी सरकारच्या नेतृत्वात यादृष्टीने ठोस पाऊले उचलली आहेत. म्हणूनच पूर्वी 'हत्ती' म्हणून ओळखला जाणार्या भारताची ही व्याघ्रझेप 'विकसित भारता'च्या भविष्यासाठी दिशादर्शक ठरावी.**

जागतिक परिस्थिती सध्या मोठ्या वेगाने पालटत आहे. नवे भू-राजकीय गट तयार होत आहेत, आर्थिक सीमारेषा अधिक कठोर होत आहेत आणि देश व्यापारशुल्क, तंत्रज्ञान आणि पुरवठासाखळ्या यांचा उपयोग एकमेकांविरुद्ध शस्त्रासारखा करू लागले आहेत.

या नव्या जागतिक व्यवस्थेत राष्ट्रीय सार्वभौमत्व म्हणजेच तंत्रज्ञानातील स्वावलंबन असे मानले जाऊ लागले आहे. या बदलत्या जागतिक परिस्थितीला मोदी सरकारने वास्तवदश आणि दूरदृष्टीपूर्ण प्रतिसाद दिला. पूव 'हत्ती' म्हणून ओळखला जाणारा भारत आता वाघासारखा झेपावून भविष्याकडे वाटचाल करत आहे.

गेल्या दहा वर्षांत देशाने आधुनिक नवोन्मेषआधारित अर्थव्यवस्थेची पायाभरणी केली आहे. डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा विस्तारल्या, संरक्षण आणि अंतराळ यांसारख्या धोरणात्मक क्षेत्रांना खासगी उद्योगांसाठी खुले केले आणि जगातील तिसर्या क्रमांकाची स्टार्टअप परिसंस्था विकसित केली. पंतप्रधानांनी आता भारताच्या प्रगतीतील सर्वांत मोठ्या अडथळ्याला म्हणजेच संशोधन आणि विकास क्षेत्रात पुरेशी आर्थिक गुंतवणूक न केल्याच्या जुन्या समस्येला थेट हाताळण्याचा आणि ती दूर करण्याचा निर्धार केला आहे. २०२४ मध्ये भारताचा एकूण संशोधन आणि विकासखर्च सुमारे १८ अब्ज डॉलर्स होता,

जो चीनच्या ४५० अब्ज डॉलर्सच्या खर्चाच्या २०व्या भागापेक्षाही कमी आणि इस्रायलच्या २५ अब्ज डॉलर्स खर्चापेक्षाही कमी आहे. धोरणात्मक आणि अत्यावश्यक तंत्रज्ञानक्षेत्रात आघाडी घ्यायची असेल, तर भारताने २०३५ पर्यंत किमान २०० अब्ज डॉलर्स (म्हणजे अपेक्षित सकल राष्ट्रीय उत्पन्न-ऋऊझच्या सुमारे तीन टक्के) इतका खर्च करण्याचे उद्दिष्ट ठेवायला हवे. यासाठी सरकारकडून मोठ्या प्रमाणावर निधी वाढवणे आवश्यक आहेच, पण त्याहून महत्त्वाचे म्हणजे उद्योग-क्षेत्रालाही अधिक मोठी जबाबदारी उचलावी लागेल. कारण, सध्या देशातील एकूण संशोधन आणि विकासखर्चाच्या केवळ एक-तृतीयांश भाग उद्योगक्षेत्रातून येतो, जो जागतिक पातळीवरील परिस्थितीच्या अगदी उलट कल आहे. आव्हान नक्कीच मोठे आहे, पण ते अशक्य नाही.

संशोधनातील सुप्त क्रांती

भारताचा विज्ञान आणि संशोधन क्षेत्रातील पाया भक्कम आहे, म्हणजेच आपल्या संशोधन संस्था, विद्यापीठे आणि वैज्ञानिक साधनसंपत्ती, अनेकांच्या कल्पनेपलीकडे खूप अधिक सक्षम, विकसित आणि प्रभावी आहेत. देशातील प्रमुख शिक्षणसंस्था विशेषतः 'भारतीय तंत्रज्ञान संस्था' आणि 'भारतीय विज्ञान संस्था' आता पदवीधरांपेक्षा अधिक पदव्युत्तर संशोधक तयार करत आहेत. या संस्थांमधील संशोधन आणि विकासविषयक कामाचे प्रमाण आणि गुणवत्ता दोन्ही झपाट्याने वाढले आहेत. काही उदाहरणे पाहूया....

'आयआयटी मद्रास'ने मानवी गर्भाच्या मेंदूचे जगातील सर्वांत तपशीलवार त्रिमितीय प्रतिमांकन केले आहेत. हे जागतिक खर्चाच्या केवळ एक-दशांश पट खर्चात, तर दहा पट अधिक स्पष्टतेसह केले आहे. 'आयआयटी कानपूर'ने एक कृत्रिम हृदय विकसित केले आहे, ज्याची किंमत सध्याच्या बाजारातील सर्वांत महागड्या हृदयाच्या केवळ एक सप्तमांश असेल. 'आयआयटी मुंबई'ने कर्करोगावरील सेल थेरपीत (कृत्रिम जनुक संशोधित रोगप्रतिकारक पेशींवर आधारित कर्करोग उपचारपद्धती) मोठी प्रगती केली असून, या उपचारांचा खर्च भारतीय रुग्णांसाठी तब्बल ९० टक्क्यांनी कमी केला आहे.

'IISb बंगळुरु'ने असा संगणक तयार केला आहे, जो मानवी मेंदूप्रमाणे विचार करतो आणि काम करतो. पारंपरिक संगणक '०' आणि '१' या द्विआधारी तर्कावर चालतात. पण, 'IISb बंगळुरु'ने तयार केलेल्या या 'नालॉग संगणन प्रणाली'त मेंदूप्रमाणे सतत बदलणार्या आणि अनेक स्तरांवर काम करणार्या १६ हजार, ५०० वेगवेगळ्या विद्युतअवस्था एका अतिशय सूक्ष्म आण्विक फिल्ममध्ये तयार केल्या आहेत. म्हणजेच, ही प्रणाली मेंदूच्या न्यूरॉन्सप्रमाणे शिकते, निर्णय घेते आणि माहिती प्रक्रिया करते. यामुळे कृत्रिम बुद्धिमत्ता अधिक वेगवान, कार्यक्षम आणि ऊर्जा-बचत करणारी होते.

मोदी सरकारच्या धोरणात्मक पावलांनी देशातील संशोधन आणि नवोन्मेषातील वाढीला योग्य साथ दिली आहे. संशोधन सुलभतेसाठी तयार केलेल्या नव्या चौकटीमुळे अनेक प्रशासकीय मंजुरींच्या टप्प्यांना काढून टाकण्यात आले आहे आणि शास्त्रज्ञांना अधिक स्वायत्तता देण्यात आली आहे. या सुधारणा १९९१च्या आर्थिक उदारीकरणा इतक्याच क्रांतिकारक मानल्या जात आहेत. कारण, यामुळे संशोधन आणि नवोन्मेषासाठी अधिक अनुकूल वातावरण तयार होत आहे.

या पार्श्वभूमीवर स्थापन करण्यात आलेली '-छठऋ'('अटल नॅशनल रिसर्च फाऊंडेशन') अर्थात 'अटल राष्ट्रीय संशोधन संस्था', काही प्रमाणात अमेरिकेतील 'NSF' (National Sbienbe Foundation)च्या धतवर उभारण्यात आली आहे. या संस्थेकडे पुढील पाच वर्षांसाठी ५० हजार





कोटी रुपयांचा निधी ठेवण्यात आला आहे. हा पैसा भारतातील-विद्यापीठे, महाविद्यालये, संशोधन संस्था आणि संशोधन आणि विकास प्रयोगशाळा यांना दिला जाणार आहे, जेणेकरून ते खासगी उद्योगांच्या सहकार्याने संशोधन करू शकतील.

हे संशोधन, ज्ञान वाढवण्यासाठी केलेले प्राथमिक शास्त्रीय संशोधन आणि अनुप्रयुक्त संशोधन म्हणजे त्या ज्ञानाचा वापर करून प्रत्यक्ष उपयोगी पडणारे तंत्रज्ञान, उत्पादने किंवा उपाय निर्माण करण्यासाठी केलेले संशोधन असे आहे. विशेष म्हणजे, या संस्थेचा प्रमुख कार्यकारी अधिकारी म्हणून उद्योगक्षेत्रातील अनुभवी व्यक्तीची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यामुळे संस्थेच्या कामकाजात परिणामावर लक्ष केंद्रित करणारी कार्यपद्धती आली आहे आणि विविध क्षेत्रांत समन्वय साधणारा आंतरक्षेत्रीय दृष्टिकोन निर्माण झाला आहे.

# ग्रहसंकेत

(रविवार, ९ नोव्हेंबर ते शनिवार, १५ नोव्हेंबर २०२५

नारायण जगन्नाथ कारंजकर, ज्योतिष भास्कर

ज्येष्ठ पत्रकार, फिल्टर पंपाजवळ, माढा रोड, मु.पो.कुर्डूवाडी, जि.सोलापूर (भ्र. ९४२३७५८४०१)

✻ **रविवार, ९ नोव्हेंबर-** खळनाथ कळसारोहण वर्धापनदिन, श्री पांडुरंग हजारे महाराज पुण्यतिथी इचलकरंजी ✻ **सोमवार, १० नोव्हेंबर-** रेणुकादेवी यात्रा बिजरगी (ता. विजापूर), श्री बावसिध्दस्वामी समाधी उत्सव शिरोळ, बाळकृष्ण सूर्यवंशी महाराज पुण्यदिन, चिदाबर दीक्षित जयंती ✻ **मंगळवार, ११ नोव्हेंबर-** राष्टीय शिक्षण दिन, गंगाधर महाराज पुण्यतिथी आरण (ता. मिरज), श्री महावीर स्वामी रथोत्सव दहिगाव (ता. माळशिरस), संत महात्माजी महाराज पुण्यतिथी कापसेवाडी (ता. माढा), शिवनाथदेव यात्रा कारवार, व्यंकनाथ यात्रा काले ता. कराड, काल भैरव जत्रा धारगळ (पेडण) ✻ **बुधवार, १२ नोव्हेंबर-** कालाष्टमी, कालभैरव जयंती, सिद्धनाथ यात्रा अकोला (ता. सांगोला), गादेगाव (ता. पंढरपूर), खरसुंडी (ता. आटपाडी), भैरवनाथ यात्रा अंकोली (ता. मोहोळ) ✻ **गुरुवार, १३ नोव्हेंबर-** नवदुर्गा जत्रा मडकई ✻ **शुक्रवार, १४ नोव्हेंबर-** बालदिन, पंडित नेहरू जयंती, क्रांतिगुरू लहूजी साळवे जयंती संगमवाडी (पुणे), महावीर दीक्षोत्सव (जैन) ✻ **शनिवार, १५ नोव्हेंबर-** उत्पत्ती एकादशी, आळंदी यात्रा, बिसडा मुंडा जयंती, महालय समाप्ती

**मुहूर्त:-✻ साखरपुडा-** १३, (२० पर्यंत), १५ नोव्हेंबर ✻ **डोहाळ जेवण-** १० नोव्हेंबर ✻ **बारसे-** ११ नोव्हेंबर (१२ नंतर) ✻ **जावळ-** १० नोव्हेंबर ✻ **गृहप्रवेश-** १०, १५ नोव्हेंबर

### मेष :- धन चिंता संभवते

अष्टमात बुधवारी बुध- मंगळाची युती होत आहे. त्यामुळे धन चिंता संभावते. गुरु- शुक्र केंद्र योग समस्यातून मार्गही काढणार आहे. फार चिंता करू नका. स्थावर सौख्य लाभेल. अडचणीतून मार्ग निघत जाईल. नवीन गुंतवणूक विचाराने करावी. शिक्षणात समस्या संभवतात. कौटुंबिक जीवनात सौख्य लाभेल. प्रकृतीस जपावे. शुभ ता. १०, १२

### वृषभ:- एक विचाराने रहावे

सप्तमात बुध- मंगळाची युती होत आहे. भागीदारीच्या व्यवसायात सामंजस्याने रहावे. विनाकारण वादाचे प्रसंग वाढवू नका. नोकरीत कामाकडे दुर्लक्ष होऊ देऊ नका. स्वमताग्रह टाळावा. कार्यक्षेत्रात विलंबाने मनासारख्या घटना घडतील. अपेक्षित संधी विचारणे स्वीकाराव्यात. कौटुंबिक जीवनात एकमताने एक विचाराने रहावे. शुभ ता. ९, १३

### मिथुन:- स्पर्धांमध्ये यश मिळेल

षष्ठात बुध- मंगळाची होणारी युती शारीरिक तक्रारी वाढविणारी आहे. आर्थिक मनासारखी झाल्याने समाधान वाटेल कलागुणांचा विकास होत जाईल बँक विमा क्षेत्र अनुकूल आहे. अडचणीतून मार्ग निघेल. स्पर्धांमध्ये यश मिळेल. चिकाटीने रहावे. प्रगती होत जाईल. अनावश्यक खर्च टाळावा. सुसंधीचा लाभ उठवावा. शुभ ता. १२, १५

### कर्क:- नव्या विचारांना चालना

पंचमात बुध- मंगळाची होणारी युती यांत्रिक, वैद्यकीय क्षेत्रात प्रगती करणारी आहे. सुख स्वास्थ्य लाभेल. विवाह विषयक निर्णय होतील. धार्मिक कार्य होतील. नव्या विचारांना चालना मिळेल. शिक्षण अनुभवातून मनासारखी प्रगती करू शकाल. आर्थिक व्यवहार विचारपूर्वक करावेत. वादाचे प्रसंग टाळावेत. तिखट पदार्थ जास्त खाऊ नये. शुभ ता. ९, १५

### सिंह:- अपेक्षित फलप्राप्ती

सुखस्थानी बुध- मंगळाची युती होत आहे. स्थावर, वाहन विषयक शुभ फले मिळतील. शारीरिक तक्रारींकडे दुर्लक्ष करू नका. कलागुणांचा विकास होईल. योजलेली कामे नियोजित वेळेत पूर्ण करावीत. अपेक्षित फलप्राप्ती होईल. उष्णतेपासून त्रास होईल. काळजी घ्यावी. फार दगदग करू नका. कौटुंबिक जीवनात सामंजस्याने रहावे. शुभ ता. १२,१३

### कन्या:-नव्या कामांना गती

धनस्थानी शुक्र लाभात गुरु यामुळे आर्थिक बाबतीत समाधानकारक प्रगती होईल. उत्साह, धडाडी वाढेल. संततीबाबतचे प्रश्न सुटू लागतील. नव्या कामांना गती मिळेल. गायन वादनादि कलेचा विकास होईल. कार्यक्षेत्रातील बदल लाभदायक ठरतील. गुढ शास्त्रात प्रगती होईल. नवे विचार प्रगती घडविणारे ठरतील. शुभ ता. १२,१३

### तुला:- सौख्य लाभेल

धनस्थानी बुध- मंगळाची युती होत आहे. यांत्रिक क्षेत्रात प्रगती होईल. कौटुंबिक जीवनात सौख्य लाभेल. प्रशासन सेवेत अनुकूलता वाढेल. नव्या कामांना गती मिळेल. सुसंधीचे स्वागत करावे. अडचणीतून मार्ग निघत जाईल. फार चिंता करू नका. वित्तीय संस्थात असणार्यांची विशेष प्रगती होईल. अपेक्षित घटना घडतील. शुभ ता. १३,१५

### वृश्चिक:- नव्या विचारांना गती

राशी स्वामी मंगळाची राशीतच बुधाशी युती होत आहे. अंगीकृत कार्यात समाधानकारक प्रगती साधता येईल. नव्या विचारांना गती मिळेल. अनुकूलतेचा लाभ उठवावा. धार्मिक, सामाजिक कार्यात पुढाकार घ्याल. आवडत्या चैनीच्या वस्तूंची खरेदी कराल. कौटुंबिक जीवनात सामंजस्याने रहावे. स्वमताग्रह टाळावा. शुभ ता. १२,१३

### धनु:- विचाराने रहावे

व्ययस्थानी होणारी बुध- मंगळाची युती आर्थिक बाबतीत प्रतिकूल आहे. जुने एखादे प्रकरण त्रासदायक ठरण्याची शक्यता आहे. छोटी साडेसाती चालू आहे. त्यामुळे विचाराने रहावे. सरकारी कामासाठी अधिक पाठपुरावा करावा लागेल. नव्या ओळखी पारखून घ्या. उष्णतेपासून त्रास संभवतो. काळजी घ्यावी. शुभ ता. १०,१२

### मकर:- नव्या विचारांना चालना

लाभस्थानी बुधवारी बुध- मंगळाची होणारी युती आर्थिक काम यशस्वी करणारी ठरेल. कौटुंबिक जीवनात सौख्याच्या घटना घडतील. सर्व प्रतिकूलतेवर मात करू शकाल. नव्या विचारांना चालना मिळेल. अडचणीतून मार्ग निघेल. सरकारी कामे मनासारखी होतील. खाद्यपदार्थ , गृह सजावट अशा क्षेत्रात प्रगती होईल. शुभ ता. ३, ७

### कुंभ:- नव्या संधीचे स्वागत करावे

कर्मस्थानी बुधवारी बुध- मंगळाची होणारी युती प्रगती करणारी आहे. भाग्यवृध्दिंगत करणार्या घटना घडतील. पदोन्नती होईल. नव्या संधीचे स्वागत करावे. गृहनिर्माण, विधी अशा क्षेत्रात मनासारखी प्रगती घडेल. ते टिकेल व त्यात वाढ ही होईल. महत्त्वाच्या योजना गुपीत ठेवाव्यात लगेच वाच्यता नको. शुभ ता. १५

### मीन:- मनासारखी प्रगती

भाग्यस्थानी होणारी मंगळ बुधाची युती यांत्रिक, वाहतूक क्षेत्रात मनासारखी प्रगती करणारी आहे, नव्या कामांना अपेक्षित फलप्राप्ती होईल. संततीबाबत अपेक्षित घटना घडतील. स्पर्धांमध्ये यश मिळेल. सरकारी कामे करून घ्यावीत. जुणे येणे सुरू होईल. अडचणी सुटतील.१२,१५

!! शुभ भवतु !!

# कावनई



दुर्ग जिज्ञासा

प्राची पालकर

सह्याद्रीच्या डोंगररांगा अनेक अद्वितीय गडकिल्ल्यांनी सजलेल्या आहेत. इगतपुरी परिसरावर तर निसर्गाने लावण्याची मुक्त उधळण केली आहे. इगतपुरी येथून पूर्व आणि पश्चिम दिशेला पसरलेल्या सह्याद्रीच्या डोंगररांगेत पूर्वेला कळसूबाई, अलंग, मदन, कुलंग असे अनेक प्रसिद्ध किल्ले आहेत. पश्चिम दिशेला त्र्यंबक रांगेत हरिहर, ब्रह्मगिरी, अंजनेरी, त्रिंगलवाडी, कावनई हे पौराणिक तसेच ऐतिहासिक महत्त्व लाभलेले दुर्ग आहेत.

कावनई किल्ल्यावर नाशिक-इगतपुरी येथून घोटी मार्गाने जाता येते. किल्ल्याची उंची २५०० फूट असून गावातून किल्ला चढण्यास एक- दीड तास पुरेसा आहे. कावनई गावातील कपिलधारा तीर्थ सुप्रसिद्ध तीर्थस्थळ असून पावसाळ्यात निसर्गसौंदर्याने अधिकच बहरलेले असते. किल्ल्याच्या पायथ्याच्या कावनई गावात पोहोचल्यावर उजव्या बाजूला किल्ला दिसतो. गावातील मारुतीच्या मंदिराजवळून किल्ल्यावर जाण्यास मळलेली वाट आहे. किल्ल्याच्या दिशेने साधारण अर्धा- पाऊण तास चालल्यावर आपण कातळकोरीव पायऱ्यांजवळ पोहोचतो.

पायऱ्या चढत किल्ल्याच्या प्रवेशद्वाराच्या दिशेने निघालो की, एक लोखंडी शिडी लावली आहे. दरवाजाच्या जवळील पायऱ्या उद्ध्वस्त झाल्याने ही शिडी आधारासाठी लावली असून या वाटेत आपल्याला एक गुहा आणि पाण्याचे टाके दिसते. किल्ल्याच्या प्रवेशद्वारातून आत गेल्यावर दोन्ही बाजूला उभे असलेले बुरूज आपले लक्ष वेधून घेतात. दरवाजाच्या उजव्या बाजूस एक गुहा असून या गुहेचा उपयोग पहारेकऱ्यांची देवडी म्हणून होत असे.

बुरुजावर चढून आजूबाजूचा प्रदेश पाहून, पुन्हा पायऱ्यांच्या मार्गाने चढत आपण गडमाथ्यावर पोहोचतो. गडमाथ्यावर वाड्यांचे अवशेष तसेच एक तलाव असून तलावाच्या काठावर शिवपिंड आणि नंदी आहे. शंभू महादेवाचे दर्शन घेऊन कातळात कोरलेले सर्पचित्र पाहून देवी पार्वतीच्या मंदिरात दर्शन घ्यावे. मंदिराच्या मागील खोलगट जागेवर पाण्याचे तीन टाके खोदलेले आहेत. येथून एक वाट बुरुजाकडे जाते. बुरुजावर चढण्यासाठी शिडी लावली असून येथे ध्वजस्तंभ आहे. गडाचा परिसर खूप मोठा नसल्याने तास-दीड तासात आरामात आपली गडफेरी पूर्ण होते. किल्ल्यावर मुक्काम करण्याची वेळ आल्यास गुहा आणि मंदिरात सोय होते. सकाळी लवकर पोहोचलात तर कावनई किल्ला आणि गावातील कपिलधारा तीर्थ तसेच श्री गजानन महाराजांचे तपस्या स्थान हे सर्व एक दिवसात पाहणे होऊ शकते.

कपिलधारा तीर्थ कावनई किल्ल्याच्या पायथ्याशी कपिलधारा तीर्थ आणि संत श्री गजानन महाराज यांचे तपस्या स्थान आहे. कावनई येथील कपिलधारा आश्रम महर्षी कपिल यांच्याशी संबंधित एक प्रसिद्ध तीर्थस्थळ आहे. महर्षी कपिल यांनी येथे आपल्या आईला सांख्यशास्त्र शिकविले म्हणून कपिलधारा तीर्थ याला 'मातृगया तीर्थ' म्हणूनही ओळखले जाते. आश्रम परिसरातील मुख्य मंदिरात श्रीराम, सीतामाई, लक्ष्मणासह श्री हनुमानाची नित्य पूजा केली जाते. मुख्य प्रवेशद्वारातून आत गेल्यावर कपिलधारा तीर्थ कुंड आहे. गोमुखातून सतत वाहणारी कपिलधारा म्हणजे गोदावरी आणि कपिला नदीचा संगम आहे, अशी मान्यता आहे.

इथे गोदावरीला गुप्त गोदावरी म्हणतात. येथील कुंडातील पवित्र पाण्याने स्नान केल्याने व्यक्ती मातृऋणातून मुक्त होतो, अशी श्रद्धा आहे. या झऱ्याचे पाणी गोमुखातून येते म्हणून याला 'कपिलधारा' नाव पडल्याचा उल्लेख 'कपिलोपनिषदात' आहे. येथे पाण्याची दोन कुंडे असून मुख्य कुंडातून दुसऱ्या कुंडात अविरत पाणी येत असते. दोन्ही कुंडे दगडी बांधकाम करून पक्की केली आहेत. तीर्थाच्या बाजूला रामाच्या भक्तीत लीन असलेल्या पवनपुत्र हनुमानाची मूर्ती आहे. पायऱ्या चढून वर गेल्यावर मुख्य मंदिर आणि कुंड आहे, कुंडाच्या उजव्या बाजूला श्री महादेवांचे आणि डाव्या बाजूला श्रीरामाचे मंदिर आहे. श्री महादेव मंदिराच्या गाभाऱ्यात स्वयंभू शिवलिंग असून समोर नंदीमंडप आहे. श्रीराम मंदिराच्या प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूस हत्तीची मोठी शिल्पे आहेत. गर्भगृहात श्रीराम, सीता आणि लक्ष्मण यांच्या मूर्ती आहेत. मंदिराच्या कळसावर छान कोरीव काम केले असून श्री हनुमंत आणि श्री महादेव यांची शिल्पे कोरलेली आहेत.

प्रभू श्रीराम आणि श्री महादेव यांची भेट येथेच झाली होती, अशीही आख्यायिका आहे. रावणपुत्र मेघनाथाच्या प्रहाराने लक्ष्मण जेव्हा राम-रावण युद्धात मूर्च्छित झाले तेव्हा मारुतीराया संजीवनी बुटी आणण्यास निघाले. ते जेव्हा कपिलधारा आश्रमाच्या वरून उड्डाण करून जात होते तेव्हा मारीचपुत्र कालनेमि राक्षसाने त्यांची वाट अडविली. येथे श्री हनुमंताने कालनेमि राक्षसाचा वध केला म्हणून 'कावनई' असे नाव प्रचलित झाले. सत्ययुगामध्ये कपिलमुनींनी येथेच माता अन्नपूर्णेस सांख्याशास्त्राचा उपदेश केला. या आश्रमाच्या दक्षिणेला राक्षसगुरू शुक्राचार्यांचा आश्रम होता. त्यांनी दंडकारण्याला शाप दिल्याने तेथे वाळवंट झाले होते. श्रीराम वनवास काळात येथे आले आणि त्यांच्या पदस्पर्शाने हा प्रदेश पुन्हा हिरवागार झाला. याच ठिकाणी संत ज्ञानेश्वरांनी आणि त्यांच्या भावंडांनी मिळून एका ब्राह्मणाच्या मुलाला पाणी शिंपडून जिवंत केले होते. या सर्व घटनांमुळे भाविकांच्या मनात अढळ स्थान प्राप्त झालेले कपिलधारा तीर्थ हे खूप रमणीय स्थान आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात समर्थ रामदास स्वामी आणि महाराजांची काही विशेष कारणाने येथे भेट झाली होती. त्यावेळी समर्थांची आणि महाराजांची सनातन धर्माच्या थोर परंपरेबद्दल चर्चा झाली. छत्रपती शिवाजी महाराजांनी महाराष्ट्रातील प्रत्येक गावात श्री हनुमान मंदिर स्थापित करावे, असा समर्थांनी त्यांना येथेच निर्देश दिला. संतश्रेष्ठ श्री गजानन महाराज यांनी या पवित्र स्थानी १२ वर्षे तपस्या करून ज्ञान प्राप्त केले. त्यानंतर ते शेगाव येथे प्रकट झाले. येथे सत्ययुगापासून सिंहस्थ कुंभमेळा आयोजित केला जात असे.

कपिलधारा तीर्थ हे सिंहस्थ कुंभमेळ्याचे मूळ स्थान आहे. या मजकुराचा पेशवेकालीन ताम्रपट येथे उपलब्ध आहे. पुढे १७५५ मध्ये शैव आणि वैष्णव यांच्यामध्ये पहिले स्नान कोण करणार या विषयावरून वाद झाला. वाद मिटावा म्हणून पेशवे काळात कुंभमेळ्याचे दोन भाग केले गेले. श्रीरामांचे भक्त असलेल्या भाविकांसाठी नाशिक येथे रामकुंड आणि शंकराचे उपासक असलेल्या शैवपंथी भाविकांसाठी त्र्यंबकेश्वर येथे कुशावर्त कुंड बांधण्यात आले. अजूनही सिंहस्थ कुंभमेळा असला की कपिलधारा कुंड येथे संपूर्ण पूजा केली जाते. गोमुखातून नैसर्गिकरीत्या अखंड वाहणाऱ्या जलधारांना कपिलधारा म्हणतात.

कपिलधारा कुंडात पवित्र स्नानाचे महत्त्व आहे. येथे एक गरम पाण्याचा अखंड वाहणारा झरा असून जवळच टेकडी आहे. तिला 'खंडोबाची टेकडी' असे म्हणतात. कावनई गावात श्री गजानन महाराज देवस्थानाचे साधना केंद्र आहे. येथे आता संस्थानाने भाविकांसाठी प्रसादालय तसेच इतर सुविधा सुरू केल्या आहेत. शेगाव येथील श्री गजानन महाराज संस्थानाची व्यवस्था किती चोख आहे, हे आपण सर्वच जाणतो. देशभरात जेथे कुठे संस्थानाच्या नावाने कार्य सुरू आहे, तेथेही अगदी शिस्तबद्ध सोय असते, याची प्रचीती भाविकांना आली असतेच. 'माउली' म्हणून अगदी नम्रतेने सूचना तसेच सेवा देणारे सेवेकरी हे येथील व्यवस्थेचे वैशिष्ट्य आहे. कावनई येथील श्री गजानन महाराज साधना केंद्रातसुद्धा असाच उत्तम अनुभव गाठीशी घेऊन आपली यात्रा पूर्ण होते.

तुलनात्मक दृष्टीने विचार केल्यास या भागातील इतर किल्ल्यांपेक्षा कावनई किल्ला चढणे सोपे आहे. किल्ल्याच्या पायथ्याचे कावनई गाव पौराणिक आणि ऐतिहासिक महत्त्व लाभलेले निसर्गरम्य ठिकाण असल्याने हे पर्यटकांच्या आवडीचे स्थान आहे.

पान ४ वरून

## ऋतू बेईमान झाले त्याची गोष्ट...!



कदाचित आपणच त्याला कारण आहोत ही जाणीव त्याला आणखी अस्वस्थ करते. आपण पेरलेल्या ज्वारीला कणीस येण्याचा जेवढा आनंद असतो ना त्यापेक्षा नांगराच्या फाळामूळे टिटवीचा खोपा तिच्या पिल्लासह मोडला ह्यांचे दुःख डाचत राहावे तसे. मग चार दिवस ठरलेला मुक्काम दुसर्या दिवशी दुपारी सरतो. घरातल्या वडीलधार्यांनी तोंडावरून हात फिरवला निघतांना की आपोआप गहिवरून येत मन, कोरड्या डोळ्यात आषाढ जमा होऊ लागतो. एखादी चिमणी हळूच विचारते, पुन्हा कधी याल हो मोठे बाबा? तो हसून उत्तर टाळतो कारण त्याने जर येतो, लवकरच! असे उत्तर दिले तर चिमणीच्या खोप्यावर आपला तेवढा हक्क उरलेला नाही असं त्याचं आतल मन सांगत असतं. परतीच्या वाटेत लहानपणी ज्या डोंगर दर्यावरच्या धबधब्याखाली आपण भिजलो होतो तेथे जाऊन भिजण्याची इच्छा निर्माण होते. तसेही वॉटरपार्कच्या डोहात भिजतांना नेहमी मन ह्या धबधब्यापर्यंत यायचे हे सत्य आठवून तो तेथे जातो खरा मात्र तेथे एकेकाळी पाणी ओसांडून वाहिल्याच्या खानाखुणा दिसत असल्या तरी माणसाच्या मायेसारखे पाणी मात्र आटून गेलेले असते. प्रचंड उद्वेग, अस्वस्थता ग्रीष्मातली तगमग, जेष्ठातल्या काही कोरड्या तर काही काळसर अस्वस्थ ढगांची गर्दी मनात दाटून येते. आषाढ श्रावणासारखा गहिवर दाटून आलेला असतो. भाद्रपदातल्या नद्यासारखं डोळ्यातल्या पाण्याला खळाळून वाहण्याची इच्छा असते. शिशिरात झाडाने आपल्याच पानातला जीवन अर्क खोडामुळात साठवून असे पानाला टाकून दिलेले असते तसे आपल्याला आपल्याच ऋतूंनी टाकून दिल्याची जाणीव होऊ लागते. एक मन धाडसाने स्वतःलाच प्रश्न विचारते, हे सर्व कशामुळे घडले? उत्तर देताना पुन्हा एकदा मनातला अहंकार जागृत होतो आणि ते अहंकारी मन स्वतःला खोटा दिलासा देत स्वतःचे नाणे खणखणीत असल्याचा कांगावा करत उद्गारते, साले इथले सारेच ऋतू बेईमान झालेत.

पान ४ वरून

## शेवंता

दीपक वचनपूर्तीसाठी प्रयत्नशील होता. पुढे दीपक त्याच कंपनीत रुजू झाला, जेथे पूर्वी त्याला निलंबित केले होते. कंपनीच्या व्यवस्थापकाला हमीपत्र लिहून दिले होते की, यापुढे मद्यपानापासून अलिप्त राहील. ज्या कारणाने दीपकची बायको सोडून गेली होती; ती पुन्हा परतली आणि दोघांचा संसार पुन्हा आनंदाने नव्याने सुरू झाला. दीपकने छानसे भाड्याचे घर बघितले. शेवंता मोलमजुरी करण्यापासून अलिप्त झाली. कर्ज आणि व्यसनापायी आपले घर सावकाराकडे गहाण होते, ते आज दीपकने सोडून आणले होते. पाहता पाहता पदरमोड करून कर्जातून दीपक मुक्त झाला. शेवंता-महादाच्या स्वप्नांना आकार मिळाला. दीपकने बायको व आईला दिलेले वचन पूर्ण केले. पण दीपकच्या मनात एक खंत अजूनही कायम होती, ती म्हणजे गैरवर्तनाच्या चिंतेत महादाला प्राण सोडावा लागला होता. दीपक अनेकदा शेवंताकडे व्यक्त व्हायचा. तेव्हा शेवंता जड अंत:करणाने म्हणायची, ''तुझा बा बघतोय रे! घेईल तुझे अपराध पोटात...!''

पान ५ वरून

## ऋणी करावे मग...

त्याचे पायाशी आपली चित्तवृत्ती समर्पित केली की, मग कसले भय आणि कसली चिंता? गावकुसाबाहेर अनेक जीव भयग्रस्त आहेत. त्यांनी काय भयातच जगायचे? त्यांनाही प्रकाशाचा मार्ग दाखवला पाहिजे. ती स्वतः पुढे झाली. तिने क्रांती केली. समाजातील, अध्यात्माच्या तत्कालीन ठेकेदारांना तिने ठणकावले.

**'डोईचा पदर आला खांद्यावरी ।**
**भरल्या बाजरी जाईन मी ।**
**हाती घेईन टाळ,खांद्यावरी वीणा ।**
**आता मज मना कोण करी ।**
**पंढरीच्या पेठे मांडियेले पाल ।**
**मनगटावरी तेल घाला तुम्ही ।**
**जनी म्हणे, देवा झाले मी वेसावा ।**
**रिघाले केशवा घर तुझे ।'**

क्षिप्रेच्या तटावर बसल्या-बसल्या विचारांची आवर्तने सुरू होती. अवंतिकेसारख्या तीर्थक्षेत्री परमपावन क्षिप्रेच्या पाण्याने आपली दुःखे शांत होतील का? आपले भय नष्ट होईल का?
आणि मग माउलीचे शब्द आठवले...

**'तैसे निष्ठा केले कर्म । झाडी करुनि रजतम ।**
**सत्त्वशुद्धीचे धाम । डोळा दावी ।।**
**म्हणोनिया धनंजया । सत्वशुद्धी गिंवसितया ।**
**तीर्थांचीया सावाया । आली कर्मे ।।**
**तीर्थे बाह्यमळु क्षाळे । कर्मे अभ्यंतर उजळे ।।**
**एवं तीर्थे जाण निमळें । सत्कर्मेची ।।'**

कसलेही दुःख न करता, मनात कुठलेही भय न बाळगता, मागील आयुष्याच्या घटनांची आठवण न करता उरलेले आयुष्य शांतपणे व्यतीत करावे हेच उत्तम. सूर्य बराच वर आला होता. क्षिप्रेच्या लाटांवर किरणांचे नर्तन सुरू होते. आयुष्यही असेच हिंदकळणाऱ्या लाटांसारखे असते नाही?

पान ५ वरून

## मल्लपुराणम्

**मल्लपुराणाच्या १८ अध्यायांचा अनुक्रम :**कृष्णपुरप्रवेशं, सोमेश्वरकृष्णप्रश्नोत्तरं, चतुष्पात्रवर्णनं, पंचांगमल्ललक्षणं, गजसिंहमृगवृषभमल्लस्वरूप, चत्वारिंशतकलाङ्ग-भूमिशुद्ध्यावरणकमंत्र:, अंङ्गघातं, चतुर्मल्लश्रम लक्षणं, भोजनं, सामान्यमर्दनं, वातपित्तकफनाशकं , अध्यात्म, युद्धसमयेराजसभावर्णनं, युद्धप्रकरणं, गजसिंहमृगवृषभयुद्धं, विज्ञानं, पुराणफलप्रशंसा.

**अध्यायातील विषयसंगती :**

१) मंगलाचरण, नारदांच्या प्रश्नावर ब्रह्मदेवाचे उत्तर. रामाने स्थापन केलेल्या नगरीत कृष्णबलरामांचे आगमन, तेथील काही ब्राह्मणांच्या भेटी.

२) सोमेश्वराच्या विनंतीवरून कृष्णाने कंस दरबारातील पराक्रमाविषयी सांगत मल्लविद्या शिकवण्यास आरंभ.

३) मल्लांचे ज्येष्ठी, अंतरज्येष्ठी, गोपकुल (लहान मुले) आणि भविष्यकालीन म्हणजे शिकावू ही प्रकार वैशिष्ट्ये.

४) आयुर्वेदानुसार मल्लशरीर वैशिष्ट्यांची अस्थिसार, मांससार, अस्थिमांस आणि मेदसार अशी विभागणी. ५) गज, सिंह, मृग, वृषभ असे मल्ल प्रकार : मल्लांचे युवा, प्राणवान, ज्येष्ठी, अंतरज्येष्ठी, गोप, भविष्य, बाल आणि वृद्ध इत्यादी प्रकार.

६) उरूसार, स्कंधसार, भुजसार, कटिसार, जानुसार हे गुण सांगत आखाड्याचे देवमान, मनुष्यमान व राक्षसमान असे प्रकार व मोजमापे तसेच मल्लांची दिनचर्या, प्रार्थना. ७) ध्वनी वगैरेंचे शकुन-अपशकुन असा विषय आहे व स्थान म्हणजे उभे राहण्याचे पवित्रे, गज, सिंह, मृग आणि वृषभ मल्लांच्या पायांच्या हालचाली आणि विविध घातप्रकार.

८) आखाड्यातील प्रवेश, अवलोकन, डावपेच, मर्मस्थाने, प्रतिस्पर्ध्यावर वर्चस्व गाजवणे, हल्ला, आसने, विविध व्यायाम, व अल्प, अर्ध, पूर्ण आणि अति अशी प्रमाणे व त्यांचे परिणाम, थंड पाण्याच्या स्नानाचे लाभ.

९) व्यायामाचे सामाजिक व वैयक्तिक फायदे, ऋतुचर्या, स्नान, उटणे यांचे लाभ. तसेच गाय, म्हैस, बकरी यांच्या दूध, दही व तुपाचे फायदे, साखर, मध, खांडसरी आणि आहारातील धान्यांचे तसेच मांसाहाराचे लाभदोष इ. १०) व्यायामाचे १६ प्रकार, मल्लखांबांचे साधा, लटकता आणि वेताचा असे प्रकार, फिरायला जाणे, वजने उचलणे, लेझीम, चढ चढणे इत्यादी सांगत १५ प्रकारचे लाग म्हणजे प्रतिस्पर्ध्याला भिडणे इ.

११) बाहुप्रेरक व्यायाम, अंगावर जड वजने तोलणे, मुद्गर-गदा फिरवणे आणि अजून काही पद्धती तसेच मालिश करण्याचे भीमसेनी, नारायणी, मसृणी आणि चित्रिणी असे ४ प्रकार व त्यांचे लाभ.

१२) आयुर्वेदीय त्रिदोष, अनारोग्याची कारणे, आरोग्यरक्षण, दोषाशमनार्थ उपाय.

१३) मल्लांचे आचारधर्म, यम नियम, शरीर व मनाचे वेग व त्याचे दुष्परिणाम.

१४) विजयी होण्याचे काही मार्ग, भित्रेपणा व शौर्य, स्त्रीसंग दोष, गोविंदपूजा, राजाने कुस्तीस प्रोत्साहन देणे, सामन्यांचे आयोजन, राजपरिवाराची सामन्यांना उपस्थिती, पुरस्कार वितरण, ६४ कलांचे विवरण.

१५) आनंददायी डावपेचात्मक कुस्ती, धर्मयुद्ध, असुरयुद्ध (क्रूर आणि जीव घेण्याकरिता केलेले) जरासंधी, हनुमंती,जांबुवंती आणि भीमसेनी कुस्ती प्रकार.

हस्तलिखित प्रतीत अनेक दोष असूनही जे उपलब्ध आहे ते फार मोलाचे आहे. अर्थात अजून फार मोठे संशोधन होणे गरजेचे आहे.

# अंतर्गत संघर्ष




सकारात्मकतेचे तत्वज्ञान
डॉ. नितीन ह. देशपांडे
deshapandenh@gmail.com

रातदिन आम्हां युद्धाचा प्रसंग हे वचन कानी पडल्यावर वाटायचे हे युद्ध परक्या शत्रूशी असते आणि त्याचे रणांगण बाह्य असते. त्यादृष्टीने लढवय्यांना जय्यत तयार राहावे लागते. यात कधी हार तर कधी जीत स्वीकारावी लागते, पण शेवटी-

ये जीवन है
इस जीवन का
यही है, यही है, यही है रंग रूप
थोड़े ग़म हैं, थोड़ी खुशियाँ
यही है, यही है, यही है छाँव धूप

असं म्हणत स्वतःची समजूत घालायची ही शिकवण अंगी बाणवत वाटचाल करायची. पण नंतर समज आल्यावर कळत गेलं. आजकाल शरीरांतर्गत लढे, संघर्ष, युद्ध सुरु असते. आपल्या अवयवांमध्ये! रक्त, मांस, पेशी, स्नायू, हाडे यांनी बनलेल्या शरीरात ही मंडळी गुण्यागोविंदाने क्वचितच नांदतात. आतमध्ये काहीतरी सुरु असते. आत्मा, मन, बुद्धी, विचार, भावना यांच्या दृश्यादृश्य जोडणीमध्ये. तसं आपलं शरीर असेम्ब्ली असतं. अनेकविध आकारांचे, भिन्न कार्य असलेले अवयव एकत्र जोडलेले असतात, त्यांतील द्रव आणि अंतःस्रावांनी शरीराचे कार्य सुरु असते. जोपर्यंत सगळे अवयव नेमून दिलेले काम व्यवस्थित, कुरबुर न करता पार पाडत असतात, तोपर्यंत गाडी रुळांवरून सुखेनैव मार्गक्रमण करीत असते.

शरीराला जर एखाद्या यंत्रणेची उपमा दिली तर त्याची संरचना साधारण शंभर वर्षे इतके आयुर्मान धरून केलेली असते. मात्र प्रत्येक अवयवाचे आयुष्य भिन्न आणि वेगळाले असते. प्रत्येकाचे शरीरातील स्थान वेगळे, आकार वेगळा आणि कार्य वेगळे. एखाद्या वाहनाशी याची तुलना करता येईल. तेथे हॉर्न, सीट, टायर्स, फ्युएल टँक प्रत्येकाचे स्थान, आकार आणि कार्यही वेगळे असते. तसेच हे शरीर रुपी वाहन आपण चालवत असतो. त्यांत ठराविक वेळी इंधन (अन्न) टाकत असतो, ज्यामुळे ऊर्जा तयार होते, उत्साह येतो आणि पाचकरसांचे कार्य सुचारू चालते.

**अंतर्गत कौटुंबिक प्रणाली (परिवर्तनशील मानसोपचार)-** मानसिक उपचारांची ही संरचना मनाकडे एक छोट्या छोट्या घटकांची किंवा उप-व्यक्तिमत्वांची मालिका मानते. यालाच शरीरांतर्गत कुटुंब म्हणतात. रिचर्ड स्वॅर्टझने ही संकल्पना अस्तित्वात आणली. या संरचनेचा हेतू आहे. आतला गाभा आणि हे छोटे-छोटे भाग यांच्यात निरामय नाते स्थापन करीत अंतिमतः शरीरात समन्वय विकसित करायचा. आतला गाभा या प्रक्रियेत पुढाकार घेत सगळ्या घटकांचे संरक्षण करेल आणि त्यांची तोडमोड होण्याचे टोक टाळता येईल. भूमिका आणि अवयवांचे काम सहकाराने साध्य होईल.

**प्रमुख संकल्पना**

**स्वयं-** मानवी स्वभावाचा हा गाभा असतोः शांत, उत्सुक, सहृदय, आत्मविश्वासू आणि धाडसी. हा हिस्सा नसतो तर नेतृत्व करणारी शक्ती असते.

**घटक-** मनाच्या विविध उप-प्रणालींद्वारे स्वतःचे असे भावविश्व निर्माण होणे (भूमिका, आस्था आणि संवेदना यांचे मिश्रण असलेले.)

सर्वमान्य उदाहरणांमध्ये संरक्षक (व्यवस्थापक आणि अग्निशामक) आणि निर्वासित या संज्ञांचा विचार करू या...

संरक्षक अवयव आपली शरीरांतर्गत यंत्रणा सुरक्षित ठेवतात. व्यवस्थापक यंत्रणा पुढाकार घेऊन नियोजन, नियमन आणि इतर व्यूहरचनांची हाताळणी करते आणि परिस्थिती सांभाळते. अग्निशामक अवयव प्रतिक्रिया देणारे असतात त्यामुळे वेदना जाणवली की ते कार्यान्वित होतात. कदाचित टोकाला जाऊन ते भावनांना कह्यात ठेवतात. मग स्व-इजा पातळीही गाठली जाऊ शकते.

याउलट निर्वासित अवयव शरीरातील वेदना आणि आघात सांभाळतात. संरक्षक रचना सामान्यतः यांना हद्दपार करून यंत्रणा शाबूत ठेवतात.

**अंतर्गत प्रणालीचे कामकाज -**

(पहिला टप्पा) **परिचय-** मनाच्या आणि शरीराच्या ज्या घटकांकडे लक्ष देणे आवश्यक आहे त्यांचा निर्देश उपचारक करतो.

(दुसरा टप्पा) **भार हलका करणे -** अवयवाच्या टोकाच्या प्रतिक्रिया जाणून घेत, उदा. आघात, नकारात्मक अनुभव, स्वजनांचे मृत्यू इत्यादी यांचे ओझे कमी करणे

(तिसरा टप्पा) **जखमा भरून येणे -** भय आणि सल यासारख्या भावना हळुवारपणे हाताळणे

(चौथा टप्पा) **नव्याने मेळ /सुसंवाद -** स्वयं ला घटकांपासून अलग करणे, विभक्त करणे हे अंतिम ध्येय असते. त्यायोगे स्वयं पुढाकार घेऊन दुरुस्ती यंत्रणा सुचारू रूपाने चालवू शकतो.

(पाचवा टप्पा) **उपचारतंत्रांचा वापर-** मुलाखत, अंतर्मुख होणे, कल्पनाचित्र, अवयवांच्या भय आणि भुमिकांबद्दल औत्सुक्य अशी अनेकविध तंत्रे उपचारकर्ता वापरत असतो ज्यायोगे व्यक्ती आणि त्यांचे अवयव संवाद साधू शकतात.

**अंतर्गत कलह समजून घेणे-** परस्परविरोधी भावनांच्या वेढ्यात सापडून बरेचदा आपल्याला ध्वस्त झाल्यासारखे वाटते. शरीराच्या एखाद्या घटकाला जोखीम घ्यावीशी वाटत असेल तर त्याचवेळी नेमका दुसरा अवयव सुरक्षित जगण्यासाठी खुणावत असतो. सदर कौटुंबिक यंत्रणेला मनाच्या विविध भागांना संघ म्हणून जगवायचे असते, आपापल्या संरक्षक कवचांसह. जेव्हा आतल्या आत विरोधाभास जागे होतात, तेव्हा जाणून घ्यावे. नियमनासाठी शरीरांतर्गत कलह सुरु झालेले आहेत. कामाच्या स्थळी, नात्यांमध्ये आणि व्यक्तिगत विकासासाठी हे संघर्ष समजून घेणे अत्यावश्यक असते.

**(१) नोकरी/व्यवसाय-** जेव्हा परिपूर्णतेसाठी शरीर झगडत असते तेव्हा भय अथवा अपयश या भावना त्यामागे संरक्षक म्हणून कार्यरत असतात. काय करावे अशा वेळी? टीका? नाही. सहृदयतेने त्यांना समजावून सांगावे आणि समतोलाची वाट जोखावी.

**(२) नातेबंध-** आपले स्वजनही व्यक्तिमत्वात जखमा आणि संरक्षक अवयव बाळगून असतात. मतभेद टाळायचे असतील तर मनानुभूती बाळगावी, प्रश्न सुटतात.

**(३) विकास-** प्रत्येक निर्णयाचा पाया एखादी भावना (उदा. भय, सल) आहे कां सुस्पष्ट शांतता हे तपासून बघावे.

शरीरांतर्गत कुटुंब प्रणाली अंतर्बाह्य समजून घेण्याची गरज नसते, फक्त शांतता, औत्सुक्य आणि सहृदयता या गुणविशेषांची कास धरावी.

शरीरांतर्गत चालणारे लढे कधीकधी असह्य होतात आणि त्याचा परिणाम केवळ आत्मविश्वासावर होत नाही तर चिंता, नैराश्य अशा वर्तनावर होतो. फक्त अंतर्गत कौटुंबिक प्रणाली सुचविते की हा टीकेचा स्वर शत्रू नसून भावी हल्ल्यांपासून सुरक्षित ठेवण्याची ती शरीराची एक कृती असते. शरीरात दडून बसलेल्या या स्वरांना ओळखून त्यांच्यावर सकारात्मक उपाययोजना करणे हे मानसशास्त्राचे काम आहे. स्व-टीकाकार शोधून मनातील विचार जर सहृदय, कणवेच्या प्रतिसादांनी बोथट करता आले तर मनातील रणांगण शांत होते.

**शरीरात डोकावणे-** वाटचाल अवघड झाली, चुका होऊ लागल्या, अपयश पिच्छा सोडेनासे झाले की स्व-कणवेचा निर्धार आपल्या साहाय्याला येतो. मग मनावरील घाव बुजत जातात. फक्त या कणवेच्या आड काय असते, येऊ शकते याचा अदमास घेता आला पाहिजे. हा शरीरांतर्गत संघर्षाचा स्वर बरेचदा टीकेचा पर्याय निवडतो आणि आपल्या कृती अमान्य करतो. तू निरुपयोगी आहेस तुला काही जमत नाही तू अक्षम आहेस अशी खच्ची करणारी वाक्ये कानी आदळली तर ती टीका अधिक धारदार वार करते.

या आतल्या आवाजाची एकदा जाणीव झाली की भावना आणि उत्प्रेरणा उत्पादकतेला पाठिंबा देतात आणि आळस दूर करतात. एका छोट्या प्रयोगातून हे समजून घेता येईल.

**सूचना -**

(१) शरीराचा कोणता अवयव जास्त महत्वपूर्ण आहे आणि त्यांच्याबद्दल तुमची भावना काय आहे?

(२) जेव्हा तुम्ही स्वतःवर टीका करता, त्याचे नेमके स्वरूप कसे असते? अपमान? स्वतःला कमी लेखणे? आत्मनिंदा? मर्यादा ओलांडणे?

(३) तेव्हा आतून काय जाणवते? काही दुखऱ्या नसांवर कळत-नकळत बोट ठेवले जाते कां?

(४) अशावेळी ओठांवर कोणती भाषा आपोआप येते? काही उदाहरणे द्यावीत.

(५) कल्पना करा, दुसरी एखादी व्यक्ती याच भाषेत आणि टोनमध्ये तुमच्याशी बोलते आहे. तुम्हाला हे चालेल कां? तुम्ही हे सहन कराल कां? तुमची प्रतिक्रिया शब्दबद्ध करा.

(६) हे तुम्हाला चालत नसेल तर स्वतःवर टीका कां करता?

(७) या दुखावण्यामुळे तुम्हाला स्व-सुधाराची काही प्रेरणा मिळते कां पराभूत झाल्यासारखे वाटते?


(८) एखादा जिवलग मित्र, जो तुमच्यावर विनाअट बेहद प्रेम करतो, त्याने जर तुमचे दोष काढले, किंवा चुका दाखविल्या तर तुमची प्रतिक्रिया काय असते?

(९) वरील प्रश्नानुसार, मित्राचा आवाज वापरून स्वतःमधील टीकाकाराला तुम्ही शांत करू शकाल कां? त्यासाठी काय आवश्यक असेल?

अंतर्गत कौटुंबिक प्रणाली ही उपचारपद्धती अवयवांमधील एकात्मकतेला अबाधित ठेवण्याच्या प्रयत्नात असते आणि त्यांतून आघातांची हाताळणी साधत अंतिमतः समन्वयाकडे वाटचाल करायला शिकविते. हा पुढाकार आतून यावा ज्यायोगे मनः स्वास्थ्य सुधारते आणि विकास संभवतो यासाठी हे उपचार असतात. पुढील भागात या तंत्राची अधिक ओळख करून घेऊ.

---

# मोदींचा प्रवास उलगडणारा दस्तऐवज



**प्रसिद्ध विधिज्ञ आणि लेखक बर्जिस देसाई यांनी लिहिलेल *“Modi's Mission”* हे पुस्तक म्हणजे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जीवन प्रवासाची आणि कार्याची सखोल मांडणी करणारी एक प्रभावी गाथा आहे. मोदींचा प्रवास बालपणातील संघर्षांपासून ते जागतिक पातळीवरील नेतृत्वापर्यंतचा शब्दचित्रातून उलगडणारा हा दस्तऐवज. त्यातील मोदींचे व्यक्तिमत्त्व उलगडणारे निवडक उतारे...**

वाचावेसे काही..
प्रतिनिधी

**उतारा १ :** भारतातील बुद्धिवंत उच्चभ्रू वर्गापैकी काही जण मोदींना समजून घेऊ शकलेले नाहीत. ते चौत्यांदा गुजरातचे मुख्यमंत्री झाल्यानंतरही, त्यांना वाटत होते की, त्यांचे राजकीय भविष्य एक मजबूत प्रादेशिक नेता म्हणून मर्यादित आहे. २०१३ च्या सुरुवातीला, मोदींचा राष्ट्रीय नेता म्हणून झपाट्याने उदय होत असतानाही, भाजपाचे पंतप्रधानपदाचे उमेदवार म्हणून त्यांच्या नावाची घोषणा होणार नाही, असे या मंडळींना अगदी खात्रीपूर्वक वाटत होते. २०१४ च्या प्रचारात त्यांनी निर्माण केलेला झंझावात आता रोखता येणे कठीण आहे, असे दिसू लागल्यानंतरच ही मंडळी खऱ्या अर्थाने अस्वस्थ झाली. नरेंद्र मोदी पंतप्रधान झाल्यास आपण देशांतर करू, असेही काहींनी जाहीर केले. कुणी तसे केले. मात्र नाही. राष्ट्रीय लोकशाही आघाडी-एनडीएच्या (भाजपप्रणीत) २०१४ च्या विजयाला, त्यांनी नशिबाची देणगी, एक अपवादात्मक योगायोग मानला.

संयुक्त पुरोगामी आघाडी- यूपीए सरकारच्या दुसऱ्या कार्यकाळातील निष्काळजीपणामुळे निर्माण झालेल्या जनक्षोभामुळे मिळालेला एकवेळेचा लोकांचा कौल हा तो त्यांना वाटलेला योगायोग! एनडीए पुन्हा जिंकेल. याबद्दल ही उच्चभ्रू मंडळी साशंक होती. त्यामुळे २०१९ मध्ये भाजपाचा पराभव होईल या त्यांच्या अपेक्षेने पुन्हा एकदा उचल खाल्ली, पण झाले भलतेच आणि भाजपाने विक्रमी बहुमत तर मिळविले. त्यांना युतीची गरज ही पडली नाही. २०२४ मध्ये निकालाच्या दिवशी भाजपाला बसलेल्या धक्क्यामुळे त्यांच्या आशा क्षणभर पल्लवित झाल्या, परंतु नंतर त्याही मावळल्या.


ही मंडळी एक गोष्ट लक्षात घेण्यात कमी पडतात की, मोदींनी भारताच्या राजकारणात असा मोठा आणि आमूलाग्र बदल घडवून आणला आहे. अशा कथित उच्चभ्रूंच्या सुरक्षित, प्रतिष्ठित विश्वाचे मनोरे आणि संरक्षित कोष उद्ध्वस्त झाल्यामुळे सामान्य पृष्ठभूमीचा माणूस सलग तिसऱ्यांदा पंतप्रधान बनला, हे ते सहन करू शकत नाहीत. हे लोक स्वतःला निःपक्ष म्हणवतात; प्रत्यक्षात मोदींबद्दल त्यांचा दृष्टिकोन पूर्वग्रहदूषित आहे.

**उतारा २ :** दीर्घकाळ दुर्लक्षित अवस्थेत राहिल्यानंतर नरेंद्र मोदी जेव्हा वास्तव, टाळता न येणारे सत्य ठरले, तेव्हा या उच्चभ्रू वर्गाने स्वतःला समजावले की, बरं, मोदी तर आता आलेच आहेत, पण दिल्ली ही काही गांधीनगर नाही. त्यांना खात्री होती की, मोदींना राज्य चालवता येत असले, तरी देश चालवणे हे वेगळे आणि अधिक अवघड काम आहे. ते पहिल्यांदाच खासदार झाले होते आणि सरळ पंतप्रधान बनले. त्यामुळे केंद्र शासनाची गुंतागुंत त्यांना समजणार नाही. दिल्लीतील नॉर्थ ब्लॉक या वित्त आणि प्रशासकीय केंद्रातील नोकरशाही ही एक गुंतागुंतीची यंत्रणा आहे. त्या यंत्रणेच्या चक्रव्यूहातून मार्ग काढणे किंवा इतर देशांशी व्यवहार करणे मोदींच्या क्षमतेबाहेरचे ठरेल. गुजरातचे १३ वर्षे मुख्यमंत्री म्हणून त्यांचा प्रशासकीय अनुभव केंद्र सरकार चालवण्यासाठी अपुरा ठरेल. पाश्चात्त्य शक्ती किंवा इस्लामिक देश त्यांना कितपत स्वीकारतील. त्यांचा कट्टर हिंदू राष्ट्रवाद शेवटी त्यांच्याच विरोधात जाईल आणि त्यांना अपयश येईल. नरेंद्र

मोदींचे पंतप्रधानपद म्हणजे विध्वंसाच्या दिशेने वाटचाल, अशा कल्पनाविश्वात ही मंडळी रममाण होती. जणू मोदी अपयशी ठरावेत यासाठी हे लोक आतुरतेने वाट पाहत होते. २०१४ च्या निवडणुकीच्या प्रचारादरम्यान आणि नरेंद्र मोदी निवडून आल्यानंतरसुद्धा पाश्चात्त्य माध्यमे त्यांच्याबद्दल कठोर टीकाकाराच्या भूमिकेतच होती, टीका करण्यात अजिबात मागे नव्हती. पण भारत भाग्यविधात्याच्या काही वेगळ्याच योजना होत्या. मोदी अपयशी ठरतील अशी साशंकता आणि काही प्रमाणात अपेक्षाही पूर्णपणे चुकीची ठरली. त्यांच्या कार्यकाळातील पहिल्याच १०० दिवसांनंतर उच्चभ्रू बुद्धिवंताच्या शिडातील हवाच निघून गेली.

मोदींनी प्रशासनात मोठे बदल घडवले. नोकरशाहीतील अनावश्यक स्तर कमी केले, सरकारी कर्मचाऱ्यांसाठी बायोमेट्रिक उपस्थिती प्रणाली सुरू केली आणि गांधी जयंतीच्या दिवशी स्वच्छ भारत मिशनची घोषणा केली. जन धन योजना सुरू केली. या योजनेमध्ये पहिल्याच दिवशी १.५ कोटी बँक खाती उघडली गेली. तसेच औद्योगिक क्षेत्रांचे पट्टे, स्मार्ट शहरे आणि गावांमध्ये ब्रॉडबँड सुविधा वाढविण्यासाठी महत्त्वाचे धोरणात्मक उपक्रम जाहीर केले. परकीय थेट गुंतवणूक (एफडीआय) वाढविण्यासाठी उपाययोजना केल्या आणि परदेशात असलेल्या काळ्या पैशाची वसुली करण्यासाठी विशेष तपास पथकांची स्थापन केली. पूर्वी ज्यांनी त्यांना व्हिसा देण्यास नकार दिला होता, तेच देश आता त्यांना भेटीसाठी आमंत्रित करण्यासाठी उत्सुक असतात. अशा प्रकारच्या वैयक्तिक अपमानानंतरही मोदींनी अमेरिकेचे आमंत्रण अत्यंत उदार मनाने स्वीकारले.

पंतप्रधान म्हणून त्यांच्या १२ महिन्यांचा कार्यकाळ पूर्ण झाल्यानंतर स्वतंत्र आंतरराष्ट्रीय संस्थांनी घेतलेल्या सर्वेक्षणांमध्ये नरेंद्र मोदींची लोकप्रियता विक्रमी पातळीवर असल्याचे दिसून आले. त्या सर्वेक्षणांनुसार ८७ टक्के भारतीय मोदींबद्दल पसंतिदर्शक मत बाळगतात. त्यापैकी ६८ टक्के लोकांना ते अतिशय पसंतीचे वाटतात,आणि ९३ टक्के लोक त्यांच्या सरकारच्या कार्यकाळाला मान्यता देतात. जुलै २०२५ मध्ये मॉर्निंग कन्सल्ट सर्व्हे या लोकप्रियता आणि जनमताचे सर्वेक्षण करणाऱ्या अग्रगण्य अमेरिकी संस्थेनुसार सलग ११ वर्षे सत्तेत राहूनही नरेंद्र मोदी ७५ टक्के मान्यता मानांकनासह जगातील सर्व लोकशाही मार्गाने निवडून आलेल्या नेत्यांपैकी सर्वात लोकप्रिय नेता ठरले. शेवटी ‘द इकॉनॉमिस्ट’ या प्रसिद्ध नियतकालिकालाही त्यांच्या मनातील प्रश्नाचे उत्तर मिळाले आणि अनिच्छेने का होईना, पण वेळोवेळी नरेंद्र मोदींचे




कौतुक करावे लागले. मोदींनी ‘टाईम’ मासिकाच्या ‘पर्सन ऑफ द ईयर’ (वर्षाचा मानकरी) या ऑनलाईन वाचक-मतदानात ओबामा आणि ट्रम्प यांसारख्या जागतिक नेत्यांनाही मागे टाकत लाखो मते मिळवून पहिला क्रमांक मिळविला.

**उतारा ३ :** बुद्धिवंत उच्चभ्रू समाजातील काही लोकांना हिंदू सांस्कृतिक राष्ट्रवाद (जो परंपरा आणि संस्कृतीवर आधारित आहे) आणि अल्पसंख्यकांविरोधात असणारा अतिरेकी जातीयवाद (जो द्वेष पसरवतो) यामधला साधा फरकही समजत नाही. त्यांना वाटते की, धर्माचा कोणताही प्रभाव देशावर असूच नये.

२००२ चे दंगे झाले नसते तरीही हे लोक नरेंद्र मोदींच्या विरोधातच उभे राहिले असते. मात्र आता मोदींच्या तिसऱ्या निवडणुकीतील विजयामुळे हे उच्चभ्रू लोक मान्य करत आहेत की, भारताला मोदी हवेत.

अलिकडील निवडणुकांमध्ये भाजपाला मुस्लिम मतांचा वाढता पाठिंबा मिळाल्याने हे स्पष्टपणे दिसून येते. मंदिरात प्रभू श्रीरामांची पूजा करणारा, कन्याकुमारीत ध्यानधारणा करणारा आणि नवरात्रीत उपवास करणारा राष्ट्रभक्त नेता पाहून हे उच्चभ्रू लोक बुचकळ्यात पडतात, अस्वस्थ होतात. पण वास्तव हे आहे की, देशाच्या वैचारिक विश्वात या उच्चभ्रू लोकांचा प्रभाव आता खूपच कमी झाला आहे.

**उतारा ४ :** नरेंद्र मोदींनी सामान्य मुस्लिमांच्या विचारसरणीत एक मोठा बदल घडवून आणला आहे. मोदींच्या ११ वर्षांच्या कार्यकाळानंतर मुस्लिमांचा विश्वास आता बळावत चालला आहे की, मोदी त्यांचे संरक्षण इतर कोणत्याही भारतीय नागरिकाप्रमाणेच करतील. भारतीय मुस्लिमांमधील साक्षरतेचा दर आणि शैक्षणिक पातळी सातत्याने सुधारत असल्याने, पाकिस्तान हा आपला मित्र नसून शत्रूच असल्याचे त्यांना निर्विवादपणे पटू लागले आहे. मोदी हे देशासाठी काम करणाऱ्या देशभक्त मुस्लिमांच्या योगदानाची नेहमीच दखल घेतात. मग ते नागरिक असोत किंवा सशस्त्र दलात कार्यरत असोत, त्यांच्या देशसेवेचा गौरव करण्याची एकही संधी मोदी अजिबात सोडत नाहीत. राज्यघटनेतील कलम ३७० वे रद्द करणे किंवा नागरिकत्व सुधारणा कायदा लागू करणे किंवा राम मंदिराची निर्मिती यांसारख्या निर्णयांचा भारतातील सामान्य मुस्लिम व्यक्तीच्या हक्कांवर आणि हितसंबंधांवर कोणत्याही प्रकारे प्रतिकूल परिणाम होत नाही. त्यांचे मूलभूत हक्क, भारताच्या संविधानांतर्गत व्यवस्थित संरक्षित आहेत आणि सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालयांच्या निगराणी खाली त्यांचे संरक्षण होत आहे. त्याचप्रमाणे जर भारतात हिंदू राष्ट्र ही संकल्पना, धर्मसत्ताक म्हणजे एखाद्या धर्मावर चालणारे राज्य म्हणून नव्हे, तर केवळ एक संस्कृती आणि सांस्कृतिक ओळख म्हणून मांडली गेली, तर ही संकल्पना भारतीय मुस्लिमांच्या हिताला कधीही बाधक ठरत नाही. देश म्हणून आणि या देशाचे नागरिक म्हणून आर्थिक, वित्तपुरवठा किंवा पैशांच्या बाबतीत त्यांच्याबाबत कोणताही भेदभाव केला जात नाही. मात्र, त्यांच्या दैनंदिन जीवनात समाजातील काही घटकांकडून त्यांना अजूनही पूर्वग्रह आणि भेदभाव सहन करावा लागतो, हे खरे आहे. तरीसुद्धा त्यामुळे ते देशाच्या नजरेत दुय्यम किंवा कमी दर्जाचे नागरिक ठरत नाहीत.

**उतारा ५ :** पूर्वी धर्मनिरपेक्षतेचा अर्थ चुकीच्या पद्धतीने लावला गेला होता. थोडक्यात सत्य नाकारत स्वतःच्या सोयीने इतिहासाचा अर्थ लावणे, अल्पसंख्यकांचा अनुनय करणे, नोकऱ्यांत आणि आर्थिक लाभांत एकतर्फी सवलती देणे, पाकिस्तानच्या खोडसाळपणाला मिळमिळीत प्रतिसाद देणे आणि हिंदुत्वाला नाक मुरडणे म्हणजेच धर्मनिरपेक्षता, असे मानले जात होते. पण आता भारतीय राजकारणात अशा चुकीच्या अर्थाला अजिबात थारा दिला जात नाही; धर्मनिरपेक्षतेचा अर्थ देशहित आणि समानतेशी जोडला गेला आहे आणि या मोठ्या विचारपरिवर्तनाचे श्रेय मोदींना दिले जाईल. दुसरीकडे मोदी यांनी अल्पसंख्यकांबाबत घेतलेल्या निर्णयांमध्ये आणि कृतींमध्ये पूर्णपणे न्याय्य आणि समतोल वागणूक आहे. त्यामुळे भारतीय मुस्लिम आणि भारतीय ख्रिश्चन, विशेषतः महिलांच्या मनात नरेंद्र मोदींबद्दल असलेले गैरसमज, शंका आणि पूर्वग्रह यांची किल्मिषे आता वेगाने दूर होत आहेत. भारताचे कल्याणकारक राज्य धर्मनिरपेक्ष आहे, म्हणजे ते कुणावरही धर्मावर आधारित भेदभाव करत नाही. त्यामुळे सरकारने कोणत्याही धर्मावर अन्याय केला आहे, दुजाभाव दाखवला आहे, असा आरोप कुणी करू धजणार नाही. मोदींच्या काळात देशात जातीय किंवा धार्मिक शांतता टिकून आहे; मोठ्या प्रमाणावर किंवा अत्यंत हिंसक अशा कोणत्याही दंगली झालेल्या नाहीत. परिणामी भाजपाला मिळणाऱ्या अल्पसंख्यक मतांच्या टक्केवारीत देशभरात वाढ होत आहे.

मुख्यमंत्री आणि पंतप्रधान म्हणून त्यांनी आर्थिकदृष्ट्या दुर्बळ घटकांसाठी लागू केलेल्या सर्व उपाययोजना सर्व समुदायांना समान न्यायाने लागू झाल्या आहेत. त्यांच्या सरकारच्या कोणत्याही उपाययोजना किंवा योजना प्रामुख्याने फक्त हिंदूंनाच लाभ मिळेल अशा पद्धतीने बनवलेल्या नाहीत. म्हणूनच हळूहळू आणि नकळत भारतीय मुस्लिमांचे विचार बदलत आहेत. कट्टर धर्मांध धार्मिक उपदेशकांबद्दल त्यांचा भ्रमनिरास वाढत आहे. यांनी द्वेष पसरवण्याव्यतिरिक्त त्यांचे जीवन सुधारण्यासाठी म्हणून काहीही केलेले नाही असे त्यांना वाटते तर नरेंद्र मोदींनी त्यांचे जीवन निश्चितपणे सुधारले आहे. गॅस सिलेंडर योजनेपासून इतर सर्व सरकारी योजनांचा फायदा देताना हिंदू-मुस्लिम कोणताही भेदभाव केला जात नाही; एक रुपयाचाही फरक न करता सर्वांच्या खात्यात समान रक्कम जमा होते.

# स्वदेशी : अर्थविचारातील स्थानिकता

समाजभान

डॉ. हर्षल भडकमकर

**आजच्या स्पर्धात्मक आणि व्यापारयुद्धाच्या पार्श्वभूमीवर 'स्वदेशी'च्या संकल्पनेचे महत्त्व प्रकर्षाने अधोरेखित होते. म्हणूनच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संबोधनांतही 'स्वदेशी'चा, 'आत्मनिर्भरते'चा आवर्जून उल्लेख होताना दिसतो. त्यानिमित्ताने 'स्वदेशी'च्या विचारांचे अर्थचिंतन आणि अर्थविचारातील स्थानिकता यांचा आढावा घेणारा हा लेख...**




भांडवलशाही आणि साम्यवाद या दोन्ही अर्थचिंतनांच्या मुळाशी असलेले जडवादाचे तत्त्व एका स्पर्धात्मक समाजाचे निर्माण करते. हिंदू दृष्टिकोनातून विचार करता, अशा प्रकारचे स्पर्धात्मक वातावरण शाश्वत प्रगतीसाठी योग्य नसते, तर मनुष्याच्या आणि संपूर्ण समाजाच्या अर्थ- काम पुरुषार्थांचे योग्य प्रकारे पालन होईल, अशा प्रकारची समाजव्यवस्था आणि त्यास अनुकूल अर्थव्यवस्था शाश्वत विकासासाठी उपयुक्त ठरू शकते. परंतु, नीतितत्त्वांच्या आधारे प्रत्यक्ष धोरणात्मक निर्णय घेण्यापूर्वी एक मधली अवस्था म्हणून अर्थचिंतनाचे एक प्रतिमान उभे करणे आवश्यक असते. हिंदू चिंतनास अनुकूल अशा प्रकारच्या आर्थिक प्रतिमानाचे निर्माण 'स्वदेशी' या मार्गाने करण्याचा प्रयत्न आज आपण थोडयात जाणून घेऊ...

जडवादी स्पर्धात्मक अर्थचिंतनात ही स्पर्धा भरवणारी संस्था कोणती, याचा विचार पुरेसा सखोलपणे केलेला आढळत नाही. ॲडम स्मिथच्या मते, बाजाराचा अदृश्य हात या स्पर्धेचे नियमन करतो. या सोप्या वाटणार्या प्रतिमानामध्ये बाजार म्हणजे काय आणि आदर्शवत बाजारव्यवस्था उपलब्ध नसेल, तर स्पर्धेचे संचालन कोण करणार, या महत्त्वाच्या त्रुटी होत्या. ज्या पुढील काळातील अर्थचिंतकांनी भरून काढण्याचा प्रयत्न केला. या सर्व त्रुटींवरील उपायांचा समान धागा म्हणजे नियामक संस्थांचे निर्माण आणि त्यांच्यावर शासनाचे प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष नियंत्रण. साम्यवादी चिंतनाने संपूर्ण वेगळ्या दिशेला जाऊन स्पर्धेचे नियमन सरकार करते आणि त्यातील प्रमुख खेळाडूही सरकारच असते, असा काहीसा विचार मांडला. परंतु, सर्व जडवादी चिंतनांमध्ये शासनाचे अस्तित्व नियामक म्हणून असतेच.

भांडवलशाही व्यवस्था ही एकाधिकारशाहीच्या तत्त्वतः विरोधात नाही, हे आपण पाहिलेच आहे. त्यामुळे बाजारपेठीय तत्त्वाने चालणारी भांडवलशाही आणि तिचे नियमन करणारी शासनव्यवस्था ही दुहेरी व्यवस्था सत्तास्थानांच्या केंद्रीकरणाला जन्म देते. परंतु, नियमकांचे नियमन कोण करणार, असा प्रश्न या व्यवस्थेला विचारल्यास त्याचे नेमके उत्तर एक तर मिळत नाही किंवा तर्कबुद्धीने विचार केल्यास नियामकांच्या अनंत साखळीची कल्पना करावी लागते. कोणत्यातरी एका स्तरावर केवळ तर्कप्राधान्याच्या आधारे विचार न करता, काही विशिष्ट नीतितत्त्वांचा आधार घेतल्याशिवाय या व्यवस्थेचे योग्य नियमन शक्य नाही, हे उघड आहे. प्रचलित अर्थचिंतन या प्रश्नाला शक्य तितके मागे दडपत असल्याने त्यात केंद्रीकरणाची प्रवृत्ती वाढत जाते.

प्रचलित अर्थचिंतनाचा एक दुसरा दोष म्हणजे, व्यक्तिकेंद्रित आणि समाजकेंद्रित अशा दोन शाखांमध्ये विभागले गेलेले अर्थशास्त्र मानवी समाजजीवनाला कोणत्या गंतव्यापर्यंत न्यायचे आहे आणि त्या मार्गातील अर्थशास्त्राची भूमिका काय, याचे आकलन हरवून बसले आहे. त्यामुळे व्यक्तिगत पातळीवर अमर्याद सुखाचा पाठलाग आणि सामाजिक पातळीवर तत्प्रसंगी तर्कसुसंगत भूमिकांचे चयन यातून एक समाज म्हणून आपण कोणत्या गंतव्याकडे जात आहोत, याचे नेमके आकलन आजचे अर्थशास्त्र मांडत नाही. अमर्याद व्यक्तिगत भोगाचे तत्त्व शाश्वत विकासाशी विसंगत आहे, हे खरेच. परंतु, सततच्या घटत्या वाढीव उपयुक्ततेच्या सिद्धांताने भोगांचे तार्किक पातळीवर नियमन होईल आणि त्यातून सर्व समाजासच एक तत्कालिक स्थिर स्थिती प्राप्त होईल, असे प्रचलित अर्थचिंतन मानते. अर्थात, दीर्घकालीन विचार करता, समाजाच्या प्रगतीबरोबर त्याच्या अर्थकारणाचीही सततची वाढीव गती अपेक्षित असल्याने 'सर्वकालीन स्थिर स्थिती' किंवा 'अंतिम गंतव्य' ही संकल्पनाच या व्यवस्थेत परकीय आहे. परंतु, मानवी गरजांच्या तुलनेत अधिकाधिक भोगवस्तू उपलब्ध असणार्या राष्ट्रांकडे आपण आज पाहिले, तर त्यांचे समाज आज कोणत्याही कलहमुक्त, तणावमुक्त स्थितीच्या जवळपास तरी पोहोचलेले दिसतात काय?

इतिहासात जरी पाहिले, तरी अधिक समृद्ध समाज अथवा व्यक्ती अधिक समाधानी असल्याचे आपल्याला दिसत नाही. त्यामुळे शाश्वत विकास आणि सामाजिक स्थैर्य हे जर आपले गंतव्य असेल, तर आर्थिक सुबत्ता त्यासाठी आवश्यक अथवा साहाय्यभूत असल्याचे कोणतेही प्रमाण आपल्याकडे नाही. थोडक्यात म्हणजे, जडवादी अर्थचिंतन हे सिद्धांत आणि प्रत्यक्ष प्रमाण दोन्ही पातळ्यांवर शाश्वत समाजव्यवस्थेच्या निर्माणात अपयशी ठरते.

औद्योगिक क्रांतीनंतर जागतिक अर्थचक्रास मिळालेल्या गतीमध्ये मानवी श्रमांचे नेमके महत्त्व काय, याचाही विचार काहीसा एकांगी पद्धतीने केलेला जाणवतो. मानवी शारीरिक अथवा बौद्धिक श्रम ही क्रय होणारी एक वस्तू असून, तिच्या कमीतकमी उपयोगाने अधिकाधिक उपभोग विकत घेता यावेत, असा श्रमिक वर्गाचा विचार असतो, तर याच मानवी श्रमांच्या कमीतकमी वापरात अधिकाधिक उत्पादन करून अधिकाधिक नफा मिळवणे, हे भांडवलदारांचे उद्दिष्ट असते. या श्रमांतून मिळणारे जे निर्मितीचे आत्मिक समाधान असते, त्याचा विचार या सर्व चिंतनात होत नाही. कार्यालय ही एक क्षमतारूपी संसाधनाच्या व्ययाची जागा असून, त्याबदल्यात मिळणार्या द्रव्याच्या साहाय्याने कार्यालयेतर स्थानी सुखोपभोगांची खरेदी करणे, असा विभक्त स्थानांचा विचार प्रचलित अर्थचिंतनात मांडला जातो.

भारतीय चिंतनाच्या भाषेत मांडल्यास अर्थ साधण्याच्या आणि काम साधण्याच्या जागांमध्ये एक विभक्तपणा प्रचलित चिंतनातून निर्माण होतो, जो मूळ मानवी प्रकृतीशी विसंगत आहे.

अर्थचिंतनाचे भारतीय प्रतिमान कसे असावे, हा विचार करण्यापूर्वी सध्याच्या प्रचलित प्रतिमानांमध्ये कोणत्या प्रमुख त्रुटी आपल्याला जाणवतात, यांचा विचार आवश्यक आहे. उपरोल्लेखित सर्व त्रुटींचा एकत्रित विचार केल्यास असे दिसते की, अर्थ-कामाचे नियमन करणार्या धर्माची संकल्पना आणि पुरुषार्थ एकाच वेळी व्यक्तिगत आणि सामाजिक स्तरावर साधण्याचा विचार या दोन्हीचा अभाव प्रचलित अर्थचिंतनात दिसतो. त्यामुळे 'व्यक्ती विरुद्ध समाज' आणि 'अर्थ विरुद्ध काम' अशी दोन द्वैते या चिंतनातून उभी राहतात. या द्वैतांमधून मार्ग काढण्याचा पाश्चात्य तर्कप्राधान्याचा विचार अपेक्षित उत्तर देऊ शकत नाही. भारतीय विचार या द्वैतांना टाळून त्यांच्यातील एकात्म तत्त्वाचा विचार करण्याचा आहे. हा विचार सिद्धांतस्वरूपात आपल्याला 'स्वदेशी' या तत्त्वाच्या आधारे मांडता येऊ शकतो.

'स्वदेशी' या अर्थतत्त्वाचा शब्दशः अर्थ म्हणजे स्थानिक परिसंस्थेवर अवलंबित अर्थव्यवस्था. औद्योगिक क्रांतीच्या पूर्वीच्या जगात व्यापार करण्यायोग्य वस्तू या केवळ मौल्यवान रत्ने वा धातू, कपडे, मसाले अशा प्रकारच्या असत. दैनंदिन व्यवहाराच्या वस्तूंचा क्रय-विक्रय देशोदेशींच्या बाजारपेठांमध्ये होत नसे, तर त्या स्थानिक पातळीवरच बहुतांश उपलब्ध असत. अशा प्रकारे आपल्या गाव, जिल्हा किंवा त्याहून थोड्या मोठ्या भौगोलिकदृष्ट्या एकसंध अशा भूभागात ज्या वस्तूंची निर्मिती होते, त्यांचेच अधिकाधिक उपयोजन दैनंदिन व्यवहारात करणे, हे 'स्वदेशी' अर्थचिंतनात अभिप्रेत आहे.

स्थानिक बाजारपेठेला उठाव देण्याचे तत्त्व हे आपण समकेंद्री वर्तुळांच्या प्रतिमानात पाहू शकतो. ज्याच्या केंद्रस्थानी व्यक्ती आहे, ही व्यक्ती एकाचवेळी निर्माता आणि उपभोक्ता अशी दोन्ही असते आणि या दोन्ही आयामांचा विचार एकत्रितपणे केलेला असतो. या प्रतिमानात आपल्याला आवश्यक वस्तू जर दोन ठिकाणांहून विकत मिळत असेल, तर त्यातील जे ठिकाण आतील वर्तुळात आहे, त्याला प्राधान्य दिले जाईल. हाच विचार आपल्याकडील वस्तूच्या विक्रीसाठीसुद्धा लागू असेल.

आपल्याला हवी असलेली वस्तू जितया दुरून प्राप्त होणार आहे, तितके त्या वस्तूच्या प्रवासावर नैसर्गिक संसाधनाच्या स्वरूपातील सामाजिक धन तर खर्च होणार आहेच, परंतु त्या वस्तूपासून मिळणारा आनंद त्या वस्तूच्या एकंदरीत परकीय रंगरूपामुळे त्या प्रमाणात कमी असेल. परंतु, स्वदेशी हा केवळ स्थानिकतेला प्राधान्य देऊन तर्कबुद्धीच्या आधारे मागणी-पुरवठ्याची गणिते नव्याने मांडणे इतकाच मर्यादित विचार नाही. स्थानिकतेला प्राधान्य देताना त्यात स्थानिक परिसंस्थेबरोबर एकरूप होऊन तिला अनुकूल असे भोगांचे नियमन अपेक्षित आहे. आपल्या स्थानिक परिसरात मिळणारी धान्ये, भाजीपाला, फळे इत्यादींचे सेवन, स्थानिक पर्यावरणास अनुकूल पेहराव, त्याहून अधिक श्रीमंती उपभोग घेतानाही पर्यावरणीय समतोलाचा विचार हा 'स्वदेशी' अर्थतत्त्वात अंतर्भूत होतो.

आपल्या उत्पादनाची निर्मिती स्थानिक आवश्यकता लक्षात घेऊन केल्यास त्याची विक्रीही प्राधान्याने स्थानिक बाजारपेठांमध्ये होणे स्वाभाविक आहे. किंबहुना, समकेंद्री वर्तुळांच्या तत्त्वाचा सखोल विचार हेही आपल्याला सांगतो की जागतिक व्यापार स्वदेशी-प्रणित अर्थविचारात निषिद्ध नाही. काही विशिष्ट वस्तू, उदा. काही प्रकारची खनिजे, या जागतिक बाजारपेठेतूनच खरेदी कराव्या लागतील. पण अशा वस्तूंसाठी सर्वांत आतले वर्तुळच जागतिक वर्तुळ असेल, हे ध्यानात घ्यायला हवे. स्वदेशी त्यापुढे जाऊन अर्थकारणावर आधारलेली मानवी समाजाची विण तयार करणारा विचार आहे. जेव्हा व्यक्तीचे बहुतांश अर्थव्यवहार तिच्या स्थानिक वर्तुळात पूर्ण होतात, तेव्हा त्या सर्व व्यवहारांनाही त्या व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व लाभते. प्रचलित व्यवस्थेतील चेहराहीन अर्थव्यवहारांपेक्षा असे व्यवहार अधिक जिवंत पद्धतीने होऊन त्यात आत्मीयता निर्माण होण्याची संभावना निर्माण होते. एकाच स्थानिक वर्तुळात अर्थ आणि काम या दोन्ही पुरुषार्थांची पूर्ती होताना त्यांच्यातील द्वैत नष्ट होते आणि त्याच वर्तुळातील सर्व व्यक्तींच्या समाजाचा विचार करता, व्यक्ती आणि समाज हे द्वैतही उरत नाही. परंतु, 'स्वदेशी' म्हणजे स्वराष्ट्रीय नव्हे. एक अर्थचिंतन म्हणून पाहताना 'स्वदेशी' हा केवळ स्थानिकतेस प्राधान्य देणारा आणि स्थानिक परिसंस्थेशी तादात्म्य सांगणारा विचार आहे. भारतासारख्या विशाल राष्ट्राचा विचार करता, त्यातील भौगोलिकदृष्ट्या भिन्न प्रकृतीच्या कित्येक प्रदेशांना स्वतःचे स्वदेशी स्थानिक वर्तुळ हे आपल्या प्रदेशापुरते आखावे लागेल. त्यांच्यातील परस्पर आर्थिक व्यवहार अधिक मूल्याचे असणे, हे 'स्वदेशी' तत्त्वाच्या आधारे योग्य ठरणार नाही. 'राष्ट्र' संकल्पना ही सांस्कृतिक आहे, तर 'स्वदेशी' ही प्रामुख्याने आर्थिक संकल्पना आहे. या दोन्ही संकल्पनांमध्ये काही प्रमाणात समानता असली, तरी त्या एकाच विचाराचे दोन आयाम नव्हेत. निर्वसाहतीकरणाचा जो विचार सांस्कृतिक क्षेत्रात लागू आहे, त्याचेच आर्थिक क्षेत्रातील रूप 'स्वदेशी' हे आहे.

विकेंद्रीकरण आणि स्थानिक रचनांना महत्त्व हा दोन्हींचा समान धागा आहे. भारतीय चिंतनातील अंतिम गंतव्याचा विचार ध्यानात घेऊन सामाजिक गंतव्य निश्चित केल्यास तिथपर्यंत पोहोचण्यासाठी स्वदेशी प्रतिमान अर्थायामाला दिशा देण्यास उपयुक्त ठरू शकेल.

# हरितगृह वायू उत्सर्जनांमुळे हानी



**आशिया खंडात हरितगृह वायू उत्सर्जनावर भर दिला जात असला, तरी जगातील अनेक देशांनी याबाबतचे नियम धाब्यावर बसवले आहेत. रशिया-युक्रेन युद्धात तर मोठ्या प्रमाणात वायूंचे उत्सर्जन झाले आहे. अमेरिका, चीन, रशियासारख्या देशांनी आणि युद्धखोर राष्ट्रांनी हरितगृह वायू उत्सर्जनाला अंकुश लावला नाही, तर जगणेच अवघड होऊन जाईल. हा आजघडीला मोठा आंतरराष्ट्रीय प्रश्न बनला आहे.**

पर्यावरण

मिलिंद बेंडाळे

अनेक प्रमुख आशियाई अर्थव्यवस्था आता कार्बन कॅप्चर अँड स्टोरेज (सीसीएस) तंत्रज्ञानाचा विचार करीत आहेत; प्रत्यक्षात हवामान बदलाच्या उपायासाठी एक दिशाभूल करणारा प्रयत्न आहे. त्याचा सिल्व्हर बुलेट किंवा रामबाण उपाय म्हणून प्रचार केला जात आहे.

'कार्बन कॅप्चर' आणि स्टोरेज म्हणजे वीज प्रकल्प, कारखाने किंवा कोणत्याही मोठ्या प्रमाणात कारखान्यांमधून उत्सर्जित होणारा कार्बन डाय ऑक्साईड कॅप्चर करणे, तो हवेत जाण्यापासून रोखणे आणि जमिनीखाली साठवणे, हे आकर्षक वाटत असले, तरी ते अद्याप मोठ्या प्रमाणात यशस्वी झालेले नाही. खरे तर, खर्या समस्येवर लक्ष केंद्रित करण्याऐवजी जिवाश्म इंधन जाळून उत्सर्जित होणारा धूर लपवण्याचा हा प्रयत्न आहे.

जागतिक संशोधन संस्थेच्या 'क्लायमेट ॲनॅलिटिक्स'च्या अहवालात म्हटले आहे की, चीन, भारत, जपान, कोरिया, इंडोनेशिया, थायलंड, मलेशिया, सिंगापूर आणि ऑस्ट्रेलियासारख्या देशांनी 'सीसीएस' पूर्णपणे स्वीकारल्यास २०५० पर्यंत अतिरिक्त २५ अब्ज टन हरितगृह वायू उत्सर्जन कमी होऊ शकते. यामुळे पॅरिस करारच रद्द होईल असे नाही, तर त्यांच्या स्वतःच्या अर्थव्यवस्थेचेही मोठे नुकसान होऊ शकते. घरात आग लागली, धूर काढून टाकणारे यंत्र विकत घेतले आणि आग शमवण्याचा प्रयत्नही केला नाही, तर घर वाचेल का? 'कार्बन कॅप्चर अँड स्टोरेज' (सीसीएस) तंत्रज्ञानाबाबतही हेच खरे आहे. 'क्लायमेट ॲनॅलिटिक्स'चे 'सीईओ' बिल हेअर म्हणतात, ही रणनीती हवामानासाठीच नाही तर 'सीसीएस' अवलंबल्याने अडकू शकणार्या अर्थव्यवस्थांसाठीही खूप धोकादायक आहे. 'कार्बन कॅप्चर अँड स्टोरेज' तंत्रज्ञानाची विशिष्ट क्षेत्रांमध्ये संभाव्य भूमिका असूनही हा अहवाल निव्वळ शून्य लक्ष्यांना कमकुवत करण्यासाठी आणि तेल, जिवाश्म वायू आणि इतर प्रदूषणकारी इंधनांमध्ये सुरू असलेल्या गुंतवणुकीला न्याय देण्यासाठी त्याचा गैरवापर करतो. आंतरराष्ट्रीय ऊर्जा संस्था आणि हवामान बदलावरील आंतरसरकारी पॅनेल (आयपीसीसी) सारख्या संस्थांच्या वैज्ञानिक शिफारसींच्या तुलनेत या चुकीच्या दृष्टिकोनाचा प्रसार चिंताजनक आहे. अनेक देश २०२५ पर्यंत राष्ट्रीयदृष्ट्या निर्धारित योगदानाच्या पुढील फेरीची तयारी करीत आहेत. अहवालात म्हटले आहे की, जपान आणि कोरिया या तंत्रज्ञानाच्या बाजारपेठेत पुढे राहण्यासाठी देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर 'सीसीएस'ला प्रोत्साहन देत आहेत. खरेच ऑस्ट्रेलिया आणि आग्नेय आशियाई देश तेल आणि वायू महसूल वाचवण्यासाठी कार्बन साठवणूक आणि संक्रमण केंद्र म्हणून स्वतःला स्थापित करण्याचा प्रयत्न करीत आहेत. चीन आणि भारत या दोन्ही देशांनीही 'सीसीएस' स्वीकारले तर ते एक मोठे आव्हान ठरू शकते. कारण त्यांच्यासाठी अक्षय पर्याय खूपच स्वस्त आणि सुरक्षित आहेत.

जिवाश्म इंधन लॉबी या परिस्थितीनुसार आपली रणनीती आखत आहे. हवामान बदल नाकारण्याऐवजी, ते संकट सोडवण्यातला एक प्रमुख घटक म्हणून स्वतःला पुन्हा स्थापित करण्याचा प्रयत्न करत आहे. म्हणूनच 'सीसीएस'ला 'सिल्व्हर बुलेट' उपाय म्हणून सादर केले जात आहे. 'सीसीएस'च्या क्षमतेला अतिरंजित करण्याचे जिवाश्म इंधन लॉबीचे प्रयत्न पारदर्शक आणि माहितीपूर्ण चर्चेचे महत्त्व अधोरेखित करतात. वस्तुतः राष्ट्रे अर्थपूर्ण हवामान कृतीसाठी प्रयत्न करीत असताना उद्योगांच्या कथांचे परीक्षण करणे आणि उदयोन्मुख तंत्रज्ञानाच्या वास्तविकतेबद्दल आणि हवामान बदलाविरुद्धच्या लढाईतील त्यांच्या भूमिकेबद्दल सार्वजनिक योग्य समज देणे आवश्यक बनते. आज आशिया एका चौरस्त्यावर उभा आहे.

एका बाजूला अक्षय ऊर्जा आहे, जी परवडणारी, विश्वासार्ह आणि भविष्यासाठी योग्य आहे तर दुसर्या बाजूला 'सीसीएस' तंत्रज्ञान आहे, जे खूप महागडे आहे. आशियाने चुकीचा मार्ग स्वीकारला, तर केवळ ग्रहच उष्ण होणार नाहीत; या देशांचे स्वतःचे खिसे आणि भविष्यदेखील धोक्यात येईल. दिवाळी तसेच अन्य काळात फोडल्या जाणार्या फटाक्यांबाबत अनेकदा नाराजी व्यक्त केली जाते. सण किंवा कार्यक्रमांमध्ये फोडल्या जाणार्या फटाक्यांबद्दल लोकसंख्येचा एक मोठा भाग अनेकदा नाराज असतो.

प्रदूषणाचा मुद्दा उपस्थित केला जातो. ही चिंता काही प्रमाणात वैध असली, तरी युद्धामुळे होणार्या प्रदूषणाच्या बाबतीत ही चिंता लक्षात घेतली जात नाही. दोन देशांमधील युद्धांमुळे होणारे प्रदूषण हवाचनाही, तर मातीदेखील प्रदूषित करत आहे. खरे तर, रशिया आणि युक्रेनचा विचार केल्यास त्यांच्या संघर्षातून निघणारा धूर अनेक देशांच्या वार्षिक कार्बन उत्सर्जनापेक्षा जास्त आहे. सरकारे अनेकदा युद्धातील मृतांबद्दल बोलतात; परंतु त्यांच्या पर्यावरणीय परिणामांकडे दुर्लक्ष केले जाते. बरीच माहिती गोपनीय राहते, त्यामुळे संशोधक अचूक डेटा गोळा करू शकत नाहीत. ते डेटा गोळा करण्यासाठी युद्धग्रस्त भागांना भेट देऊ शकत नाहीत. असे असूनही, युद्ध प्रदूषणाच्या हानिकारक परिणामांची व्याप्ती दर्शवणारे काही काम केले जात आहे.

'द इनिशिएटिव्ह ऑन ग्रीनहाऊस गॅस अकाऊंटिंग ऑफ वॉर' (आयजीजीएडब्ल्यू) हा 'युरोपियन क्लायमेट फाऊंडेशन' तसेच जर्मनी आणि स्वीडन यांच्याकडून समर्थित एक संशोधन गट आहे आणि तो संघर्षांमुळे होणार्या प्रदूषणावर काम करतो. रशिया-युक्रेन युद्धाच्या पहिल्या दोन वर्षांमध्ये हरितगृह वायूंचे उत्सर्जन इतके लक्षणीय होते की, ते जागतिक स्तरावर अंदाजे १७५ लहान आणि मध्यम आकाराच्या देशांच्या वार्षिक उत्सर्जनापेक्षा जास्त होते. याचा अर्थ असा की, या देशांच्या एकूण वार्षिक कार्बन डायऑक्साईड उत्सर्जनाचा स्वतंत्रपणे विचार केल्यास केवळ रशिया आणि युक्रेनमधील लष्करी कारवायांमुळे निर्माण होणारे वायू खूपच जास्त होते. युद्धकाळातील प्रदूषण केवळ हल्ल्यांमुळेच नाही, तर लष्करी हालचालींमुळेही होते.

एका अहवालानुसार, रशियाच्या युक्रेनवरील आक्रमणाच्या पहिल्या तीन वर्षांत अंदाजे २३७ दशलक्ष टन कार्बन उत्सर्जित झाला. हे अनेक घटकांमुळे होते. रणगाडे, विमाने आणि इतर लष्करी उपकरणांचा वापर यासारख्या लष्करी कारवायांचा त्यात समावेश आहे. शहरे, जंगले आणि शेतजमिनीमध्ये स्फोटक आगी लागतात. निर्वासित आणि विस्थापित लोकांच्या हालचालींमधून धूर निघतो. आपण लहान- मोठे १७५ देश वगळले, तरी हे उत्सर्जन ऑस्ट्रिया, हंगेरी, चेक प्रजासत्ताक आणि स्लोवाकियाच्या एकत्रित वार्षिक कार्बन उत्सर्जनाइतके आहे. युद्धामुळे इतर अनेक विषारी वायूदेखील बाहेर पडतात. त्यामुळे जागतिक तापमानवाढीला हातभार लागतो. रशियाने युक्रेन युद्धाच्या सुरुवातीच्या काळात जाणूनबुजून ऊर्जा पायाभूत सुविधांना लक्ष्य केले. त्यामुळे विविध हरितगृह वायूंची मोठ्या प्रमाणात गळती झाली. यासंदर्भातील सर्वात महत्त्वाचे उदाहरण म्हणजे 'नॉर्ड स्ट्रीम-२' पाईपलाईनचे नुकसान. ही पाईपलाईन खराब झाली, तेव्हा समुद्रात मोठ्या प्रमाणात मिथेन वायू सोडण्यात आला. त्यामुळे १४ दशलक्ष टन कार्बन डाय ऑक्साईडचे उत्सर्जन झाले.

युक्रेनच्या 'उच्च-व्होल्टेज पॉवर नेटवर्क'वरील रशियाच्या हल्ल्यांमुळे सल्फर हेक्साफ्लोराईड हा अत्यंत विषारी वायू बाहेर पडला. रशिया-युक्रेन युद्धादरम्यान झालेल्या विस्थापनामुळेदेखील लक्षणीय प्रदूषण झाले. या युद्धाने संपूर्ण वर्षात १०० देशांपेक्षा अधिक प्रदूषण केले आहे. एका अहवालानुसार, युद्धामुळे पहिल्या १५ महिन्यांमध्ये अंदाजे ३१ दशलक्ष टन कार्बन उत्सर्जन झाले. हे २०२३ च्या संपूर्ण वर्षातील कोस्टा रिका आणि इस्टोनियाच्या एकत्रित उत्सर्जनापेक्षा जास्त आहे. युद्ध प्रदूषण हे कोणत्याही एका दिवसाच्या फटाक्यांच्या प्रदर्शनापेक्षा खूप जास्त आहे, तरीही यासाठी कोणालाही जबाबदार धरले जात नाही. कोणताही देश संयुक्त राष्ट्रांकडे किंवा इतरत्र त्याची तक्रार करत नाही. लष्करी गुप्तता हे याचे एक प्रमुख कारण आहे.

प्रत्येक देश आपल्या लष्कराचा ऊर्जा वापर, शस्त्रास्त्रांची हालचाल आणि इंधन वापर गुप्त ठेवतो आणि डेटा सार्वजनिक करणे टाळतो. याव्यतिरिक्त 'क्योटो प्रोटोकॉल' आणि पॅरिस करारानुसार विविध देशांना लष्करी उत्सर्जन डेटा सामायिक करणे अनिवार्य नाही.

लष्करी प्रदूषणाचा विचार केला गेला, तर असे देश जागतिक प्रदूषकांच्या क्रमवारीत वरच्या स्थानावर दिसतील. त्यांना हवामान कर भरावा लागू शकतो किंवा निर्बंधांना सामोरे जावे लागू शकते, म्हणूनच या विषयाकडे दुर्लक्ष करण्यात आले आहे.

(लेखक वन्यजीव आणि पर्यटनविषयक अभ्यासक आहेत.)